स्वातंत्र्यसंग्राम कालांतील अमरप्रसंग

— त्र्यं. र. देवगिरीकर



— भारत ग्रंथमाला

स्वा तं त्र्यो त्त र

काळांतील

समरप्रसंग

लेखक

त्र्यं. र. देवगिरीकर

भा र त ग्रं थ मा ला – पु णें २.

प्रथमावृत्ति : १५ ऑगस्ट १९६८.

किंमत : ५ रुपये.

मुद्रक : **दामोदर त्र्यंबक जोशी,**
व्यवस्थापक, चित्रशाळा प्रेस, ५६२, सदाशिव पेठ, पुणें २.
प्रकाशक : **पोपटलाल रामचंद शहा,**
भारत ग्रंथमाला, ४२३, बुधवार पेठ, पुणें २.

प्रस्तावना

माझे स्नेही श्री. पोपटलाल शहा हें कित्येक वर्षें मला कांहीं तरी उद्बोधक, रोचक लिहून द्या, मला प्रकाशन–संस्था काढावयाची आहे असें म्हणत. श्री. पोपटलाल यांची हिंमत व कष्टाळूपणा असामान्य आहे. पण त्यांची पिशवी नेहमींच रिकामी असते. दरिद्रांचे मनोरथ उत्पन्न होतात व विलीन होतात हें प्रसिद्ध वचन असल्यामुळें मी टाळाटाळ करीत आलों. पण श्री. पोपटलाल यांची चिकाटी दांडगी व कळकळ प्रबळ. त्यांनीं माझेकडून त्यांच्या ग्रंथमालेंतील पहिलें पुस्तक लिहवून घेतलें.

ह्या पुस्तकांतील १७ प्रकरणें म्हणजे गेल्या २०–२२ वर्षांतील आणी-बाणीचा इतिहास आहे. २० वर्षांतील कसोटीची कोणतीहि घटना सांगण्याची उरली आहे असें वाटत नाहीं.

गांधीजी १५ ऑगस्ट १९४७ रोजीं नोआखलींत होते अशी आपली कल्पना. ती कल्पना अनेकांची होती व आहे. पण ती चुकीचा आहे. कलकत्त्याला त्यांनीं स्वातंत्र्यदिन कसा साजरा केला हें पहिल्या लेखांत सांगितलें आहे. १४ ऑगस्टचा पाकचा स्वातंत्र्यदिन कसा निर्जीव व शुष्क होता हें दुसऱ्या लेखांत सांगितलें आहे. डॉ. राजेंद्रबाबू हे १५ ऑगस्टला कसे गडबडले होते व जवाहरलालजींनीं मंत्रिमंडळाचीं नांवें नसलेला कोराच लखोटा मौंटबॅटनला कसा दिला हें तिसऱ्या लेखांत सांगितलें. चवथ्या लेखांत पेशावरला डॉ. खानसाहेब यांना झेंडा-वंदनाला हजर राहणें कसें अशक्य केलें याची हकीकत आहे.

पांचव्या लेखांत सुभाषबाबूंच्या 'आझाद हिंद' च्या स्थापनेचा व हिंद आघाडीवरील चकमकीचा वृत्तान्त आला आहे. त्यानंतर मुंबईच्या नाविक बंडाची हकीगत दिली आहे. हिंदी सैन्य व आरमार यांवरील ब्रिटिशांचा विश्वास उडविण्यास हे दोन प्रसंग कारणीभूत झाले.

पाकिस्तान कां मान्य केलें याबद्दल चर्चा चालू असते व चालू राहीलहि. त्याचीं कारणें कोणतीं हें वल्लभभाई, नेहरू वगैरेंच्या भाषणांतून दाखविलें

आहे. तीं कारणें कोणाला पटोत वा न पटोत; पण परिस्थितीनें भारताला कसें शरण आणलें हें त्या लेखांत दिलें आहे.

काश्मीरचीं युद्धें दोन झालीं. पहिलें २७ ऑक्टोबर १९४७ चें. त्या युद्धांत श्रीनगर हिंदनें कसें वांचविलें हें सांगितलें आहे. दुसरें युद्ध ४३२ दिवस चाललें होतें. त्यांत $\frac{1}{3}$ काश्मीरचा भाग पाकनें टोळीवाल्यांच्या नांवानें बळकावला. त्या युद्धाची हकीकत त्या लेखांत दिली आहे.

हैद्राबादवर लष्करी कारवाई करून निजामचे चाळे कसे दीड-दोन दिवसांत बंद पाडले याचा इतिहास हैद्राबादच्या लेखांत दिला आहे. गोवामुक्ति ही शेवटीं कशी चुटकीसरशी झाली हें त्या लेखांत दिलें आहे. चीनचा लढा हा दुर्दैवी होता. त्याबद्दल ऊहापोह केला आहे. चिनी आक्रमणाला मुख्यतः जबाबदार जवाहरलाल व मंत्रिमंडळ होतें. कृष्णा मेननवर केलेले आरोप समर्थनीय नाहींत हें मेरी सेटनच्या ग्रंथावरून दाखविलें आहे. श्रीमती इंदिरा गांधींच्या तेजपूर भेटीची व शौर्यधैर्याची हकीकत पुढील प्रकरणांत दिली आहे. ताश्कंद करार झाला तो कां ? हिंदुस्थाननें पाकचा पराभव कोठें कोठें व किती केला याची माहिती पुढील प्रकरणांत दिली आहे. याशिवाय कच्छ, तिबेट व नागाभूमीचे लढे वर्णिले आहेत.

अशा प्रकारें भारतांतील घडामोडी, स्वातंत्र्यावरील आघातांचे प्रसंग यांचा एकत्र इतिहास ह्या पुस्तकांत आला आहे. बहुतेक आणीबाणीचे प्रसंग पाक–हिंदच्या वितुष्टांतून निर्माण झाले असल्याचें त्यावरून दिसून येतें.

इतिहासाचीं पावलें हळू हळू पडतात. इतिहास सावकाशपणें वाटचाल करतो. पण तो कधीं उग्र स्वरूप धारण करील याचा नेम नसतो. ज्वालामुखी नेहमींच उद्रेक करीत नाहीं. पण उद्रेक क्रिया सतत चालू असते. ज्यांना इतिहासापासून पुढची कल्पना यावयास हवी असेल, त्यांनीं तो वाचला पाहिजे; त्याचा अभ्यास व विचार केला पाहिजे.

हें पुस्तक नव्यानें उपलब्ध होत चाललेल्या माहितीच्या आधारें लिहिलें आहे. त्यांतील घटना, प्रसंग वगैरे सर्व विश्वसनीय आधारावर लिहिले आहेत. पुस्तक-प्रसिद्धीचा हेतु वाचकांच्या माहितींत भर पडावी एवढाच नाहीं. त्या त्या प्रसंगीं भारत कसा वागला, त्यानें कसा भारतीय स्वातंत्र्यरक्षणा-करितां प्रतिकार केला, त्यांत शौर्य, धैर्य, संस्कृति, जिद्द किती होती, राष्ट्रनिष्ठा

किती थोर होती वगैरेंचें अभिमानास्पद दर्शन पुस्तकांत घडतें. याच असामान्य गुणावर भारत आपलें स्वातंत्र्य टिकविणार व स्थिरावणार आहे.

चुका होतात; पण त्या चुका सुधारण्याची शक्ति नेतृवर्गात लागते. राजकारण म्हणजे गणित नाहीं. पण गणिताशिवाय राजकारण नाहीं. अंदाज चुकले, म्हणजे नेतृत्व कमजोर ठरलें असें नाहीं. शेवटीं राजकीय सामर्थ्य व राजकारणी बुद्धि ही अन्योन्याश्रयीच आहे. त्या दोहोंत परिस्थिति डोकें खुपसतें व जगांत मान्य झालेले सिद्धान्त हेहि खोटे ठरतात. दैवाला प्रति-वाचक शब्द परिस्थिति हा होऊन बसला आहे.

वाचकांनीं हा १७ प्रकरणी इतिहास परिस्थितीच्या पार्श्वभूमीवर वाचावा अशी नम्र विनंती आहे.

त्र्यं. र. देवगिरीकर

भारत–ग्रंथमाला

उपक्रम व उद्देश

आज १५ ऑगस्ट भारताचा स्वातंत्र्य–दिन. आपल्या स्वातंत्र्याला आज २१ वर्षें पुरीं झालीं. आपलें स्वातंत्र्य आज सज्ञान झालें. या पवित्र दिवशीं मी भारत–ग्रंथमालेच्या प्रकाशनाला सुरुवात करीत आहे व ती सुरुवात करतांना मला हर्ष होत आहे. माझ्या या कार्याला आपण आशीर्वाद द्यावेत व सुयश चिंतावें अशी माझी नम्र विनंती आहे.

हें प्रकाशनाचें कार्य मी नव्यानें सुरू करीत आहे असें नाहीं. मी आतां-पर्यंत अनेक नियतकालिकें, पुस्तकें प्रकाशित केलीं आहेत. जन–जागृति व सेवा हीं माझीं जिव्हाळ्याचीं जीवित-ध्येयें आहेत. तीं ध्येयें प्रकाशन, लेखन, व्याख्यानें, प्रत्यक्ष सेवा यांच्या द्वारां मी साधण्याचा प्रयत्न करीत आलों आहे. त्या कार्यांत मला अनेक प्रकारचे अनुभव आले आहेत. पण कधीं यशानें मी अहंकारी बनलों नाहीं व अपयशानें निराश झालों नाहीं. माझ्या जवळ श्रद्धेचा एक इवलासा दिवा आहे. त्याच्या प्रकाशांत मी आत्मविश्वासानें पावलें टाकीत असतों. त्याच श्रद्धेनें मला हें प्रकाशन-कार्य हातीं घेण्यास प्रेरणा व स्फूर्ति दिली आहे.

फार वर्षांपासून मला वाटत आलें आहे कीं, आतां लोकशाही राज्य स्थापन झालें आहे. ती लोकशाही आपल्याला सुस्थिर करावयाची आहे. तें स्थैर्य जनता सुबुद्ध, विचारी व जागरूक झाल्याशिवाय येणार नाहीं. शिस्तशीर मतदान करून जनता लोकशाहीप्रवण झाली असें होत नाहीं. तिच्यांत विचारशक्ति जागृत झाली पाहिजे. या विचारशक्तीला कांहीं पाया लागतो. तो पाया कोणता ? माझें प्रामाणिक मत आहे कीं, राजकारण असो, अर्थकारण असो, समाजकारण असो, धर्मकारण असो, या सर्वांना सुसंस्कृत चारित्र्याची, धर्मप्रवण वृत्तीची, दयालुत्वाची, शांतताप्रियतेची, सेवाभावाची आवश्यकता आहे. तीं मानवी जीवनाचीं आधारभूत मूल्यें आहेत. समाजांत जर प्रकर्षानें हीं मूल्यें नसतील तर वरचे संपत्तीचे, उत्कर्ष विकासाचे इमले केंव्हां कोसळतील याचा नेम नाहीं. म. गांधी, प. जवाहरलाल नेहरू यांनीं राष्ट्राच्या नवनिर्मितींत हीं मूलभूत तत्त्वें रुजवण्याचा प्रयत्न केला. त्यांना थोडेंफार यश आलें. पण अद्याप पुष्कळ मजल गांठावयाची आहे. तें काम सोपें असतें तर हिंदुस्थानांत कल्याणकारी राज्य केंव्हांच स्थापन झालें असतें.

माझ्यासारखा लहान माणूस ती महत्त्वाकांक्षा बाळगीत नाहीं. पण मला असें मनःपूर्वक वाटतें कीं, आजचा युगधर्म जर कोणता असेल तर ज्या ज्या व्यक्तीला जितकें जितकें शक्य असेल तितकें तितकें त्या त्या व्यक्तीनें या जीवनाच्या शुद्धिकरणाचे व जीवन उन्नत करण्याचें काम केलें पाहिजे. या प्रयत्नांत जितके आपण यशस्वी होऊं तितकें आपलें राज्य, आपलें स्वराज्य दृढ होईल व गोरगरिबांचीं दुःखें दूर होऊं शकतील. याच बुद्धीनें हें मालेच्या प्रकाशनाचें कार्य मी करूं इच्छितों.

या दृष्टीनें विचार करीत असतां मला असें वाटतें कीं, हिंदुस्थानच्या स्वातंत्र्यानंतरचें एक चित्र जनतेसमोर मांडावें. गेल्या २० वर्षांत भारतावर जे हर्षविमर्षांचे प्रसंग आले, त्याची प्रथम एकत्र लेखांच्या द्वारां वाचकांना ओळख करून द्यावी. भारतीय स्थित्यंतराचा एक आरसा मी जनतेपुढें ठेवीत आहे. त्यांत आपल्याला आपलें प्रतिबिंब पाहावयास मिळेल. त्यानंतर आपण सर्व क्षेत्रांत काय काय केलें पाहिजे याचा विचार करूं. म्हणून हें पहिलें पुस्तक भारत–इतिहास–दर्शनाचें आहे. भारतानें गेल्या २० वर्षांत संकटांना धैर्यानें तोंड दिलें हें कोणीहि अभिमानानें सांगेल.

माझे मित्र श्री. मामासाहेब देवगिरीकर यांचा माझा गेल्या ५० वर्षांचा स्नेह आहे. त्यांना मी माझी कल्पना सांगितली. त्यांनीं स्वातंत्र्योत्तर कालांतील १७ प्रसंग निवडले व त्यावर एकेक माहितीपूर्ण असा लेख लिहिला. त्यांत असलेली माहिती संकलित, नवी व उद्बोधक अशी आहे.

शाळा–कॉलेजांतील विद्यार्थी, शिक्षक वगैरेंना, सामान्य वाचकांना, सार्वजनिक कार्यकर्त्यांना या पुस्तकांत पुष्कळच समजून घेण्यासारखें आहे. २० वर्षांचा तो स्फूर्तिदायक इतिहास आहे. श्री. देवगिरीकर यांचा मी त्याबद्दल कृतज्ञ आहे.

माझी वाचकांना अशी विनंती आहे कीं, त्यांनीं या उपक्रमाचें स्वागत करावें व त्याला आश्रय द्यावा. ग्रंथालयें, सरकार, जिल्हा–परिषदा, शिक्षण-संस्था यांनाहि हीच विनंती आहे. संकल्प सत्य असला, म्हणजे भगवान् दाता होतो. येथें जनता हीच भगवान् आहे आणि तिच्याकडेच मी पाहात आहे.

हें मालेचें पहिलें पुस्तक चित्रशाळेनें आपुलकीनें, अल्पावधींत छापून दिलें याबद्दल त्यांचे आभार.

पोपटलाल रामचंद शहा,
संचालक, भारत–ग्रंथमाला.

अनुक्रमणिका

* * *

१ : १५ ऑगस्ट व गांधीजी

नव्या दिल्लींत स्वातंत्र्याचा सोहळा मोठ्या उत्साहानें, धामधुमीनें व हर्षानें साजरा होत होता. वास्तविक स्वातंत्र्याचे नेते, निर्माते महात्माजी हे तेव्हां दिल्लीस असावयास पाहिजे होते. शासकाशिवाय राज्य, पानाशिवाय झाड, पाण्याशिवाय नदी, कधीं असूं शकते का ? हॅम्लेट नाटक किंग ऑफ डेन्मार्क-शिवाय होऊं शकते का ? गांधी दिल्लीस नव्हते, हें तर सर्वांना ठाऊक आहे. पण ते कां नव्हते ? कोठें होते ? अनेकांनीं अनेक तर्क चालविले. ते रागावले आहेत, कोणी म्हणाले. कोणी म्हणाले, उत्सवसमारंभांत त्यांचें मन रमत नाहीं. कोणी म्हणाले, हिंदुस्थानची झालेली फाळणी त्यांना मान्य नाहीं म्हणून ते गैरहजर राहिले. पण तीं खरीं कारणें नाहींत; पूर्णपणें खरीं नाहींत.

हिंदुस्थानच्या फाळणीचे भयंकर परिणाम बंगाल, बिहार व पंजाबमध्यें होत होते. नोआखलींत हिंदूंच्या कत्तली होत होत्या; बिहारमध्यें मुसलमान कापले जात होते आणि पंजाबमध्यें मानवी यज्ञाचें कुंडच धगधगत होतें. ही जातीय द्वेषाची आग जर वणव्यासारखी पसरली तर हिंदुस्थानचें स्वातंत्र्य त्यांत जळून खाक होईल याची गांधींना कल्पना होती. म्हणून त्यांनीं स्वातंत्र्याच्या दिवसांत आपलें कार्यक्षेत्र पूर्व बंगाल आहे असें मनाशीं ठरविलें. त्यांनीं जवाहरलालजी किंवा सरदारांची परवानगी मिळवली नसली, तरी आपला कार्यक्रम त्यांना कळविला. पंजाबमध्यें दंगलीच्या बंदोबस्ताकरितां ब्रिटिश अधिकाऱ्यांच्या हाताखालीं ५५,००० हिंदी फौज होती. पण बंगाल-बिहारमध्यें तशी संरक्षणाची तरतूद नव्हती.

गांधीजी हे एखाद्या आग विझवणाऱ्या इंजिनाप्रमाणें काश्मीरमध्यें धांवून गेले. तेथून लाहोर गांठलें व लाहोरहून दिल्लीला न जातां ते सरळ पाटण्याला गेले. पाटण्याहून कलकत्ता व कलकत्याहून नोआखली असा त्यांचा संकल्पित दौरा होता. त्यांना कोणी तिकडे जाऊं नका असें म्हटलें नाहीं. पंजाबमध्यें संरक्षक सैनिक होते; पण बंगाल–बिहारमध्यें हा एकटा शांतिदूत संरक्षक सैनिकांचें काम करीत होता. लॉर्ड मौंटबॅटन यांचे हे उद्गार होते.[1] एकीकडे हिंसक शक्ति, तर दुसरीकडे अहिंसक शक्ति असा तो देखावा होता. गांधी म्हणत दंगली करून लोक मरणार असतील तर मला निदान त्यांच्याजवळ राहिलें पाहिजे, त्यांचे अश्रु पुसले पाहिजेत, त्यांची मानवता जागृत केली पाहिजे, हिंदी स्वातंत्र्य टिकवलें पाहिजे, व त्यांच्या बरोबर मेलें पाहिजे. लोकांचा पुढारी हा लोकांतच असला पाहिजे.


८ ऑगस्टला ते पाटण्याची प्रार्थना सभा आटोपून थेट कलकत्त्याला पोहोंचले. कलकत्त्याला बंगालमध्यें १५ ऑगस्टपर्यंत सुरावर्दींचें मंत्रिमंडळ होतें. १५ तारखेपासून प्रफुल्लचंद्र घोष हे मुख्य मंत्री होणार होते. हा सत्तांतराचा काळ अत्यंत धोकादायक होता विशेषतः मुसलमानांना. मुसलमानांनीं १६ ऑगस्ट १९४६ ला ‘ प्रत्यक्ष कृति ’ करून ५००० हिंदु कलकत्त्याला मारले होते. आतां पाकिस्तान झालें; मुस्लिम राज्य संपलें. सत्ता हिंदूंच्या हातीं आली. हिंदु गतवर्षींच्या कत्तलीचा सूड घेतील अशी मुसलमानांना साहजिकच भीति वाटत होती. पण दंगलींत हिंदूंचें जीवितहि सुरक्षित राहिलें असतें असें कोण सांगणार ? तथापि हिंदूंना आंतून विश्वास वाटत होता कीं, आपली प्राणहानि झालीच तर ती थोडी होईल.

गांधी कलकत्त्याला सोदपूर आश्रमांत राहिले. त्यांना भेटावयास लीगचे पुढारी महंमद उस्मान दोन वेळां आले. गव्हर्नर बरोज हेहि आले. ते म्हणूं लागले, ‘ तुम्ही कांहींहि करा पण येथून १५ ऑगस्ट होऊन जाईपर्यंत जाऊं

१. "In the Punjab we have 55,000 soldiers and large scale rioting in our hands. In Bengal our forces consist of one man and there is no rioting."

मौंटबॅटन यांचें गांधींना पत्र.
लास्ट फेज : प्यारेलाल २ खंड, पान ६८२.

नका.' गांधी म्हणाले, "काँग्रेस राजवटींत कोणत्याहि जमातीच्या लोकांना इजा पोहोंचणार नाहीं." पण हें तत्त्वज्ञान घाबरलेल्या मुसलमानांना पटलें नाहीं. त्यांनीं गांधींना आग्रह केला. गांधी म्हणाले, 'तुम्ही जर नोआखलींत हिंदूंच्या जीविताला धक्का लागणार नाहीं अशी खात्री देत असाल तर मी येथें राहीन.' मुसलमान पुढाऱ्यांनीं तें कबूल केलें. त्यांनीं नोआखलीला लीगच्या पुढाऱ्यांना तारा पाठविल्या, एवढेंच नव्हे, तर माणसेंहि पाठविलीं. गांधी कलकत्त्यास राहिले.



महात्मा गांधीजी

शहीद सुरावर्दी हे बंगालचे मुख्य मंत्री होते; पण नव्या राजवटींत त्यांना पदच्युत करून ख्वाजा नाझिमुद्दीन यांना मुख्य मंत्री केलें होतें. सुरावर्दी हे आतां बदलले होते. गांधीजी कलकत्त्यास आले आहेत हें समजतांच ते कराचीहून तांतडीनें कलकत्त्याला धावत आले. गांधींना भेटले. कलकत्ता सोडूं नका असें आर्जव करूं लागले. गांधी म्हणाले, 'जर तुम्ही माझ्या बरोबर राहणार असाल तरच मी येथें राहीन.' तें तर अग्निदिव्यच होतें. गांधी त्यांना म्हणाले, "प्रसंग कठीण आहे. घरीं जा. वडिलांना व मुलीला

विचारून उत्तर द्या. " पोलिसाशिवाय, लष्कराशिवाय दंगलग्रस्त विभागांत ते दोघेजण जाऊन राहणार होते. दीड दिवसांनीं सुरावर्दीचा निरोप आला, ' मी तुमच्याबरोबर राहण्यास येतों.' ' हैदरी मॅनशन ' नांवाच्या एका पडक्या इमारतींत ते जाऊन राहणार होते. ती इमारत चहूं बाजूंनीं वाटसरूंना मोकळी होती. खिडक्यांच्या काचा फुटल्या होत्या. एकच शौचकूप व शेंकडों लोक त्याचा उपयोग करीत. अगदीं गलिच्छ वस्तींत, तें पडकें घाणेरडें घर होतें. गांधी येणार म्हणून दोन-तीन खोल्या झाडून लोटून काढल्या होत्या. चहूंकडे दुर्गंधी सुटली होती.

गांधीजींची मोटर अगदीं ठरल्याप्रमाणें तेथें आली. पण सुरावर्दी वेळेवर आले नाहींत. गांधी येणार म्हणून संतप्त तरुणांचा जमाव त्या घराच्या फाटकाशीं जमला होता. ' आम्ही मरत होतों, तेव्हां तुम्ही आलां नाहींत ! आतां येतां का ? येथून निघून जा. मुसलमान तुम्हांला प्रिय आहेत.' गांधींचें असें स्वागत झालें.

नंतर आले सुरावर्दी. त्यांच्या गाडीला वेढाच पडला. आतां कांहीं तरी अनिष्ट प्रकार होणार अशीं चिन्हें दिसूं लागलीं. गांधी अस्वस्थ झाले. त्यांनीं कांहीं जणांना बाहेर पाठविलें. तुमचे प्रतिनिधी आंत पाठवा असें बाहेरील जमावाला सांगितलें. प्रतिनिधी आंत आले व शांतता झाली. सुरावर्दींना आंत जाऊं दिलें.

गांधीजींनीं होरेस ॲलेक्झांडर यांनाहि आपल्या बरोबर येऊन राहण्यास सांगितलें होतें. ते आले तेव्हां अशीच आरडाओरड झाली. " गांधी परत जा ' अशा घोषणा होत होत्या. ज्या खोलींत गांधी बसले होते, तेथील खिडक्यांवर चढण्याचा तरुणांचा प्रयत्न चालला होता. कांचेच्या खिडक्यांवर दगडांचा वर्षाव सुरू झाला. काचेचे तुकडे इतस्ततः पसरले. बाहेरून सारखा दगडांचा वर्षाव चालला होता.

लवकरच लोकप्रतिनिधी चर्चेला आंत आले. त्यांचा पुढारी गांधींना म्हणाला, " गेल्या वर्षीं १६ ऑगस्टला हिंदूंवर ' प्रत्यक्ष कृति ' सुरू झाली तेव्हां तुम्ही आमच्या रक्षणाला आलां नाहींत. आतां मुसलमानांकरितां आलां आहांत. तुम्ही येथें आम्हांला नको आहांत. "

गांधी म्हणाले, ' १६ ऑगस्टपासून अनेक गोष्टी घडल्या. मुसलमानांचें

वर्तन अगदीं चूक होतें. पण १९४६ सालचा सूड, १९४७ मध्यें घेऊन फायदा काय ? त्या वेळीं मी तुमच्याच नातलगांना हवा होतों म्हणून नोआ-खलीच्या वाटेवर होतों. पण मला आतां असें वाटतें कीं, येथेंच राहून त्यांची सेवा करावी लागेल. मी येथें हिंदु–मुसलमान या दोघांची सेवा करण्याकरितां आलों आहे हें तुम्ही समजून घेतलें पाहिजे. मी तुमच्या संरक्षणाखालीं राहणार आहें. तुम्हांला माझ्यावर उलटतां येईल व इच्छा असल्यास विरोधी भूमिकाहि घेतां येईल. मी माझ्या आयुष्याचा प्रवास संपवीत आलों आहे. पण मला हें सांगू द्या कीं, जर तुम्हांला पुनः वेड लागलें, तर मी जिवंत साक्षीदार राहणार नाहीं. मी नोआखलीच्या मुसल-मानांनाहि तोच निर्वाणीचा इषारा दिला आहे. नोआखलींत जर पुनः वेड संचरलें, तर मी त्यांना मेलेला दिसेन. हें पाऊल टाकून मी नोआखलीच्या शांततेची जबाबदारी सुरावर्दी व त्यांचे स्नेही यांच्यावर टाकली आहे हें तुम्हांला कसें कळत नाहीं ?"

"आम्हांला तुमचीं अहिंसेवरील प्रवचनें ऐकावयाचीं नाहींत. तुम्ही येथून चालते व्हा. आम्ही मुसलमानांना येथें राहूं देणार नाहीं."

"याचा अर्थ असा कीं, तुम्हांला माझ्या सेवेची जरूरी नाहीं," गांधीजी म्हणाले. थोडीफार अवांतर चर्चा झाल्यावर गांधीजी म्हणाले, "तुम्ही मला येथून बळजबरीनें हाकून लावणार आहांत; पण लक्षांत ठेवा मी बळजबरीला शरण जाणार नाहीं. तुम्ही माझ्या कामांत अडथळा आणूं शकाल, मला ठारहि मारूं शकाल. मी पोलिसांची मदत मागणार नाहीं. मला या घरांतून बाहेर पडण्यास तुम्ही मज्जाव करूं शकाल, पण मला हिंदूंचा शत्रु म्हणून म्हणविण्यांत तुम्ही काय साधणार आहां ? मला तें नामाभिधान मंजूर नाहीं."

अशा प्रकारें रात्रीं ८ वाजेपर्यंत ही चर्चा चालली होती. शेवटीं गांधी म्हणाले, "मी तुम्हां तरुणांच्या पुढें एक प्रश्न मांडतों; मी जो जन्मानें हिंदु आहे, धर्मानें हिंदु आहें, आणि आचरणानें कट्टर हिंदु आहे, तो मी हिंदूंचा शत्रु कसा असेन ?"

त्यांच्या या शब्दांचा विलक्षण परिणाम झाला. हळूहळू विरोध मावळूं लागला. शेवटीं प्रतिनिधि म्हणाले, 'आम्ही आतां जातों.' गांधी

म्हणाले, ' जा, पण पुरा विचार करून उद्यां सकाळीं परत या. '

× × ×

रात्रीं ९ वाजतां प्रार्थना झाली व ११ वाजतां गांधी जेवणाची वेळ टळून गेल्यामुळें उपाशीच निजले. दुसरा दिवस १४ ऑगस्टचा. ती तरुण मंडळी आली व सुरावर्दींच्या समक्ष चर्चा सुरू झाली. गांधीजी म्हणाले, ' बेलिघाटामधील मंडळींनीं मुसलमानांना परत बोलावलें, म्हणजे आम्ही मुसलमान वस्तींत जाऊं व हिंदूंना परत बोलवावयास सांगूं. ' ही गांधी योजना तरुणांना एकदम पसंत पडली. ते म्हणाले, ' आम्ही या शांतिकार्यांत मदत करूं. ' त्यांतील एक दुसऱ्याला म्हणाला, ' हा केवढा मोठा जादुगार आहे. याला पराभव माहीतच नाहीं. ' १५ ऑगस्टनंतर सशस्त्र पहारा काढून घेण्यांत आल्यावर त्याच तरुणांनीं गांधींच्या घराचें संरक्षण केलें. इतकी वैचारिक क्रांति गांधीजी करूं शकले.

१४ तारखेला संध्याकाळची प्रार्थना " हैदरी मॅन्शन "च्या आवारांतच झाली. दहा हजार लोक जमले. गांधींनीं प्रार्थनेनंतर भाषण केलें. स्वातंत्र्य, फाळणी, नोआखली, कलकत्ता वगैरेंचे प्रश्न सांगितले.

" कुठें आहे सुऱ्हावर्दी ? " लोक ओरडले.

गांधीः—" ते आंत आहेत. मी त्यांना आंत राहण्यास सांगितलें आहे. त्यांना आपल्या उपस्थितीनें प्रक्षोभ वाढवावयाचा नाहीं. "

सुरावर्दी प्रार्थनासभेंत नाहींत असें पाहून त्यांच्यावर हल्ला करण्यास हीच वेळ अनुकूल आहे, असें कांहीं तरुणांनीं ठरविलें. ते आंत ओरडत चालले. सुरावर्दींचें रक्त आम्हांला पाहिजे असें म्हणत त्यांनीं घरावर दगडांचा वर्षाव सुरू केला. होरेस ॲलेक्झांडर हेहि आंतच होते. त्यांना आपले जोडे सांपडले नाहींत व चिखलांत पाय बुडविण्याची त्यांची इच्छा नव्हती, म्हणून ते प्रार्थनेला गेले नाहींत. त्या दोघांशिवाय एक पिस्तुलधारी हिंदु तरुण पोलिस आंत होता. सुरावर्दी जमिनीवर पडले होते व बाहेरील तरुणाविषयीं कुत्सितपणें बोलत होते. ॲलेक्झांडर व तो पोलिस नाझीच्या अंमलाखालींल नॉर्वेच्या अहिंसेची चर्चा करीत होते. बाहेर लोकांचा वेढा पडला होता. खिडक्या केव्हां कोलमडतील याचा नेम नव्हता.

प्रार्थना संपवून गांधी आंत आले व त्यांनीं सरळ आपलें काम सुरू केलें.

बाहेर आरडाओरड चालली होती. दगड थांबले होते. बाहेरचा गलका पाहून गांधींनीं मनूला बोलावलें. त्यांनीं खिडकी उघडण्यास सांगितलें व भाषण सुरू केलें. ताबडतोब ओरडा थांबला. शांतता झाली.

लोक ओरडले, " कुठें आहे सुरावर्दी ? तो येथें आल्याशिवाय आम्हीं निघून जाणार नाहीं. "

गांधी म्हणाले, ' सुरावर्दी रमझानचा उपास सोडत आहेत. ते लवकरच तुमच्यापुढें येतील.' लोक ऐकण्याच्या मनःस्थितींत आहेत असें पाहून गांधींनीं सुरावर्दींना आपल्याजवळ येण्यास खुणाविलें. गांधींनीं एक हात सुराबर्दींच्या खांद्यावर व दुसरा मनूच्या खांद्यावर मोठ्या युक्तीनें ठेवला व ते स्वतः दोघांच्या मध्यें उभे राहिले.

सुरावर्दी भाषण करूं लागले. ते म्हणाले, " ह्या वेळीं महात्माजी आपल्यांत आहेत हें बंगालचें महान् भाग्य आहे, बंगाल हें आपलें सौभाग्य जाणून घेईल का व भ्रातृहत्या थांबविल का ? " एकजण ओरडला, ' कलकत्त्याच्या मोठ्या हत्याकांडाला तुम्ही जबाबदार नाहीं का ? '

" सुरावर्दी, आपण सर्वचजण. "

" माझ्या प्रश्नाचें उत्तर देणार का नाहीं ? "

" होय, मीच जबाबदार आहें. "

सुरावर्दीसारख्या एका उर्मट, हेकेखोर, हुकूमशाहाच्या तोंडून निघालेल्या या कबुलीचा जमावावर विलक्षण परिणाम झाला. 'तेथून वातावरण सारें बदललें' असें गांधीजी म्हणाले.

तितक्यांत एक बातमी आली कीं, ५००० हिंदुमुसलमानांचा एक जमाव रस्त्यांतून मिरवणुकीनें चालला आहे. शहराच्या एका भागांत हिंदु दुसऱ्या दिवसाकरितां (१५ ऑगस्ट) राष्ट्रीय निशाण चढविण्याची तयारी करीत होते. त्यांना रस्त्याच्या दुसऱ्या बाजूचे मुसलमान विचारीत होते, ' भाई, आम्ही येऊं का तुमच्या मदतीला ?' 'या अवश्य या' असें त्यांना सांगितलें गेलें. सुरावर्दी म्हणाले, ' पहा, या एका माणसानें केवढा हा चमत्कार केला. '

रात्रीचे ९ वाजले. सुरावर्दींनीं गांधींना लेककडे पायीं फिरावयास नेलें. ते परतले तेव्हां १० वाजले होते. गांधींना झोपावयास पुनः ११ वाजले. रात्रभर स्वातंत्र्याचा जयजयकार चालला होता. सारें कलकत्ता शहर आनंदांत

डुंबलें होतें. झेंडे, पताका, राष्ट्रगीतें वगैरेंनीं शहर दुमदुमलें होतें. हिंदु-मुसलमान एकमेकांच्या मोहल्ल्यांत निर्भयपणें हिंडत फिरत होते व मित्रभावानें वागत होते. मुसलमानांच्या घरावर राष्ट्रीय निशाणें फडकत होतीं.

१५ ऑगस्टच्या मध्यरात्रीपासून गांधींच्या निवासस्थानावरील पोलिस-पहारा उठला. गांधींचें रक्षण हिंदु-मुसलमान स्वयंसेवक करूं लागले.

१५ ऑगस्ट

स्वातंत्र्याच्या दिवशीं गांधीजी पहाटे २ वाजतां उठले. तो महादेव देसाईंचा पांचवा श्राद्धदिन होता. गांधी त्या दिवशीं उपास करीत व प्रार्थनेनंतर सारी गीता पठण करीत. गीता पठण संपण्याचे वेळीं बंगालच्या मुलींचे मेळे रवींद्रनाथांचीं स्वातंत्र्याचीं गीतें गात तेथें आले. त्यांनीं गांधीदर्शन घेतलें, पुनः गाणीं गात गात त्या मुली निघून गेल्या. सूर्योदय होईपर्यंत असे अनेक मेळे तेथें आले. सारें वातावरण आमूलाग्र बदललें. गांधी पहाटे फिरावयास जात. त्यांच्या वाटेवर हजारों स्त्री–पुरुष जमले होते. त्यांच्या घराला तर दिवसभर लोकांचा वेढाच पडला होता.

सकाळीं पश्चिम बंगालचे मंत्री आले व आशीर्वाद मागूं लागले. गांधी म्हणाले, ‘ आजपासून तुम्हांला कांटेरी मुकुट घालावा लागेल. सत्य व अहिंसेच्या सिद्धीकरितां अविश्रान्त परिश्रम करा. नम्र व्हा. क्षमाशील व्हा. ब्रिटिश सत्तेनें तुमची परीक्षा आरंभिली आहे. सत्तेपासून सावध रहा. सत्ता भ्रष्ट करते. सत्तेच्या भपक्यानें व डामडौलानें पिंजऱ्यांत अडकूं नका. हिंदी खेड्यांतील गरिबांची सेवा करण्याकरितां तुम्ही अधिकारावर आहांत हें लक्षांत ठेवा. परमेश्वर तुम्हांला सहाय्य करो. ’

त्या दिवशीं सारा कलकत्ता हिंदु-मुसलमानांच्या ऐक्य-घोषणांनीं दुमदुमत होता. लोक प्रेमातिशयानें राजभवनावर गेले व तेथें नवे राज्यपाल राजाजी यांना भेटले. त्या दिवशीं प्रार्थनेला ३०,००० लोक जमले घेते. गांधींनीं व सुरावर्दीनीं हिंदु-मुसलमानांना उद्देशून भाषण केलें. गांधींनीं त्या ऐक्याबद्दल देवाला धन्यवाद दिले.

त्या रात्रीं गांधी कलकत्ता शहरांत स्वातंत्र्य-सोहळा व जातीय ऐक्याचें दृश्य पाहण्यास बाहेर पडले. सुरावर्दी मोटार हाकीत होते. एका कोपऱ्यावर मुसलमानांचा मोठा घोळका होता. त्यांतील लोकांनीं गांधींना पाहिलें व त्यांनीं

गाडीला गराडा धातला. गांधींचा जयजयकार केला. त्यांनीं दोघांना आपल्या-बरोबर ‘ जय हिंद ’ म्हणावयास लावलें. त्यांच्यावर गुलाबपाणी शिंपडलें. अत्तर लावलें. फुलांचाहि वर्षाव केला. तरुण मुसलमान त्यांच्याबरोबर हस्तांदोलन करूं लागले.

त्या दिवशीं गांधींचा उपास होता व सुरावर्दींनींहि उपास केला.

ही सारी किमया या एका महात्म्यानें केली असें सुरावर्दी सारखें म्हणत होते.

* * *

आधारः—दी लास्ट फेज–प्यारेलाल खंड २, पानें ३५९–३७२.

२ : कराचीचा निस्तेज स्वातंत्र्य-दिन

पाकिस्ताननें द्वेष, दुराग्रह, संताप व जातीयता यांच्यांतून स्वतंत्र राज्य मिळवून घेतलें. तें पाकिस्तानचें स्वतंत्र राज्य १४ ऑगस्टला स्थापन झालें. त्या राज्यस्थापनेचें वर्णन लॉर्ड मौंटब्रॅटन यांचे प्रेस ॲटॅची, कॅंब्रल जॉनसन यांनीं केलें आहे. त्यांना मौंटब्रॅटनबरोबर कोठेंहि हजर राहण्यास परवानगी होती. कॅंब्रल जॉनसन हे ब्रिटिश नोकरींत मोठ्या हुद्दयावर होते. मौंटब्रॅटनचे ते जवळ जवळ स्नेहीच बनले होते. कॅंब्रल जॉनसन यांनीं ' मिशन उइथ मौंटब्रॅटन ' हें पुस्तक लिहिलें. त्यांनीं अगदीं जवळून हे सत्तांतराचे सोहळे पाहिले असल्यामुळें त्यांच्या वर्णनांत सत्य आहे.

मौंटबॅटन हे अखंड हिंदुस्थानचे शेवटचे व्हाइसरॉय होते. त्यांची सत्ता १५ ऑगस्टला संपणार होती. ती संपण्यापूर्वीं त्यांना पाकिस्तान व हिंदुस्थान या दोन देशांना स्वातंत्र्य देण्याचा समारंभ पार पाडावयाचा होता. त्यांत पाकिस्तान प्रथम व नंतर हिंदुस्थान असा क्रम ठरविला गेला. १३ ऑगस्टला सकाळीं मौंटबॅटन दिल्लीहून कराचीला गेले. कराचीच्या विमानतळावर त्यांच्या स्वागताला सिंधचे नियोजित गव्हर्नर हिदायतुल्ला हजर होते. विमानतळावर जीना हे हजर नव्हते. ती गोष्ट अनेकांना खटकली. पण जीना स्वभावानें उर्मट व बेपर्वा होते. विमानतळावरून सरकारी बंगल्यांत मौंटबॅटन निघाले. विमानतळावर किंवा वाटेंत गर्दी नव्हती. जीनांचे लष्करी सचिव कर्नल बिर्नी वाटेंत मौंटब्रॅटनला म्हणाले, " उद्यां जी मिरवणूक निघणार आहे, त्या मिरवणुकींत जीनावर बॉंब टाकण्याचा कट केला गेला आहे.



जीना

काय होणार आहे सांगवत नाहीं. आम्ही सर्व चिंताग्रस्त आहोंत.'' कोण बॉंब टाकणार, कट कोणाचा वगैरे सर्व गोष्टी अज्ञातच होत्या. कर्नल बिर्नी म्हणाले, 'ही माहिती मिळाल्यापासून आम्ही चर्चा करीत आहोंत कीं, मिरवणूक रद्दच करावी का रस्ता बदलावा' अशी माहिंती क. बिर्नीनें दिली. मौंटबॅटन सरकारी बंगल्यांत पोहोंचले. जीनांनीं आपण विमानतळावर कां आलों नाहीं याबद्दल क्षमायाचना, दिलगिरी किंवा खेद कांहींच व्यक्त केला नाहीं.

मौंटबॅटनना जीनांनीं म्हटलें, 'हें बॉंबचे संकट आमचे पुढें आहे. तुमचाहि जीव धोक्यांत आहे. तुम्ही म्हणत असाल तर मिरवणूक काढूं; नाहींतर तो कार्यक्रम रद्द करूं.'

मौंटबॅटन हे लष्करी पेशांत वाढलेले व निर्भय वृत्तीचे होते. त्यांनीं कदाचित् मिरवणूक न काढण्यामागील हेतु हेरला असावा. ते म्हणाले, मी मिरवणुकींत यावयास तयार आहे. जीनांना मौंटबॅटनची संमति हवी होती ती मिळाली. मिरवणूक काढावयाचें ठरलें.

बाहेर उभे असलेल्या परदेशी वृत्तपत्रप्रतिनिधींनीं अशी तक्रार केली कीं, जीनांनीं विमानतळावर हजर न राहून मौंटबॅटनचा धडधडीत अपमान केला आहे. पण मौंटबॅटननीं ती गोष्ट मनाला लावून घेतली नाहीं.

त्या दिवशीं रात्रीं मौंटबॅटनच्या सन्मानार्थ सरकारी मेजवानी आयोजित केली होती. मेजवानीनंतर भाषणें होतात. जीना व मौंटबॅटन यजमान व अतिथि हे दोघेहि बोलणार. मौंटबॅटनच्या सहाय्यकांना जीना तयार भाषण वाचणार असले तर उत्तर देतांना त्याचा परामर्ष घेणें भाग होतें. सरकारी माहिती अधिकारी कर्नल मलिक यांना कॅम्बल जॉनसन यांनीं त्यासंबंधीं विचारलें. क. मलिक म्हणाले, 'जीना तयार केलेलें भाषण वाचणार नाहींत. आयत्या वेळीं समयोचित असें भाषण करतील.' त्यामुळें मौंटबॅटन यांनींहि भाषणाची तयारी केली नाहीं. पण जेवण संपल्यावर जीनासाहेब उठले व आपल्या जवळील लेखी कागदाकडे पाहून भाषण वाचूं लागले. क. मलिक खोटे बोलले, का जीनांनीं त्यांना चकवलें हें सांगतां येत नाहीं. पण क. मलिक यांनीं खोटी माहिती दिली, एवढें खरें. जीनांनीं आपल्या भाषणांत जे मुद्दे उपस्थित केले, त्यांना मौंटबॅटननीं सफाईदार शब्दांत उत्तरें दिलीं.

पण ह्या भोजनापूर्वीचा एक प्रसंग असाच गमतीचा आहे. मोठमोठ्या पाहुण्यांना त्या रात्रीं जेवायला बोलावलें होतें. पंधरा मिनिटें जेवायला उरलीं होतीं. तीन पाहुण्यांचा पत्ता नव्हता, त्यांच्या खुर्च्या रिकाम्या होत्या. ते पाहुणे येण्याचीं चिन्हें दिसेनात. आतां काय करायचें ? त्यांच्या खुर्च्या रिकाम्या ठेवायच्या का खालच्या खुर्च्यांवरील पाहुण्यांना वर जागा द्यावयाच्या असा एक गंभीर प्रश्न निर्माण झाला. शेवटीं सल्लामसलत, चर्चा वगैरे होऊन खुर्च्या रिकाम्या ठेवूं नयेत असें ठरलें. पण नवी मांडणी करायला वेळ लागणार होता. मौंटबॅटन व जीना ही सगळी गडबड पाहात होते. ते दोघेजण बोलत उभे राहिले व अर्धा तास त्यांचीं बोलणीं होत होतीं. पाकिस्तानच्या गबाळेपणाचा हा जसा नमुना होता, तसाच कायदे-आझमचें

निमंत्रण न स्वीकारणाऱ्या प्रतिष्ठितांचा तो उद्धटपणा होता. जेवणानंतर स्वागतसमारंभ आयोजित केला होता. त्याला हजारों लोक आले होते. पण जीना आपल्या धर्मबांधवांत मिसळले नाहींत. ते एका बाजूला एकटेच उभे होते. लोकांत मिसळणें हा त्यांना कमीपणाच वाटत असे.

१४ तारीख उजाडली. सकाळीं कायदे-मंडळांत सत्तासंक्रमणाचा समारंभ होणार होता. कराचींत लोकांत उत्साह नव्हता. रस्त्यावर गर्दी नव्हती. शहरांत पताका, झेंडे नव्हते; सजावट नव्हती, जयजयकार होत नव्हता, घोषणा नव्हत्या. कॅंबेल जॉन्सन म्हणतात, 'एखाद्या वार्षिक संसद अधिवेशनाचे वेळीं जितपत गर्दी होते, तितपतच तेथें गर्दी होती.' पण विधानसभेखालील मैदान मात्र लोकांनीं गजबजलें होतें.

विधानसभेंत औपचारिक भाषणें झालीं. जीना व मौंटबॅटन बोलले. जीनांना सतत वाटत होतें कीं, मौंटबॅटनमुळेंच आपल्याला पाकिस्तान मिळालें; आणि तें खोटें नव्हतें. त्यामुळें जीनांच्या भाषणांत ओतप्रोत स्तुति असली तर त्यांत आश्चर्य नाहीं. जीनांनीं त्या बैठकींत आपल्याकडे राज्याची सारी सत्ता घेतली. कुठली जनता, कुठले दारिद्र्याचे प्रश्न, कुठले धर्मप्रेम व कुठली प्रगति! जीना हे त्या दिवशीं पाकिस्तानचे सर्वसत्ताधीश झाले.

बैठकीनंतर जीना मौंटबॅटन यांची जोडी मिरवणुकीनें परत फिरणार होती. बॉंबची भीति त्याच वेळीं दाखवली गेली होती. वाटेवर लोक होते; आरमारी नाविक होते; मुलें होतीं. ते घोषणा करीत होते. पण ते सर्व निर्जीव होते. कुठेंहि लोक आनंदानें बेभान झालेले व उल्हसित दिसले नाहींत. दिल्लीला आनंदसागराला भरती आली होती आणि कराचीला सागर झोपलेलाच होता. मिरवणूक संपल्यावर जीना मौंटबॅटनच्या गुडघ्यावर हात ठेवून म्हणाले, 'देवाची कृपा मीं तुम्हांला जिवंत परत आणलें.' कराचींतील हिंदु आपल्यावर बॉंब टाकतील अशी त्यांना माहिती मिळाली होती कीं काय हें ठाऊक नाहीं. कदाचित् ही कटाची बातमी जाणूनबुजूनहि फैलावण्यांत आली असेल. कां कोणी जिनांच्या वैरी मुसलमानांनीं हा कट केला असेल ? कांहींहि असलें तरी जीना व मौंटबॅटन हे दोघेहि जिवंत राहिले.

कराचीचा १४ ऑगस्टचा स्वातंत्र्यसोहळा हा एवढाच. जर लाहोरला हा स्वातंत्र्यदिन साजरा झाला असता तर त्याला निराळें स्वरूप आलें असतें.

कराचीला सिंधी हिंदूंची फार मोठी वस्ती होती. त्यांना आपल्या जीवाची भीति वाटत होती. तो मुसलमानांचा स्वातंत्र्य-दिन असेल, पण हिंदूंचा अमंगल दिन होता. ते घरीं शोक करीत होते.

मौंटबॅटनना दिल्ली लवकर गांठावयाची होती. कारण दिल्लींत खरा स्वातंत्र्य-दिन होता. निरोप घेतले, हस्तांदोलनें झालीं आणि विमान सुटलें. कॅंबेल जॉनसन म्हणतात, आमचें विमान पंजाबच्या सरहद्दीवरून चाललें असतां, खालीं प्रचंड आगी लागत असलेल्या आम्हीं पाहिल्या. तें दुश्चिन्ह होतें. हिंदुमुसलमानांच्या कत्तलीचा अग्नि पेटवला जात होता. पाकिस्तान स्थापन झालें !


* * *

३ : राजेंद्रबाबूंची गडबड व रिकामा लखोटा



मौंटबॅटन


ऑगस्ट महिना हा दिल्लींत जीव गुदमरून टाकणारा असतो. सारें वातावरण ढगांनीं आच्छादलेलें असतें. पाऊस पडत नाहीं व ऊनहि पडत नाहीं. ऑगस्ट महिन्यानें हिंदुस्थानांत बऱ्याच ठळक घटना घडविल्या. टिळकांचा मृत्यु; असहकारितेची सुरुवात; मॉटेग्युसाहेबांची घोषणा; ' हिंदुस्थान सोडा ' ही अंतिम चळवळ, स्वातंत्र्याची स्थापना व फाळणी ह्या साऱ्या



बाबू राजेंद्रप्रसाद

घटना ऑगस्टमध्येंच झाल्या. दिल्लीमध्यें स्वातंत्र्यसोहळा किती गाजला, दणाणला, याचीं वर्णनें अनेकांनीं केलीं आहेत. स्वातंत्र्य आलें होतें; तें अहिंसेनें आलें होतें. हिंदुस्थानची फाळणी मात्र रक्तपातानें पुरी झाली होती म्हणून स्वातंत्र्य-प्राप्तीच्या आनंदाला निर्भेळ आनंदाचा परिमल नव्हता. एका डोळ्यांत अश्रु व दुसऱ्या डोळ्यांत हसूं असा तो संमिश्र आनंद किंवा तें संमिश्र दुःख होतें. पण लोक मात्र स्वातंत्र्यानें वेडे झाले होते. चहूं-कडे जयजयकार चालला होता. रस्ते, दुकानें, चौक, घरेंदारें सारीं खच्चून सजवलीं होतीं. मेजवान्या, जेवणें, खाणेंसवरणें यांना मर्यादाच नव्हत्या. रस्त्यारस्त्यांतून लोकांच्या झुंडी हिंडत फिरत होत्या. आणि हा सोहळा फक्त दिल्लींत नव्हता; साऱ्या हिंदुस्थानांत साजरा होत होता.

त्या दिवशीं जर कोणाला खरें दुःख झालें असेल तर ब्रिटिश नोकर-शाहीला. त्या नोकरशाहीनें दीड-दोनशें वर्षें हिंदुस्थानवर एकछत्री राज्य केलें होतें. त्यांना वैभवाची व अभिमानाची वाटतील अशीं अनेक प्रतीकें त्यांनीं ह्याच देशांत निर्माण केलीं होतीं. आतां ते सर्व सोडून जातांना त्यांना



जवाहरलाल

किती दुःख झालें असेल याची कल्पनाच केली पाहिजे. वसाहत-स्वराज्य जर भारताला दिलें गेलें असतें तर ते तितके दुःखी झाले नसते. पण स्वातंत्र्य आलें आणि ब्रिटिशांचा सारा संबंध तुटला. एकहि गोरा माणूस अधिकारी म्हणून या देशांत राहणार नव्हता. पण ब्रिटिश माणूस जरी गेला, तरी त्यांनीं आपली संस्कृति, भाषा, शासनपद्धति वगैरे सर्व येथें ठेवून प्रयाण केलें. मुसलमानांना पाकिस्तानांत जातांना दुःख झालें नव्हतें. ते आनंदीच होते.

स्वातंत्र्य संस्थापनाचे ते दिवस असे संमिश्र भावनांनीं भारावलेले होते. जेव्हां मौंटबॅटन यांचें विमान कराचीहून पालम विमानतळावर १४ ऑगस्टला पोहोंचलें, तेव्हां शुकशुकाटाऐवजीं गजबजाट दिसत होता. आज कांहीं तरी अपूर्व घडतें आहे असें वृक्षवेली, पशुपक्षी यांनाहि वाटत होतें. मौंटबॅटन हे १४ तारखेच्या संध्याकाळपासून गंभीर विचारांत गढून गेले होते. ब्रिटिश साम्राज्याच्या अंताचा शेवटचा पडदा आपल्या हातून पडणार म्हणून ते खिन्न झाले होते. पण खिन्न होऊन काय करणार? त्यांना निरवानिरव करावयाची होती; औपचारिक विधि पार पाडावयाचे होते.

संध्याकाळ जसजशी संपत आली, तसतसा कामाचा बोजा वाढत गेला. भारत सचिवांना तार करून सत्तांतर झाल्याचें वेळेवर त्यांना कळवावयाचें होतें.

मौंटबॅटन एकटेच आपल्या खोलींत बसले होते. सत्तेचा अस्त होतांना त्यांच्याजवळ कोण बसणार ? सत्ता ज्यांच्या ताब्यांत जाणार होती, त्यांच्याकडे लोकांचे लोंढे लोटत होते. मौंटबॅटन यांच्या मनांतील कालवाकालव चित्रित करणारा त्यांच्याशिवाय दुसरा चित्रकार कोण असूं शकेल ?

३१ डिसेंबर १९२९ रोजीं रात्रीं बरोबर १२ वाजतां रावी नदीच्या कांठीं जी स्वातंत्र्याची प्रातिज्ञा केली होती त्या प्रतिज्ञेची पूर्ति १५ ऑगस्ट १९४७ रोजीं रात्रीं बरोबर १२ वाजतां होणार होती. त्याला नियतीचा संकेत असें जवाहरलालनीं म्हटलें. तो संकेत १८ वर्षांनीं पार पडण्याची मंगल घटिका जवळ येत होती. घटना-परिषदेची बैठक रात्रीचे वेळीं त्याचकरितां भरवली होती. त्या परिषदेनें दोन ठराव पास केले. पहिला ठराव भारत स्वतंत्र सार्वभौम राष्ट्र झाल्याचा व दुसरा ठराव लॉर्ड मौंटबॅटन यांना स्वतंत्र भारताचे पहिले ग. जनरल नेमल्याचा. हे दोन ठराव घेऊन राजेंद्रप्रसाद व जवाहरलाल नेहरू मौंटबॅटनकडे जाणार होते. राजेंद्रप्रसाद घटनापरिषदेचे अध्यक्ष होते व नेहरू पंतप्रधान होते. ते दोघेजण हे स्वातंत्र्याचा ठराव त्यांना निवेदन करणार होते व स्वतंत्र भारताचे पहिले ग. जनरल व्हा म्हणून पाचारण करणार होते.

मौंटबॅटन आपल्या टेबलाजवळ त्यांची वाट पाहात बसले होते. मध्यरात्रीं १२॥ वाजतां प्रसाद-नेहरू येतील अशी अपेक्षा होती. मौंटबॅटन हे अनासक्त वृत्तींत चालले होते. ब्रिटिश साम्राज्याचा अंत माझ्या हातून होत आहे याबद्दल जसें त्यांना दुःख होत होतें, तसेंच नवें हिंदी राज्य आपण निर्माण करीत आहोंत याचा त्यांना आनंद वाटत होता. सुख व दुःख, हर्ष व विषाद, यांच्या संमिश्र भावना त्यांच्या मनांत उद्भवल्या होत्या. कदाचित् त्यांच्या खिन्नतेला पाकिस्तान निर्मिति कारण झाली असेल. कारण तेच त्या निर्मितीचे जनक होते. मौंटबॅटन ह्यांनीं जरी स्वातंत्र्याचें उदक भारताच्या हातावर सोडलें, तरी आतां ती घटना इतिहासजमा झाली आहे. पण आपल्या कारकीर्दींत भारत स्वतंत्र झाला व आपण त्याला कारणीभूत झालों, याचा अभिमान त्यांना वाटत होता.

१४ तारखेला रात्रीं ते आपल्या कार्यालयांत बसून निरवानिरव करीत होते. व्हाइसरॉय हें पद त्या वेळेपासून रद्द होणार होतें. त्या अधिकारपदाचीं वस्त्रें, आभूषणें, चिन्हें, शिक्के, कागद ते एका पेटींत बंद करून ठेवीत होते. मौंटबॅटन त्या दोघां हिंदी नेत्यांची वाट पाहात जागत बसले होते. मधून मधून निरोप येत. गर्दी तुफान झाली आहे व त्या गर्दींतून वाट काढीत येण्याला उशीर होत आहे.

शेवटीं राजेंद्रबाबू व जवाहरलाल राष्ट्रपति-भवनांत आले. मौंटबॅटनची व त्यांची भेट झाली. औपचारिक गांठीभेटींची जागा मित्रत्वानें घेतली. तिघे-जण समोरासमोर उभे राहिले व नंतर आपापल्या जागांवर बसले. तो प्रसंगच इतका अभूतपूर्व होता कीं, गहिंवरलेल्या राजेंद्रबाबूंच्या तोंडून शब्दच उमटेना. आपण कशाकरितां आलों हेंहि क्षणभर ते विसरले. जवळ होते जवाहरलाल. त्यांनीं राजेंद्रबाबूंना उच्चारावयाचीं वाक्यें सांगण्यास सुरुवात केली. राजेंद्रबाबू गोंधळले होते. त्यांनीं पुटपुटत तीं वाक्यें उच्चारलीं. घटना-परिषदेनें ठराव करून तुम्हांला पहिले ग. जनरल नेमलें आहे एवढेंच त्यांना सांगावयाचें होतें. तें सांगितलें गेलें. मौंटबॅटननीं ग. जनरलची जागा देऊं केल्याबद्दल कृतज्ञता व्यक्त केली व ती जागा पत्करल्याचें त्या दोघांना कळविलें. मौंटबॅटन हसत हसत म्हणाले, 'मला हा मान दिल्याबद्दल अभिमान वाटतो. मी तुमचा सल्ला सनदशीरपणें अंमलांत आणण्याचा जास्तींत जास्त प्रयत्न करीन.'

हा संदेश पोहोंचल्यावर पुढें काय ? फोटोग्राफर्सच्या सेनेनें अनेक फोटो घेतले. बातमीदारांनीं टिपणें केलीं. पण त्या तिघांच्या तोंडून शब्द उमटत नव्हते इतका तो गंभीर प्रसंग होता. चहापान झालें नाहीं. पुष्पगुच्छ, हार-तुरे वगैरेंचा तेथें मागमूस नव्हता. रात्र पेंगुळली होती. दुसऱ्या दिवसाची पहाट हिंदुस्थान स्वतंत्र झाल्याची भूपाळी म्हणत उजाडणार होती. त्या संक्रमणांत नव्हतें वैर; नव्हती औपचारिकता; नव्हता थाटमाट; सारें कसें सृष्टिक्रमानें होत आहे असें वाटत होतें. बाहेर मात्र लोकांच्या घोषणा होत होत्या.

किती वेळ त्यांत घालवणार ? शेवटीं जवाहरलाल उठले व आपल्या हातांतला एक लठ्ठ सीलबंद लखोटा मौंटबॅटनच्या हातीं देऊन

समारंभपूर्वक म्हणाले, ‘ मी नव्या मंत्रिमंडळाची नांववार खात्यांची यादी आपल्याला देऊं का ? ’ मौंटबॅटननीं तो लखोटा हातीं घेतला. हा सारा समारंभ दहा मिनिटांच्या आंत संपला. पण तो क्षण उजाडण्याकरितां १५०।२०० वर्षांचा इतिहास घडावा लागला.

कॅम्बेल जॉनसन लिहितात, “ सर्वजण निघून गेल्यावर मी एकटाच मौंटबॅटनजवळ राहिलों. कांहीं तासांच्या आंतच नव्या मंत्र्यांचा शपथविधि होणार होता. त्या लखोट्यांत उभयतांमध्यें पूर्वींच ठरलेलीं नांवें आहेत कीं नाहींत हें पाहण्याची जिज्ञासा मौंटबॅटन यांना झाली. त्यांनीं तो लखोटा फोडला आणि त्यांत काय होतें ? तो लखोटा रिकामाच होता. ” जवाहरलालजींनीं जी यादी मी देतों असें नव्या ग. जनरलना सांगितलें ती यादी कुठें होती ! लखोट्यांत कांहींच नव्हतें. हिंदुस्थानच्या नव्या शासनक्षमतेचा तो पहिला आदर्श होता. सेक्रेटरी असो, कारकून असो, तेहि आनंदानें इतके बेभान झाले होते कीं, त्यांनीं नांवें असलेला कागद आंतमध्यें घातलाच नाहीं. तीं नांवें मौंटबॅटनना दुसऱ्या दिवशीं पहावयास सांपडलीं. हिंदुस्थानच्या स्वातंत्र्याचा श्रीगणेशा असा सुरू झाला.

* * *

४ : पठाणी मुलाखत

१४ ऑगस्ट १९४७ रोजीं पाकिस्तान स्थापन झालें. सरहद्द प्रांतांत डॉ. खानसाहेब यांचें मंत्रिमंडळ होतें. तें कॉंग्रेस पक्षाचें होतें. सरहद्द प्रान्त पाकिस्तानांत जातां कामा नये, तो स्वतंत्र राहिला पाहिजे असें खुदाई खिदमतगारांचे पुढारी खान अब्दुल गफार खान, मुख्य मंत्री डॉ. खानसाहेब व इतर अनेकांचें म्हणणें होतें. पण त्यांचें ऐकतो कोण? मुख्य मंत्र्यांचीं व मंत्रिमंडळाचीं मतें धुडकावून सरहद्द प्रांत पाकिस्तानांत घालणें हें अयोग्यच झालें असतें. या अडचणींतून मार्ग काढण्याकरितां जनमत घ्यावें असा डाव टाकण्यांत आला. जेथें मंत्रिमंडळ अनुकूल होतें तेथें जनमत घेतलें गेलें नाहीं. जनमत घेण्याच्या विरुद्ध खुदाई खिदमतगार संघटना होती, पण तिला कॉंग्रेसचा पाठिंबा नव्हता; मग जीना व ब्रिटिशांचा पाठिंबा कोठून मिळणार?

जनमत घ्यायचेंच असेल तर त्यांत तीन प्रश्न असावेत. एक तुम्हांला पाकिस्तानांत जायचें का, दुसरा तुम्हांला हिंदुस्थानांत जायचें का आणि तिसरा स्वतंत्र पठाण राज्यांत राहायचें का? असे तीन प्रश्न असावेत हें खुदाई खिदमतगारांचें म्हणणें; पण स्वतंत्र राहण्याचा प्रश्नच मतपत्रिकेंत घातला गेला नाहीं. बादशहा खान यांची संरक्षण, परराष्ट्रीय संबंध व दळणवळण पाकिस्तानकडे द्यावयास हरकत नव्हती. स्वतंत्र पख्तुनीस्तानचा त्यांचा अर्थ इतका मर्यादित होता, पण त्यांचें म्हणणें व्यर्थ गेलें.

जनमत घेण्याला ६ जुलै १९४७ रोजीं सुरुवात झाली. १८ जुलैला

मतमोजणी पुरी झाली. सर ओलॅफ कॅरो हे त्या प्रांताचे गव्हर्नर होते. ते लीगच्या बाजूचे होते. त्यांना रजेवर पाठविलें व मतदान सर रॉबर्ट लॉकहार्ट या लष्करी अधिकाऱ्याच्या देखरेखीखालीं केलें गेलें. खुदाई खिदमतगारांनीं त्या जनमत घेण्यावर बहिष्कार घातला होता. निकाल लागला, त्यांत २,८९,२४४ मतें पाकिस्तानच्या बाजूला; व २८७४ हिंदुस्थानच्या बाजूला पडलीं. सरहद्द प्रांत पाकिस्तानांत जाण्याचें ठरलें. बादशहा खान खिन्न होऊन स्वस्थ बसले. त्यांना जर कोणी पाठिंबा दिला असेल तर गांधींनीं. गांधी म्हणाले, ' जर तुम्हांला पाकिस्तानांत योग्य रीतीनें वागविलें नाहीं, तुमचा छळ केला, तर मी स्वतंत्र हिंदुस्थानला तुम्हांला मदत करण्यास सांगेन. '* " पण अहिंसेचें काय ? " असा प्रश्न गफारखानांचे चिरंजीव घानी यांनीं विचारला. गांधी म्हणाले, ' मी अनत्याचारी आहें, सरकार नाहीं.'

× × ×

१४ ऑगस्टला पाकिस्तान निर्मितीच्या समारंभांत सरहद्द प्रांतांतील लोकांनीं फारसा उत्साह दाखविला नाहीं. १५ ऑगस्टला सर्व सरकारी इमारतींवर पाकिस्तानी निशाणें लावण्यांत आलीं. खुदाई खिदमतगारांनीं इतका संयम त्या वेळीं दाखविला कीं, त्यांनीं त्या कार्यक्रमांत कोठेंहि अनुचित प्रकार केला नाहीं.

१५ ऑगस्टला जुने गव्हर्नर सर कॅरो जाऊन, त्यांच्या जागीं सर जॉर्ज कनिंगहॅम हे नवे गव्हर्नर येणार होते. त्यांचा शपथविधि होणार होता. डॉ. खानसाहेब हे मुख्य मंत्री होते. त्यांना कनिंगहॅमनें कसें तुच्छतेनें वागविलें हें नमूद करण्यासारखें आहे. कनिंगहॅमनीं आपल्या शपथविधीच्या वेळीं त्यांना समारंभाला आमंत्रण दिलें. पण डॉ. खानसाहेबांना पाकिस्तानला मी राजनिष्ठ राहीन अशी शपथ घेण्यास सांगितलें जाणार नाहीं असें कळविलें. त्यामागें कुटिल कारस्थान होतें व तें लवकरच उघड झालें.

डॉ. खानसाहेबांना समारंभ पाहण्यास बोलावलें, तेव्हांच त्यांना असें कळविण्यांत आलें कीं, शपथसमारंभानंतर ध्वजवंदनाचा कार्यक्रम होणार आहे. त्या ध्वजवंदनाला तुम्ही व तुमचे सहकारी हजर राहणार आहांत का ? डॉ.खानसाहेबांनीं उत्तर पाठविलें, ' अर्थातच, त्याहि समारंभाला आम्ही हजर राहूं. '

* पान ४२५ Abdul Gaffar Khan by D. G. Tendulkar.



डॉ. खानसाहेब

हें होकारार्थी उत्तर आल्यावर गव्हर्नरसाहेब जरा अडचणींतच सांपडले. त्यांनीं खानसाहेबांना कळविलें कीं, 'हा ध्वजवंदनाचा कार्यक्रम मुस्लिम लीगच्या राष्ट्रिय संरक्षक दलाच्या देखरेखीखालीं होणार आहे. तेव्हां तुम्ही स्वतःच्या जबाबदारीवर तेथें हजर राहिलें पाहिजे. सरकारतर्फे तुमच्या रक्षणाची व्यवस्था होणार नाहीं. मी गव्हर्नर म्हणून तुमच्या सुरक्षिततेला जबाबदार असणार नाहीं.'* डॉ. खानसाहेबांना वाटलें यांत कांहीं तरी कुटिल कारस्थान दिसतें. आपल्याला टाळण्याचा हा तर प्रयत्न आहेच; पण जर आपण हजर राहिलों तर जीवावरहि बेतण्याची शक्यता आहे. आणि जरी कोणी खुनी हल्ला केला नाहीं, तरी मारहाण, ढकलाढकल, कपड्याची फाडाफाड, अपमान वगैरे खासच होईल. विरोधी घोषणा झाल्याशिवाय राहणार नाहींत. हें सर्व आपण टाळलें पाहिजे असा निर्णय त्यांनीं घेतला व ते व त्यांचे सहकारी मंत्री समारंभाला गेले नाहींत.

ज्या घटनेला ब्रिटिश लोक पवित्र मानतात, त्या घटनेचा हा उपमर्दच

* अबदुल गफार खान–ले. तेंडुलकर–पान ४५०

होता. घटना-भंग आणखी कोणता असूं शकतो ? गव्हर्नरनें जर १९३५ च्या कायद्याच्या ९३ कलमाप्रमाणें राज्य आपल्या ताब्यांत घेतलें असतें, तर मुख्य मंत्री जागेवरच राहिला नसता; मग त्यांनीं शपथ घेण्याचा प्रश्नच उरत नव्हता. हें घटनाबाह्य वर्तन लवकरच दुरुस्त करण्यांत आलें. २२ ऑगस्ट १९४७ रोजीं गव्हर्नरसाहेबांनीं डॉ. खानसाहेब यांचें मंत्रिमंडळ बडतर्फ केलें. त्यांच्या जागीं अबदुल कायम यांचें मांत्रिमंडळ स्थापन केलें. हीहि खांदेपालट घटनाबाह्यच होती. जर खानसाहेबांच्या मंत्रिमंडळावरील विश्वास नष्ट झाला असें गव्हर्नरांना विधानसभेची बैठक बोलावून व मतें घेऊन सिद्ध करतां आलें असतें तर निराळी गोष्ट होती. पण त्यांनीं धडधडीत घटनाबाह्य वर्तन केलें.

१५ ऑगस्टला सरहद्द प्रांतांत अशा प्रकारें पाकिस्तानचें राज्य बळजबरीनें स्थापन झालें. लोकांत नव्हता उत्साह, नव्हती आत्मीयता. हुकूमशाही राजवटीचा तो दिवस होता.

* * *

५ : सुभाषबाबू स्वातंत्र्य स्थापतात

सुभाषचंद्र बोस यांनीं भारतीय स्वातंत्र्याची स्थापना १५ ऑगस्ट १९४७ पूर्वीच केली होती, ही गोष्ट विसरून जाणें शक्य नाहीं. गांधींसह सर्व भारतीय पुढाऱ्यांनीं हिंदुस्थानांत प्रतिकार, झगडे, लढे, आंदोलनें केलीं; पण हिंदुस्थानबाहेर जाऊन सैन्य जमवून, स्वातंत्र्य पुकारून, हिंदुस्थानला पारतंत्र्यांत ठेवणाऱ्या ब्रिटिशांविरुद्ध युद्ध पुकारणारा सुभाष बोस हा एकटाच निधडा नेता निघाला.

१९४१ चा जानेवारी महिना. दुसरें महायुद्ध सुरू होऊन दीड वर्ष झालें होतें. सुभाषबाबूंना कोण मोकळें ठेवणार ? त्यांना पकडलें; पण प्रकृतीच्या कारणाकरितां त्यांना कलकत्त्याला त्यांच्याच घरीं अटकेंत ठेवलें. सुभाषबाबू अस्वस्थ होते. जर्मनीची मदत घेऊन हिंदुस्थानवर स्वारी करावी अगर करवावी अशा त्यांच्या कल्पना. ते घरीं अटकेंत असतां जानेवारी १९४१ मध्यें पोलिसांना चकवून घरांतून निसटले. त्यांनीं मौलवीचा वेष घेतला. ते प्रथम पेशावरला, तेथून काबूल व काबूलहून मॉस्कोला गेले. मॉस्कोहून ते जर्मनीला पोहोंचले. जर्मनींत त्यांनीं ब्रिटिशांविरुद्ध लढण्याकरितां हिटलरची मदत मागितली. जर्मनींत जे हिंदी कैदी आणले होते, त्यांची आझाद हिंद फौज त्यांना उभारावयाची होती. ती फौज त्यांनीं उभारली. पण ती लढणार कशी व कोठून ? कुठें जर्मनी, कुठें हिंदुस्थान ? पण १९४१ च्या डिसेंबर महिन्यांत दुसरें महायुद्ध पॅसिफिक महासागराच्या विभागांत फैलावलें. जपान ब्रिटिशांविरुद्ध लढूं लागला. ब्रिटिश सरकार

युरपमधील पराभवामुळें बेजार झालें होतें. त्यांना जपानविरुद्ध टिकाव धरणें कठीण होत होतें. अशा वेळीं जर आपण पूर्व आशियांत गेलों व मलाया, सिंगापूर व ब्रह्मदेशमधील हिंदी सैनिकांचें सैन्य उभारलें तर ब्रह्मदेशांतून हिंदुस्थानवर चाल करून जातां येईल असा विचार त्यांनीं केला.

१९४२ च्या फेब्रुवारींत जपाननें सिंगापूर जिंकलें. ब्रिटिशांनीं मलाया सिंगापूरच्या रक्षणाकरितां जे २०,००० हिंदी सैन्य आणलें होतें, तें जपान-पुढें टिकलें नाहीं. ते २०,००० सैनिक ब्रिटिशांनीं जपानच्या ताब्यांत युद्ध-कैदी म्हणून देऊन टाकले ! हे २०,००० सैनिक व आणखी १०,००० हिंदी नागरिक सैनिक म्हणून उभे करून ३०,००० ची सेना सिंगापूरला तयार झाली. त्यांच्या तीन डिव्हिजन्स केल्या गेल्या. ही सारी पराक्रमी कामगिरी रासबिहारींनीं केली. हे रासबिहारी ३० वर्षें जपानमध्यें राहात होते. एवढी जय्यत तयारी झाल्यावर रासबिहारींनीं सुभाषबाबूंना आशियांत या असा निरोप पाठविला. सुभाषबाबूंना जर्मनीनें एका पाणबुडींतून सिंगापूरला रवाना केलें. तो ९० दिवसांचा धाडसी प्रवास होता. सुभाषबाबू सिंगापूरला सुखरूप पोहोंचले.

१९४३ च्या जून महिन्यांत सुभाषजी टोकिओला गेले. जपानला आपले बेत कळविले. त्यांची संमति मिळवून ते २ जुलै रोजीं सिंगापूरला परतले. ३ जुलै रोजीं त्यांनीं ‘ चलो दिल्ली ’ ही घोषणा केली. आझाद हिंद सैन्यांत थायलंड, मलाया, इंडोचीन वगैरे देशांतील हिंदी नागरिक होते. १९४३ ऑक्टोबरच्या २१ तारखेला त्यांनीं हंगामी स्वतंत्र सरकारची स्थापना केली. या आझाद हिंद सरकारनें ब्रिटिशांविरुद्ध युद्ध पुकारलें. या सरकारला ९ राष्ट्रांनीं मान्यता दिली. त्यांत जपान, जर्मनी, इटली हे ब्रिटिशविरोधी देश होते.

जपान तें युद्ध जिंकत होता. त्याची सरशी होत होती. त्यानें अंदमान, निकोबार बेटें जिंकलीं होतीं. हीं बेटें ६ नोव्हेंबर १९४३ रोजीं ह्या आझाद हिंद सैन्याच्या ताब्यांत जपाननें दिलीं. त्या स्वतंत्र हिंदुस्थानच्या बेटांवर सुभाषबाबूंनीं ३१ डिसेंबर १९४३ रोजीं पदार्पण केलें. सुभाषबाबूंच्या, आझाद हिंद सैन्याच्या व सरकारच्या जीवनांत तो केवढा भाग्याचा दिवस ! अंदमानमध्यें स्वतंत्र हिंदुस्थान स्थापन झालें.



सुभाषबाबू

ह्या आझाद हिंद सरकारनें आपली मुख्य कचेरी रंगूनला स्थापन केली. रंगूनहून ही स्वतंत्र भारताची सेना परतंत्र हिंदुस्थानला स्वतंत्र करण्याकरितां स्वारी करणार होती. रंगूनहून भारताची सरहद्द जवळ होती. त्या काळांत सुभाषबाबूंनीं पैसा कोठून आणला, दारूगोळा किती मिळविला, अधिकारी कसे निवडले हें एक चमत्कारिक गूढ आहे. त्याग, सेवा व समर्पण हीं त्यांचीं जीवनतत्त्वें होतीं. मरण्याची त्यांना भीति नव्हती. ते देशभक्त नव्हते, देशवेडे होते.

रंगूनहून ही भारतसेना १८ मार्च १९४४ रोजीं भारतावर स्वारी करण्याकरितां बाहेर पडली. हिंदुस्थान बंड करून उठेल अशी त्यांची कल्पना होती. पण ती खरी ठरली नाहीं. हिंदी नेते तुरुंगांत होते व जे बाहेर होते ते कसले बंड करतात ? गांधीवाद त्यांच्यांत नव्हता व त्यांचे वीर पुरुष हतवीर्य झाले होते. जे कायदेभंगाच्या लढ्यांत होते ते दमले, थकले होते; आणि ताजेतवाने असते तरी कांहीं करणार नव्हते.

सुभाषबाबूंनीं हिंदुस्थानवर चाल केली. आठ सरहद्दींवर आझाद सेना लढत होती. इम्फाल व कोहिमा येथें लढाई चालू होती. हिंदी सैनिक हे कसलेले लढवय्ये होते. त्यांनीं इम्फाल जवळजवळ सर करीत आणला होता. कांहीं तासांच्या आंत तो पडेल अशी परिस्थिति होती. इतक्यांत ब्रिटिशांनीं आपली सर्व शक्ति एकवटून इम्फाल वांचविण्याचा निर्धार केला.

ते दिवस जून-जुलैचे होते. भयंकर पाऊस पडत होता. आझाद फौजांना पुढें जाणें अशक्य झालें. ब्रिटिशांनीं विमानांच्या छत्राखालीं प्रतिहल्ले सुरू केले. ब्रिटिश फौजा रंगूनपर्यंत आझाद फौजेला मागें रेटणार होत्या. हिंदी सैन्याजवळ कुठलीं विमानें ? विमानांच्या पुढें टिकाव धरणें हिंदी फौजांना अशक्य झालें. हिंदी फौजा मागें हटल्या.

रंगूनहून नेताजी युद्धाचें संचलन करीत होते. त्यांचें एक मंत्रिमंडळहि होतें. त्या मंत्रिमंडळाची सभा झाली व त्या सभेंत नेताजींनीं रंगूनला राहणें धोक्याचें आहे असें ठरलें. हिंदी फौजेची पिछेहाट झाली यांत काय आश्चर्य ! तें सैन्य वर्ष सहा महिने लढत राहिलें हेंच आश्चर्य.

नेताजी मे १९४५ मध्यें बँकॉकला पोहोंचले. मे महिन्यांतच जर्मनी शरण गेला. काळ कठीण होता. जपान लढत होता व जपान विजयी झाला असता तर हिंदुस्थानहि स्वतंत्र झाला असता. पण ऑगस्ट १९४५ मध्यें जपानहि पराभूत झाला. त्यांच्या पराभवाबरोबर आझाद हिंद सेनेचें युद्ध संपलें. सुभाषबाबू हे सिंगापूर, बँकॉक, सायगांव, फोर्मोसा या मार्गानें जपानला चालले असतां, त्यांना नेणारें विमान फोर्मोसाला कोसळलें व त्यांत त्यांचा अंत झाल्याचें जपान रेडिओनें जाहीर केलें. १८ ऑगस्ट १९४५ चा तो दुर्दिन होता.

पुढें आझाद हिंद सैन्याच्या अधिकाऱ्यावर दिल्लीच्या लाल किल्ल्यांत खटले झाले. जवाहरलाल त्यांच्या बचावाकरितां भुलाभाई देसाई प्रभृति वकिलांबरोबर कोर्टांत जात. पुढें १५ ऑगस्टला भारत स्वतंत्र झाला व हे खटले काढून घेतले गेले. शहानवाज, जगन्नाथराव भोसले, धीलन, लक्ष्मीबाई वगैरे त्यांचे साथी आपल्या शौर्य-धैर्यानें गाजले.

आझाद फौजेचा पराभव झाला असला तरी भारताचें स्वातंत्र्य जवळ आणण्यास तो पराभव एका दृष्टीनें उपयुक्त ठरला. ब्रिटिशांचा हिंदी सैन्यावर जो अनेक वर्षें विश्वास होता, त्या विश्वासाला तडे गेले. हिंदी

सैन्य विश्वासार्ह नाहीं हें या घटनेनें दाखवून दिलें. कोणाच्या जीवावर हिंदुस्थानवर राज्य करावें असा प्रश्न ब्रिटिश मुत्सद्द्यांपुढें पडला असला व त्यांनीं भारताला स्वातंत्र्य दिलें असलें तर तो उपकार नव्हता. ती काळाची गरज होती. *

* * *

* आधारः—एस्. ए. अय्यर, प्रस्तावना—सुभाषबाबूंचीं निवडक भाषणें.

६ : नाविकांचें बंड

दुसरें महायुद्ध संपल्यावर ब्रिटिशांना हिंदी सैनिकांची काय किंवा नाविकांची काय जरुरीच उरली नव्हती. त्यांच्यामुळेंच आपण युद्ध जिंकूं शकलों हीहि गोष्ट ते सोईस्करपणें विसरूं लागले. आरमारी दलांतील जवानांनीं व अधिकाऱ्यांनीं तें युद्ध यशस्वी करण्यांत फारच मोठी कामगिरी केली. त्यांचें कौतुक गोरे अधिकारी करीत नव्हते, एवढेंच नव्हे तर त्यांना शिव्या देत, तुच्छ लेखत. याशिवाय ब्रिटिश नाविक व हिंदी नाविक यांच्यांत विषमता असे. ब्रिटिशांना तिप्पट पगार मिळे. त्यांचे कपडे, राहण्याची सोय वगैरेहि चांगल्या प्रकारची असे. हिंदी नाविकांना हा भेदाभेद असह्य होऊं लागला. त्यांनीं आपल्या प्रतिनिधींतर्फे आपलीं गाऱ्हाणींहि ब्रिटिशांपुढें मांडलीं. पण त्यांची दाद कोण घेतो ? एकतर युद्ध संपलें होतें व दुसरें ब्रिटिश, हिंदुस्थान सोडण्याच्या बेतांत होते. तेव्हां ही उपेक्षा चालली होती.

१८ फेब्रुवारी १९४६ चा दिवस उजाडला. त्या दिवशीं 'तलवार' नांवाच्या युद्धनौकेवरील नाविकांनीं आपल्या मागण्या अधिकाऱ्यांपुढें ठेवल्या. मुंबईस हा प्रकार व हें बंड झालें. अधिकाऱ्यांनीं त्या मागण्या फेटाळून लावल्या. तलवार जहाजावर १००० नाविक होते. त्यांनीं आपल्या मागण्या अमान्य झाल्यामुळें संप पुकारला. १९ फेब्रुवारीला हे नाविक मुंबई शहरांत शिरले. या नाविकांना सहानुभूति दाखविण्याकरितां आरमारी जहाजांवरील अनेक सैनिकांनीं संपाचा पुकारा केला. एकूण संपवाल्यांची संख्या २०,००० इतकी झाली.

मुंबईच्या कोट विभागांत शिरलेल्या नाविकांचा रोख तेथील गोऱ्यांच्यावर व त्यांच्या दुकानावर होता. १९ फेब्रुवारीला या बंडवाल्यांनीं कोट विभागांत धुमाकूळ घातला. धावपळ, लुटालूट वगैरेला ऊत आला. मुंबईत त्या वेळीं काँग्रेस प्रभावी होती. काँग्रेस कार्यकर्त्यांनीं ही दंगल शमविण्याचा प्रयत्न केला. ती दंगल फारशी पसरली नाहीं.

१९ फेब्रुवारीच्या सायंकाळपर्यंत आरमारी जहाजावर तिरंगी झेंडे फडकूं लागले. कोटांतल्या मोटारीवर असेच झेंडे लावण्यांत आले. ' जय हिंद ' च्या घोषणा होऊं लागल्या. कांहीं लॉऱ्यांवर जय हिंदचे फलकहि बसविण्यांत आले.

२० फेब्रुवारी १९४६ चा दिवस शांततेंत गेला. पण ब्रिटिश अधिकारी बंडवाल्यांचीं गाऱ्हाणीं विचारांत घेईनात, एवढेंच नव्हे, तर त्यांना अटकेंत ठेवूं लागले. २१ फेब्रुवारी हा दिवस महत्त्वाचा होता. त्या दिवशीं बंडानें उग्र स्वरूप धारण केलें. २०,००० हिंदी नाविकांनीं किनाऱ्यावरील ब्रिटिश लष्करावर आपापल्या जहाजांवरून तोफांचा भडीमार केला. ब्रिटिश लष्करानें उलट गोळीबार सुरू केला. सात-आठ तास हें घनघोर युद्ध चालूं होतें. हिंदी नाविकांनीं किनाऱ्यावरील लष्करी पहारे उठवले नाहींत, तर आम्ही मुंबई शहरावर तोफा डागूं असा इषाराहि दिला. दुपारीं साडेचार वाजतां तड-जोडीचीं बोलणीं सुरू झालीं. नाविकांची पहारे उठवण्याची मागणी मान्य केली गेली व गोळीबार थांबला. तो कायमचाच थांबला. ८ तासांचें हें प्रत्यक्ष युद्ध होतें, तरी त्यानें आरमारावरील ब्रिटिशांचा विश्वास डळमळीत केला. या बंडांत १८५ लोक ठार झाले व जखमी झालेल्यांची संख्या ९९८ वर होती. पण हे आंकडे कमी आहेत. २० तारखेला नाविकांचें बंड थांबलें; पण २२ तारखेला तें पुनः पेटलें व मुंबईतील गुंड, मवाल्यांचें राज्य सुरू झालें. त्यांनीं दुकानें लुटलीं, जाळलीं, बसेसना आगी लावल्या, पोस्ट-ऑफिसें जाळलीं व मुंबईत दहशतीचें वातावरण निर्माण केलें. सरदार वल्लभभाई पटेल हे तेव्हां मुंबईत आले होते. त्यांनीं व काँग्रेसच्या पुढाऱ्यांनीं दंगल व बंड थांबविण्या-करितां यशस्वी प्रयत्न केले. सरदारांनीं नाविकांना उद्देशून एक पत्रक काढलें व बंड थांबविण्यास सांगितलें. त्यांचीं गाऱ्हाणीं दूर करण्याचेंहि त्यांना कळ-विण्यांत आलें. त्याचा परिणाम झाला. या बंडांत व दंगलींत लाखों रुपयांची लुटालूट झाली व विध्वंस झाला. रेटिंग्सचें हें बंड अशा रीतीनें संपलें.

* * *

७ : फाळणी कां मान्य केली ?

हिंदुस्थानच्या फाळणीचा प्रश्न हा याहि पुढें एक चर्चेचा विषय होऊन जर राहिला तर आश्चर्य नाहीं. हिंदी पुढाऱ्यांना फाळणी नको होती व कांहीं ब्रिटिश नेत्यांना सुद्धां हिंदुस्थान अखंड राहावयास पाहिजे होता. पण मुस्लिम लीग व जीना हे " प्रथम फाळणी व नंतर स्वातंत्र्य " असें अडवणुकीचें धोरण घट्टपणें धरून बसले होते. शेवटीं फाळणी झाली. ती जीनांच्या हटवादीपणामुळें झाली नाहीं; गांधी, नेहरू, पटेल यांच्या संमतीनें झाली नाहीं; पण परिस्थितीच अशी घडून अगर घडवून आणली गेली कीं, फाळणीशिवाय गत्यंतरच उरलें नाहीं.

सरदार पटेल, जवाहरलाल नेहरू, आचार्य कृपलानी या तिघांच्या वक्तव्यांतून फाळणीचीं कारणें उपलब्ध होतात.

नोव्हेंबर १९४७ च्या दुसऱ्या आठवड्यांत सरदार वल्लभभाई यांनीं छत्तीसगड संस्थानच्या प्रतिनिधीपुढें नागपूरला एक भाषण केलें. त्या भाषणांत त्यांनीं पडद्यामागें ज्या घडामोडी चालल्या होत्या त्याची माहिती सांगितली. या घडामोडींमुळेंच मी फाळणीला तयार झालों असें ते म्हणाले. बस्तर संस्थानांत नैसर्गिक संपत्ति विपुल आहे. ह्या बस्तर संस्थानचे गोरे पोलिटिकल एजंट साहेब बस्तरची सारी नैसर्गिक संपत्ति वारस मुलगा अज्ञान असल्यामुळें निजामकडे लांब मुदतीनें गहाण टाकण्याच्या बेतांत होते. पटेलांनीं जेव्हां हंगामी मंत्रिमंडळांत प्रवेश केला, तेव्हांची ही गोष्ट. सरदारांनीं ही गहाणाची कारवाई होऊं द्यावयाची नाहीं असें ठरविलें.

प्रथम पोलिटिकल खातें पटेलांना विरोध करूं लागलें. पण त्या खात्याला जेव्हां सरदारांनीं चांगला दम भरला तेव्हां त्या खात्यानें कागदोपत्रीं झालेले करारमदार रद्द केले.


सरदार म्हणाले,

' पोलिटिकल खात्याच्या कारवायांमुळें आमचे हितसंबंध कसे धोक्यांत आणले जात आहेत, याची मला एकदम जाणीव झाली. त्याच वेळीं मी ह्या निर्णयाला आलों कीं, या सरकारच्या तावडींतून जितक्या लवकर सुटतां येईल तितकें चांगलें. त्याच वेळीं मी याहि निर्णयाला आलों कीं, त्याकरितां सर्वांत चांगला मार्ग जर कोणता असेल, तर या परक्या लोकांना येथून जलदीनें घालविण्याकरितां देशाची फाळणीहि कबूल करावी. ' सरदार फाळणीच्या या निर्णयाला संक्रमणकालीन मंत्रिमंडळांत असतांना आले. पण याहिपेक्षां त्यांच्या असहाय्यावस्थेचीं आणखी वर्णनें त्यांनींच केलीं आहेत.

२५ नोव्हेंबर १९४८ रोजीं बनारस हिंदु विद्यापीठांत भाषण करतांना ते म्हणतात, " मला वाटलें कीं, जर आम्ही फाळणी मान्य केली नाहीं, तर हिंदुस्थानचे तुकडे तुकडे होतील; आणि देशाचा नाश होईल. माझ्या एक वर्षाच्या अधिकारपदाच्या अनुभवानें माझी अशी खात्री पटली कीं, ज्या पद्धतीनें आम्ही काम करीत आहों, तीमुळें देशाचा नाश होणार आहे. त्यानंतर येथें एकच पाकिस्तान राहणार नसून अनेक पाकिस्तानें निर्माण होतील. सरकारी कचेऱ्यांतील प्रत्येक खात्यांत पाकिस्तान विभाग होईल. "

१९४९ च्या नोव्हेंबरांत घटना-परिषदेपुढें भाषण करतांना सरदार म्हणाले, " हंगामी सरकारांत ब्रिटिशांनीं दोन हुकमी एक्के आपल्या हातीं ठेवले होते. राखीव सत्ता व नोकऱ्यांवर ताबा; आणि दुसरा संस्थानासंबंधीं अधिराज्याचे हक्क. "

नंतर त्यांनीं पंजाबमधील घडलेला प्रकार सांगितला. ते म्हणाले, " ज्या पंजाबच्या पांच जिल्ह्यांत भयंकर प्रकार घडले, त्या जिल्ह्याचा मुख्य अधिकारी ब्रिटिश गृहस्थ होता. त्यांना बदलणें शक्य झालें नाहीं. गुरगांवच्या जिल्हा मॅजिस्ट्रेटला मला बदलतां आलें नाहीं. तेथील ब्रिटिश अधिकाऱ्यानें कॉंग्रेस पुढाऱ्यांना पकडून ओलीस म्हणून तुरुंगांत ठेवलें होतें. तेथील वकीलसंघानें त्यांच्या सुटकेकरितां जो अर्ज केला, त्यावर मॅजिस्ट्रेटसाहेबांनीं त्यांना ओलीस



वल्लभभाई

म्हणून ठेवलें आहे, असा निर्लज्जपणें शेरा मारून ठेवला. मीं त्याला विचारलें, " त्यांना तुम्ही ओलीस म्हणून ठेवलें का ? " ते म्हणाले, " छे छे, कोणी तुम्हांला हें सांगितलें ? " सरदारांनीं त्याच्याच हातचा शेरा दाखविला. " तुम्हांला कोठून हा कागद मिळाला ? " असा उलटा सवाल त्यांनीं सरदारांना विचारला. सरदारांनीं त्याला चांगलें खडसावलें. त्याला बदलण्याचा पुष्कळ प्रयत्न केला, पण व्यर्थ ! अशी सरदारांची गृहखात्याची सत्ता होती ! पण असे प्रकार साऱ्या देशांतच सुरू झाले. " हिंदुस्थान हातून जाण्याची वेळ आली, त्या वेळीं आम्ही हट्ट धरला कीं, सारी सत्ता ताबडतोब आमचे हातीं आली पाहिजे. आम्ही राजीनामे देण्यास तयार झालों. त्या वेळीं लॉर्ड मौंटबॅटन आले. ... मी सर्वस्व नाशाऐवजीं पाकिस्तान होण्याला तयार झालों. पंजाब-बंगालची फाळणी आम्ही मागितली. "

जीनांना सारा पंजाब व सारा बंगाल पाकिस्तानांत जावयास पाहिजे होता. तो आमच्या पुढाऱ्यांनीं वांचविला. जीना म्हणूं लागले, " मला असा कृमि-कीटकांनीं खाल्लेला पाकिस्तान नको. " पण जीनांचें ऐकलें गेलें नाहीं. संस्थानांचा प्रश्नहि सोडवून घेण्यांत आला.

परिस्थिति किती गंभीर होती याचें वर्णन त्या वेळीं एका दैनिकांत आलें



आचार्य कृपलानी

होतें. त्या पत्रांत असें म्हटलें होतें कीं, जे पंजाब व सरहद्द प्रांतांत प्रत्यक्ष कृतीचे प्रकार झाले, तेच दिल्लीस करावयाचा घाट होता. ' भारत सरकारच्या दळणवळण खात्यानें दिल्लीच्या टेलिफोन व्यवस्थेंतील सर्व उच्च जागांवरील युरोपिअन्स, हिंदु व शीख अधिकारी काढून टाकले व तेथें सारे मुसलमान नेमले. " या कारवाईचा उद्देश आणीबाणीचे प्रसंगीं दिल्ली व हिंदुस्थानचा संबंध तोडून टाकावा व तो मुसलमानांच्या नियंत्रणाखालीं आणावा असा होता.

पोलिस, माहिती व संरक्षण हीं खातीं मुस्लिम लीगच्या अगर त्यांच्या पुरस्कर्त्यांच्या हातीं गेलीं. याहिपेक्षां लीगचें जाळें अधिक पसरलें होतें. हिंदुस्थानांत चोरून लपून परदेशचे लष्करी सैनिक घुसूं लागले होते. दारूगोळा, शस्त्रास्त्रें यांचा उघड उघड भारतांत अन्य देशांतून सांठा येऊं लागला. नागपूर, जबलपूर, कानपूर व इतर ठिकाणीं एक हजार ' स्टेन गन्स ' आल्याचें उघडकीस आलें. भारताचें पोलिटिकल खातें, लीगच्या सहाय्यानें संस्थानांतून हिंदुस्थानची एकता भंग करणारीं कारस्थानें कशीं करीत होतीं, याचा नंतर कागदोपत्रीं पुरावा मिळाला. कांहीं संस्थानांत लष्कर, दारूगोळा, शस्त्रास्त्रें यांचा सांठा केला जात होता व हिंदुस्थानांत एके दिवशीं बंडाचा भडका उडवला जाणार होता. अशा परिस्थितींत हिंदुस्थान वांचवावयाचा असेल तर

फाळणी मान्य केली पाहिजे अशा निर्णयाला पुढारी आले. त्या वेळचे नेहरूंचे उद्गार प्रसिद्ध आहेत. ते म्हणाले, ' डोकें-दुखी थांबविण्याकरितां आम्ही डोकेंच कापून टाकण्याचें ठरविलें.'*

× × ×

३ जुलै १९४७ रोजीं मौंटबॅटन हे भारताच्या फाळणीची योजनाच घेऊन इंग्लंडहून आले. ऑल इंडिया कॉंग्रेसची बैठक १४ जूनला झाली. त्या बैठकींत फाळणी योजना स्वीकारावयाची का टाकावयाची असा ठराव आला होता. गांधींना त्यावर आपलें मत प्रदर्शित करावयास सांगण्यांत आलें. गांधीजींच्या म्हणण्याचा सारांश असा—कॉंग्रेस पाकिस्तान—विरोधी आहे व मीहि चिकाटीनें हिंदुस्थानच्या विभागणीला विरोध करीत आलों आहे. पण मी येथें तो ठराव तुम्ही मान्य करा असें सांगण्याकरितां आलों आहे. कधीं कधीं कांहीं कांहीं अत्यंत न रुचणारे निर्णय घ्यावे लागतात. अशा वेळीं देशांत शांतता असावी लागते. ज्यांना ताबडतोब क्रांति हवी आहे किंवा देशांत उत्पात करावयाचा आहे, त्यांनीं हा ठराव फेटाळून आपला उद्देश साध्य करावा. पण " माझ्यांत आज ती शक्ति नाहीं. तशी शक्ति असती तर मी एकट्यानें बंड पुकारलें असतें. "

नेहरूंचें भाषण तेथें झालें. त्या भाषणांत त्यांनीं " हंगामी सरकारच्या असहाय्यतेची कहाणी सांगितली. सरकारांत असलेले मुस्लिम लीगचे पक्षपाती आंतून भडका उडवीत असल्यामुळें आणि ब्रिटिश ताबा सोडीत नसल्यामुळें कॉंग्रेसचे पुढारी हताश झाले. जर आम्ही तरुण असतों, आम्हांला हंगामी सरकारचा अनुभव येण्यापूर्वीचा काळ असता, तर आम्ही दुसराच निर्णय घेतला असता.

" निरपराधी लोकांची कत्तल होण्याचे पाहण्यापेक्षां फाळणी बरी. फाळणीची ही योजना आमच्यावर कोणी लादली नाहीं. हिंदुस्थान पूर्वीसारखाच अखंड आहे; पण कांहीं प्रांत त्यांतून निघून जात आहेत. " सरदार पटेल यांचेंहि त्या वेळीं भाषण झालें. सरदारांनीं जवाहरलालजींच्या म्हणण्याला दुजोरा दिला. " एक पाकिस्तान मान्य केला नाहीं, तर अनेक पाकिस्तानें येथें होतील. " पण सरदार म्हणाले, " आम्ही भयानें फाळणी मान्य करीत नाहीं. इतक्या

* Last Phase – Pyarelal Vol. II, Pages 153–156.

वर्षांचे आमचे कष्ट वायां जातील अशी भीति वाटते." सरदारांनीं आणखी सांगितलें कीं, पंजाब व बंगालमध्यें पाकिस्तान झालाच आहे. पण जर खराखुरा पाकिस्तान झाला, तर ते लोक जबाबदारीनें तरी वागतील. या शेवटच्या आणीबाणीच्या वेळीं गांधीजींपासून आपण विभक्त होत आहोंत, याबद्दल सरदारांनीं खेद व्यक्त केला. गांधींनीं व्यक्तिशः पाकिस्तान मान्य केलें नाहीं.

९ तासांच्या चर्चेनंतर काँग्रेसचे अध्यक्ष आचार्य कृपलानी बोलले. त्यांनीं त्या वेळच्या भयानक परिस्थितीचें हृदयद्रावक वर्णन केलें. फाळणीशिवाय गत्यंतर नाहीं, असें तेहि जोरानें म्हणाले. ठराव १५७ विरुद्ध १५ मतांनीं पास झाला.

फाळणीनंतर ज्या कत्तली झाल्या, त्याबद्दल कांहीं पुढाऱ्यांचीं मतें नोंदण्यासारखीं आहेत. न्यूयॉर्कला १६ ऑक्टोबर १९४९ रोजीं नेहरूंनीं भाषण केलें. ते म्हणाले, फाळणीनंतर ज्या भयानक कत्तली झाल्या त्याची आम्हांला आगाऊ कल्पना असती तर आम्ही फाळणीला प्रतिकार केला असता. 'बापूंचें आम्हीं ऐकलें नाहीं ही मोठी चूक केली' असें मौलाना अबदुल कलाम आझाद म्हणाले. आचार्य कृपलानी आपण १९४७ सालीं काय बोललों होतों हें विसरले. त्यांनीं फाळणीबद्दल काँग्रेसनेत्यांना शेलक्या शिव्या दिल्या. राजेंद्रबाबूंनाहि पश्चात्ताप झाला.

लॉर्ड मौंटबॅटन यांनीं भारतीय स्वातंत्र्यदानाची तारीख १५ ऑगस्ट १९४७ जी ठरविली ती उदारतेनें ठरविली नाहीं. त्यांच्या मागें लवकरांत लवकर निघून जा, असा काँग्रेस नेत्यांचा नेट होता. म्हणून ती तारीख सुमारें एक वर्ष अगोदर आली *

* * *

* आधारः—दि लास्ट फेज प्यारेलाल २ खंडः—पानें १५३—१५६ व २५१ ते २५६.

८ : काश्मीर कसा सामील झाला

१९४७ सालीं ब्रिटिश पार्लमेंटनें हिंदी स्वातंत्र्याचा कायदा पास केला व त्यांत हिंदुस्थानबरोबर हिंदी संस्थानिकांना स्वतंत्र व सार्वभौम करून टाकलें. जम्मू–काश्मीरची लोकसंख्या ४०–४५ लाखच होती; पण तींत बहुसंख्य मुसलमान होते. शिवाय पाकिस्तान व हिंदुस्थान यांना लागून असणारें तें संस्थान होतें. त्यामुळें दोनहि राज्यांत शांतता नांदणें न नांदणें हें काश्मीरवर अवलंबून होतें.

१९४७ जूनच्या मध्याला लॉर्ड मौंटबॅटननीं काश्मीरचे महाराज हरिसिंग यांना प्रजेच्या मतानें हिंदुस्थानांत किंवा पाकिस्तानांत १५ ऑगस्टपूर्वी सामील होण्याचा सल्ला दिला. पण महाराज निर्णयाला येईनात. त्यांची इच्छा काश्मीर स्वतंत्र ठेवावा अशी होती. त्यामुळेंच ते संकटांत सांपडले, व त्यांनीं हिंदुस्थानला अडचणींत टाकलें.

१५ ऑगस्टला दोन राज्यें निर्माण झालीं. पाकिस्ताननें आपल्या हद्दींतून काश्मीरला अन्नधान्य वगैरे पाठविण्याला बंदी करून पाकिस्तानांत सामील होण्याचें दडपण त्यांच्यावर आणलें; व दमदाटी सुरू केली. पण एवढ्यावर पाकिस्तान थांबलें नाहीं. त्यांनीं तेथील टोळीवाल्यांना फूस देऊन काश्मीर व जम्मू या दोन्ही सरहद्दीनजीकच्या खेड्यांवर चाल करावयास लावलें. काश्मीरचें तुटपुंजें सैन्य लवकरच पांगलें, मोडलें व निरुपयोगी ठरलें. हल्लेवाले खेड्यांत लुटालूट करीत, घरें जाळीत व स्त्रियांवर बलात्कार करीत.

महाराजांचे आतां डोळे उघडले व त्यांनीं लोकांचा पाठिंबा मिळविण्या-

करितां व स्वतः जगण्याकरितां शेख अबदुल्लांना तुरुंगांतून मुक्त करण्याचें ठरविलें. २९ सप्टेंबरला शेखसाहेब व त्यांचे राष्ट्रीय परिषदेंतील अनुयायी बंधमुक्त झाले. शेखसाहेब सुटल्यावर त्यांनीं एका भाषणांत म्हटलें, ' जवाहरलाल माझे चांगले मित्र आहेत. गांधींना मी पूज्य मानतों. कॉंग्रेसनें आमच्या लढ्यांत मदत केली आहे. पण पाकिस्तानांत जायचें का हिंदुस्थानांत हें आम्ही ठरवूं. आम्ही पाकिस्तानांत गेलों तरी द्विराष्ट्र सिद्धान्त आम्हांला मान्य नाहीं. त्यानें विष फैलावलें आहे. '

पाकिस्तानला काश्मीर सरकारनें हल्ले व घुसखोरी थांबविण्यास सूचना केली. तसें न केल्यास आम्हांला मित्रराष्ट्राची मदत घ्यावी लागेल हेंहि कळविलें. त्यामुळें तर पाकचा जळफळाट झाला. ८५ टक्के मुसलमानांच्या इच्छेविरुद्ध तुम्ही हिंदुस्थानांत सामील झालांत तर याद राखा अशी धमकीहि दिली. एवढें करून पाकिस्तान थांबला नाहीं.

२२ ऑक्टोबर १९४७ रोजीं १०० मोटार–ट्रक्समधून आधुनिक शस्त्रास्त्रांनीं सज्ज असलेले सैनिक त्यांनीं काश्मीरमध्यें घुसविले. त्यांच्याबरोबर हजारों टोळीवाले होते. २५ ऑक्टोबरला मुझफराबाद व डोमेलवर हल्ला केला व ५००० सैनिकांनीं तीं दोन्ही ठिकाणें सर केलीं. तेथून श्रीनगर फक्त ३४ मैलांवर होतें. एक-दोन दिवसांत तेंहि सर होणार होतें. तसें झालें असतें, तर काश्मीरचा प्रश्न ऑक्टोबर १९४७ अखेर मिटला असता व काश्मीर पाकिस्तानचा भाग झाला असता. २५ ऑक्टोबर हा काश्मीरच्या भवितव्याचा आणीबाणीचा दिवस होता.

आपण पाकिस्तानपुढें टिकाव धरूं शकत नाहीं अशी महाराजांची खात्री झाली. या संकटांतून आम्हांला सोडविण्याकरितां सैन्य व शस्त्रें पाठवा अशी महाराजांनीं हिंदी राज्याला विनंती केली. त्या वेळीं लॉर्ड मौंटबॅटन हे गव्हर्नर जनरल होते. ते म्हणाले, ' काश्मीर हिंदुस्थानांत सामील झाल्याशिवाय अशी मदत देतां येणार नाहीं. २५ ऑक्टोबरला संस्थानचे सचिव श्री. व्ही. पी. मेनन यांना काश्मीरला ही परिस्थिति समजावून देण्याकरितां पाठविलें. २६ तारखेला मेनन हे महाराजांची सामीलनाम्यावर सही घेऊन दिल्लीला परतले.

त्याच पत्रांत महाराजांनीं शेख अबदुल्लावर आणीबाणीच्या काळांतील जबाबदारी टाकल्याचेंहि कळविलें. शेख अबदुल्लांनीं व राष्ट्रीय परिषदेनें

सामीलनाम्याला संमति दिली व भारताला फौज पाठविण्यास विनंती केली. शेखसाहेबांनीं त्या अडचणीचे वेळीं सामीलनामा मान्य केला होता; पण तो तात्पुरता होता, काश्मीर बचावण्याकरितां होता. पण त्या वेळीं हिंद सरकारनें एक अतिरिक्त शहाणपणा केला व तोच त्यांना नडला. ‘ काश्मीरमध्यें कायदा व सुव्यवस्था स्थापन झाल्यावर व आक्रमक निघून गेल्यावर संस्थानच्या सामीलनाम्याचा प्रश्न लोकांच्या इच्छेनें सोडविला जाईल. ’’ कायमचा सामील-नामा त्यांनीं मागितला असता तर ? कोणाकरितां हिंदी फौजा रक्त सांडणार होत्या ? काश्मीरनें पाकमध्यें जावें म्हणून ?

काश्मीरला सैन्य पाठविणें, सामीलनामा स्वीकारणें वगैरे प्रश्न काँग्रेसचे त्या वेळचे अध्यक्ष आचार्य कृपलानी यांना न विचारतां सोडविले म्हणून ते फार रागावले. त्यांनीं नंतर राजीनामाहि दिला. या चर्चेचे वेळीं गांधी होते का नव्हते हा गौण प्रश्न आहे. पण सैन्य पाठविण्याला त्यांनीं विरोध केला नाहीं.

“ It was right on the hand of the union Government to rush troops, even a handful to Shrinagar. The result was in the hand of god. I would not shed a tear if the little union force is wiped out like spartans, bravely defending Kashmir, nor will I mind Sheikh Abdulla and his Muslim, Hindu, Shikh, Comrades, men and women dying at their post in the defence of Kashmir. ”

Mahatma Gandhi.
October 30, 1947.

२६ तारखेला तीन-चार मंत्री बसले. प्रत्येक क्षण महत्त्वाचा होता. शत्रु-सैन्य श्रीनगरपासून आठ-दहा मैलांवर येऊन ठेपलें होतें. तास, दोन तासांचा उशीर झाला असता तर श्रीनगर पडलें असतें. ताबडतोब विमानांतून सैन्य पाठविण्याचा निर्णय घेतला गेला. २७ तारखेला पहाटे पहिल्या शीख तुक-डीचे ३३० जवान विमानांतून श्रीनगरला गेले. बारामुल्ला श्रीनगरच्या रस्त्यानें पाकपुरस्कृत सैन्य आगेकूच करीत होते· लष्करी विमानदलाशिवाय सारीं प्रवासी विमानें सैनिकांच्या स्वारीकरितां उपयोगांत आणलीं गेलीं. ही सर्व बिनबोभाट जलद हालचाल पाहून मौंटबॅटन आश्चर्यचकित झाले व जीनांनाहि धक्का बसला.

हल्लेखोरांनीं बारामुल्ला सर केलेंच होतें. श्रीनगरला ज्या मोहोर विद्युत्-केंद्रांतून वीजपुरवठा होतो तेंहि केंद्र हल्लेखोरांनीं जाळून टाकलें. ते श्रीनगरचा विमानतळ जिंकण्याच्या बेतांत होते. तो विमानतळ जर शत्रूच्या हातीं लागता तर हिंदी सैन्य निकामीच ठरलें असतें. पण सुदैवानें तसें घडलें नाहीं. त्याचें कारण हल्लेखोरांची नीतिभ्रष्टता, अमानुषता. त्या हल्लेखोरांनीं हिंदु-मुसलमान, खिश्चन असा भेदाभेद दुष्टपणांत केला नाहीं. बारामुल्लांच्या चर्चवर इस्पितळावर त्यांनीं हल्ला केला. तेथील मठवासिनींवर बलात्कार केले व कांहींना ठार मारलें. लुटालूट, स्त्रिया यांच्या आहारीं गेलेल्या, व त्याकरितां हपापलेल्या सैनिकांना व टोळीवाल्यांना कैफ चढला होता. ते जर त्याच्या लोभांत अडकले नसते, तर काश्मीरची राजधानी त्यांनीं केव्हांच सर केली असती. कांहीं दिवस त्यांनीं बारामुल्लाला दहशतीचें राज्य चालविलें व काश्मीर हातचा गमावला.

श्रीनगरला हाहाकार उडाला होता. जागेवर राज्यच नव्हतें. महाराज जम्मूला निघून गेले. गांवांत अंधःकार, रस्त्यांत घाण, चहूंकडे धास्ती व कांहीं ठिकाणीं रडारड चालली होती. राष्ट्रीय परिषदेच्या स्वयंसेवकांनीं श्रीनगर शहराची व्यवस्था उत्तम ठेवली. त्यानंतर हिंदी सैनिकांनीं पाकपुरस्कृत सैन्याची धुळधाण उडविली. उरी, पुंच वगैरे पुनः सर केले व काश्मीर खोऱ्यांत हल्लेखोर शिरण्याची शक्यताहि शिल्लक ठेवली नाहीं.

जीनासाहेब ॲबटाबादला येऊन बसले होते. ईदच्या दिवशीं मोठ्या मिरवणुकीनें श्रीनगरमध्यें प्रवेश करण्याचें त्यांनीं ठरविलें होतें. पण झालें विपरीत. त्यांनीं संतापाच्या भरांत पाकिस्तान सैन्याला काश्मीरवर स्वारी करण्याचा हुकूम सोडला. त्या वेळीं पाकिस्तानचे सर सेनापति सर क्लॉड ऑचिनलेक होते. ते म्हणाले, ' हिंदनें सैन्य पाठविण्यांत कांहीं चूक केली नाहीं. पण जर तुम्ही पाक सैन्य काश्मीरवर पाठवलें तर आम्ही सारे ब्रिटिश अधिकारी राजीनामे देऊं. दोन्ही देशांत ताबडतोब युद्ध सुरू होईल. ' हें जेव्हां जीनांनीं ऐकलें, तेव्हां त्यांनीं स्वारीचा हुकूम मागें घेतला. प्रथम कोणी अत्याचार केला ? हिंदनें का पाकनें ? मौंटबॅटननीं हिंदची बाजू जीनासमोर मांडली. टोळीवाल्यांनीं प्रथम अत्याचार केले असें मौंटबॅटन म्हणाले. जीना हिंदवर तो आरोप लादीत होते. मौंटबॅटन तो कबूल करीनात. जीना त्यांच्यावर क्रुद्ध झाले.

काश्मीर ज्या वेळीं हिंदुस्थानांत सामील झाला, त्या वेळीं पाक हल्लेखोरांची संख्या तीन ते दहा हजार होती. पुढें ती वाढत वाढत गेली. खुद्द काश्मीर राज्यांत ५०,००० बिगर काश्मिरी हल्लेखोर होते. त्यांत आणखी एक लाखाची भर पडली. हिंदी सैनिकांची संख्या १६००० पेक्षां कमीच होती. काश्मीर वांचवल्यावर पाकपुरस्कृत टोळीवाल्यांनीं आझाद काश्मीरची स्थापना केली. तो भाग अद्याप त्यांच्या ताब्यांत आहे. १९६५ च्या युद्धांतहि तो त्यांच्याच ताब्यांत राहिला. ताशकंद करारानें युद्ध थांबविलें, पण प्रश्न सोडविला नाहीं.

* * *

काश्मिर बचावाच्या लढ्यांत एक अत्यंत चिरस्मरणीय कृत्य घडलें. इतिहासांत त्याची नोंद झाली पाहिजे व स्मारकहि उभारलें पाहिजे. ब्रिगेडियर उस्मान हा हिंदी सैन्याचा अधिकारी लढतां लढतां मेला. हिंदी अधिकारीहि मेले. पण या सर्वांपेक्षां मिर मकबुल शेरवाणी यांचें कृत्य गौरवास्पद व अभिमानास्पद आहे. शेरवाणी हे राष्ट्रीय परिषदेचे एक स्वयंसेवक होते. बारामुल्ला जेव्हां आक्रमकांनीं जिंकला तेव्हां शेरवाणी शत्रूच्या हातीं सांपडले, त्यांना पाकनें राष्ट्रीय परिषद सोडण्यास व आझाद काश्मीरच्या निष्ठेची शपथ घ्यावयास सांगितलें. त्यांनीं नुसता नकार दिला, एवढेंच नव्हे तर त्यांनीं मोठ्या धैर्यानें सांगितलें, 'बारामुल्ला तुमच्या हातीं किती दिवस राहणार आहे ? हिंदी फौज येत आहे व बारामुल्ला पुनः जिंकणार आहे. ' हें उत्तर ऐकतांच पाक अधिकारी बेभान झाले. त्यांनीं त्याला देशद्रोही म्हटलें. त्याच्या तळव्याला खिळे ठोकले व येशू खिस्ताप्रमाणें त्याला सुळीं दिलें. त्याच्यावर बंदुकांच्या गोळ्यांचा वर्षाव केला. एवढ्यानेंच त्यांची आसुरी लालसा तृप्त झाली नाहीं. त्याच्या देहाचे तुकडे तुकडे करण्यांत आले. संभाजी महाराजांची आठवण शेरवाणी करून देतात, आणखी किती तरी हुतात्म्यांची.

शेरवाणीचें भविष्य खरें ठरलें. ४८ तासांच्या आंत बारामुल्ला पाकच्या हातून गेला. गांधींनीं जेव्हां शेरवाणीचें शूरत्वाचें मरण ऐकलें, तेव्हां ते म्हणाले, " कोणाहि माणसाला अभिमान वाटावा असें तें शूराचें मरण होतें. "

★ ★ ★

६ : ४३२ दिवसांचें काश्मीर-युद्ध

काश्मीर हिंदुस्थानांत सामील झालें, हिंदी सैनिकांनीं पाक व हल्लेखोरांना परत पिटाळलें, वगैरे घटना मागील प्रकरणांत सांगितल्या आहेत. पण तेवढ्यानें काश्मीरच्या दुर्दैवाचा इतिहास पुरा होत नाहीं. काश्मीरवर हल्ले झाले व त्या हल्ल्यांना तोंड देतां देतां $\frac{1}{3}$ काश्मीर काश्मीरला गमवावा लागला, त्या इतिहासाकडे जावें तेवढें लक्ष गेलें नाहीं. तो इतिहास अत्यंत क्रूर, अमानुष अशा घटनांनीं भरलेला आहे. १ जानेवारी १९४९ रोजीं गोळीबार बंदी झाली. तोंपर्यंत तेथें भीषण लढे चालू होते. हिंदी सैनिकांना साऱ्या काश्मीर-बाहेर हल्लेखोर व पाकिस्तानचे सैनिक घालवितां आले नाहींत. २४–२५ ऑक्टोबर १९४७ च्या सुमाराला हें युद्ध सुरू झालें व ४३२ दिवसांनीं संपलें.

१९४४ सालची गोष्ट. काश्मीरच्या महाराजांनीं काक नांवाच्या काश्मिरी पंडिताला काश्मीरचे मुख्य प्रधान नेमले. तो लवकरच हुकूमशहा बनला. नॅशनल कॉन्फरन्सचे पुढारी तेथें राहणें अशक्य झाल्यानें काश्मीरमधून निसटले. काकनीं शेख अब्दुल्लाला देशद्रोहाकरितां अटक केली. ९ वर्षें शिक्षा दिली. जवाहरलाल नेहरू काश्मीरमध्यें गेले असतां २० जून १९४६ रोजीं त्यांनाहि पकडलें. पण त्यांना दिल्लीस तांतडीच्या आमंत्रणावरून जावयाचें होतें म्हणून सोडून दिलें. हे काक महाशय इतका धुमाकूळ घालीत कीं, त्यांना शेवटीं महाराजांनीं ऑगस्ट १९४७ पूर्वीं काढून टाकलें.


१५ ऑगस्टला महाराज 'जैसे थे' करार करते झाले. त्यांना काश्मीर स्वतंत्र ठेवावयाचा होता. पाकनें तो करार आधीं मान्य केला व नंतर मोडला.

हिंदुस्थाननें तो मान्यच केला नाहीं. काश्मीरनें पाकिस्तानमध्यें सामील व्हावें म्हणून पाकिस्तान दांडगाई करूं लागला. काश्मीरयुद्धाला तेव्हांपासून सुरुवात झाली.

हिंदुस्थानची मदत मागतांना शेखअब्दुल्ला कायमच्या सामिलीकरणाचा निर्णय काश्मिरी जनता देईल असें म्हणत होते. आजहि हेंच ते म्हणत आहेत. हिंदुस्थाननें त्याच वेळीं जर जनतेचा अखेरचा निर्णय कळल्याशिवाय आम्ही मदत पाठवूं शकत नाहीं असें म्हटलें असतें तर ? वेळ नव्हता हें खरें आलें. पण शेख अब्दुल्लानें ज्या हिंदुस्थाननें आपल्या लोकांचा, मुलुखांचा मालमत्तेचा, राज्याचा बचाव केला, त्यांच्यांत आम्ही कायम सामील झालों आहोंत असें म्हटलें असतें तर तें उदारपणाचें कृतज्ञतेचें द्योतक ठरलें असतें. पण त्यांच्यांत ती वृत्ति नाहीं. ज्या काश्मीरला तेव्हां आपला बचाव करतां आला नाहीं, हिंदुस्थानशिवाय आर्थिक स्थिति सुधारतां आली नाहीं, जे संख्येनें ४० लाखांपेक्षां अधिक नाहींत त्यांनीं कशाच्या जोरावर सार्वमताची मागणी करावी ? त्यांची इच्छा पाकिस्तानांत सक्तीनें नव्हे; पण तडजोडीनें जाण्याची आहे, म्हणून सार्वमत त्यांना हवें असेल. महाराजांनीं पाकिस्तान व हिंदुस्थान या दोघांचें सहाय्य मिळविण्याचा प्रयत्न केला. पण काय झालें ? पाकचे क्रूर हल्ले ! त्याचीच नवी आवृत्ति शेखसाहेबांना हवी आहे का ?

५ मार्च १९४८ रोजीं काश्मीरला महाराजांनीं जबाबदारीचें राज्य दिलें. शेख अबदुल्ला हे पहिले पंतप्रधान झाले. त्यानंतर जे काश्मीरवर हल्ले झाले व युद्ध झालें तें ' स्वतंत्र ' काश्मीरबरोबर झालें. पण पाकिस्तानपुढें, आपण कोणाशीं लढतो हा प्रश्नच नव्हता. ते काश्मीर बळकावण्याकरितां लढत होते; मग काश्मीर स्वतंत्र असो, हरिसिंगाचा असो, हिंदुस्थानांत सामील झालेला असो वा नसो.

पाकचें म्हणणें लोकांवर सक्ती करून सामीलनामा झाला तो आम्ही मानीत नाहीं. हिंदुस्थाननें हा बनावट (बोगस) सामीलनामा करून घेतला व काश्मीरवर आक्रमण केलें. टोळीवाल्यांनीं स्वतःच्या मुलखाचा बचाव केला असें पाक म्हणाला. पुढें पाकनें आपलें सैन्य तेथें गेलें होतें हें कबूल केलें. पण तें सैन्य पाकिस्तानच्या बचावाकरितां गेलें होतें असें पाक म्हणत राहिला. उलट हिंदुस्थानचें म्हणणें. हें सारें युद्ध पाकनें, आपल्या सैन्यानिशीं,



सावळी रेषा आझाद काश्मीरची.

हा भाग पाकनें बळकावला.

टोळीवाल्यांना हाताशीं धरून केलें. हें सैन्य व टोळीवाले मिळून जवळ जवळ सव्वा लाख लढाऊ फौजा तेथें होत्या. सर्वांत आश्चर्याची गोष्ट म्हणजे त्या टोळीवाल्यांत ८६ ते ८८ हजार पठाण होते असें भारत सरकारनें ५ मार्च १९४८ च्या श्वेत पत्रिकेंत म्हटलें. हे पठाण वीर व स्वात संस्थानांतील होतें व ते सरहद्द प्रांताचे मुख्य मंत्री अब्दुल कायमच्या खास तालमींतले होते. ८८००० पठाणांपैकीं, ७३ ते ७५००० पठाण पाकिस्तानच्या जवळील प्रदेशांत व फक्त १३००० काश्मीरमध्यें होते. खान अब्दुल गफारखान यांची पखतुनीस्तानची मागणी मतदानानें मान्य होईल अशी परिस्थिति यावरून दिसत नाहीं.

हिंदी सैन्यानें एक महत्त्वाचा पराक्रम केला. पाक व टोळीवाले काश्मीर-मध्यें जे घुसले होते त्यांना शक्य तितकें पाकच्या सरहद्दीपर्यंत रेटत नेलें. बारामुल्ला, उरी, पुंच, मोहरा वगैरे शत्रूंनीं जिंकलेलीं ठाणीं परत मिळविलीं. पाकिस्तानच्या सैन्याला थेट पाकिस्तानच्या सरहद्दीपर्यंत रेटण्यांत हिंदी सैन्याला यश आलें नाहीं. उलट आझाद–काश्मीरच्या नांवानें, ठरलेली पाकिस्तान सरहद्द जम्मू–श्रीनगरच्या बाजूला अधिकच वाढली. तेव्हां १९४९ मध्यें दोन सरहद्दी झाल्या. एक १९४५ ची पाकची व दुसरी १९४९ ची आझाद–काश्मीरची. १९४९ च्या युद्धांत पाकिस्ताननें ३०,००० चौ. मैलांचा काश्मीरचा मुलूख बळकावला. ११,५०,००० लोक तेथें राहात. त्यांतील १॥ लाख हिंदु होते. त्यांना मारलें, हाकललें किंवा बाटविलें. दक्षिणोत्तर काश्मीर २७५ मैल व पूर्व–पश्चिम ३५० मैल आहे. म्हणजे जवळ जवळ १ लाख चौ. मैलांचें हें राज्य आहे. या युद्धांत हिंदुस्थानचे ९२२ सैनिक, मृत, जखमी किंवा बेपत्ता झाले. पाक–टोळीवाल्यांचे तेच आंकडे १५००० होते. हिंद सरकारचे हे आंकडे आहेत. याशिवाय पाकनें केलेल्या हजारोंच्या कत्तली या हिशोबांत धरल्या नाहींत.

मार्च १९४८ ते नोव्हेंबर अखेर हिंदी सैन्यानें कोणता विभाग पुनः जिंकला त्याचीं फक्त नांवें खालीं दिलीं आहेत. त्याकरितां विमानांचा उपयोग करावा लागला. १०,००० फूट उंचीच्या डोंगरावरून युद्ध करावें लागलें. बर्फांत दिवस काढावे लागले. शौर्याला सीमा नव्हती.

झांगर, पेशता हिर, कुंदरकाई, चिंगास, राजोरी, खेरीधर्मशाळा,

चोकीवाल, टिथवाल, पेंढर, गुरेज व बाग, पिर कालेवा, झोजीला खिंड (शत्रु पिटाळले), द्रास, कारगिल. कारगिल २३ नोव्हेंबर १९४८ ला जिंकलें.

उरी, पुंच, बारामुल्ला वगैरे विभाग १९४७ मध्येंच हिंदनें पुनः जिंकले होते. या भागांतील पाकच्या क्रौर्याचीं वर्णनें करण्यास साधी लेखणी पुरणार नाहीं. हजारों लोकांच्या कत्तली करण्यांत आल्या. त्यांत त्यांनीं जातिधर्म पाहिला नाहीं. कुराणाचाहि अपमान त्यांनीं केला. मशिदी भ्रष्ट केल्या. मशिदींत वेश्या-गृहें काढलीं. मुसलमानांची जर ही स्थिति तर इतरांची काय ? बुद्ध व खिस्ती धर्मियांची त्यांनीं प्रतिष्ठा ठेवली नाहीं. त्यांचीं पवित्र स्थानें भ्रष्ट केलीं. कत्तली केल्या, लुटालूट केली. हा एवढा तरी भाग टोळीवाले व पाक सैनिक यांच्या जबड्यांतून काढला हेंच हिंदी सैन्याचें महान् पराक्रमी कृत्य होय.

पण जेथें फारसा प्रतिकार न करतां पाकिस्तानला मुलूख बळकावतां आला, असा उत्तरेकडचा सर्वच विभाग होता. गिलगिटचा ताबा ब्रिटिशांनीं १ ऑगस्ट १९४७ ला काश्मीरला दिला. महाराजांनीं तेथें गव्हर्नर नेमला. त्याला गिलगिटचें रक्षण करणें शक्य झालें नाहीं. हिंदी फौजाहि त्या इलाख्याचें रक्षण करूं शकल्या नाहींत. गिलगिट डोंगराळ प्रदेश. जवळ जवळ १४००० चौ. मैलांचा विभाग. लोकसंख्या ७६०००. गिलगिट शत्रूच्या हातीं गेलें. आंतरराष्ट्रीय दृष्ट्या त्याला अत्यंत महत्त्व आहे. त्याचबरोबर गिलगिटजवळ लहान लहान तीन टोळीवाल्यांचीं संस्थानें पाकिस्तानांत सामील झालीं. तीं हुंजा, यासिन व नागर. तीं संस्थानें अफगाणिस्तान, चीन, रशिया व पाकिस्तानच्या सरहद्दींना लागून होतीं. वास्तविक तीं संस्थानें काश्मीरच्या अधिराज्याखालीं होतीं. पण त्यांनीं अनाधिकारानें पाकिस्तानांत प्रवेश केला. पाकिस्तान त्यांना स्वतंत्र थोडेंच राहू देतो !

१९४८ डिसेंबरच्या तिसऱ्या आठवड्यांत युनोच्या काश्मीर कमिशननें १ जानेवारी १९४९ पासून गोळीबार बंद केला. पाकिस्तान व हिंदुस्थान ह्यांना भिन्न भिन्न कारणांकरितां युद्धबंदी हवी होती. तेव्हांपासून पाक व टोळीवाल्यानीं बळकावलेला मुलूख काश्मीरच्या हातांतून गेला. शेख अबदुल्ला काश्मीर जनतेच्या इच्छेनें काश्मीरचें भवितव्य ठरवावें म्हणतात. गिलगिट, हुंसा, यासिन, नागर व पूर्वीची पाक सरहद्द व नंतरची आझाद–काश्मीर सरहद्द यांचें पाकमधील सामिलीकरण जनतेच्या इच्छेनें

झालें का ? काश्मीरचें भवितव्य आतां काय ठरवणार ? पाकिस्ताननें काश्मीरकरितां १९६५ सालीं युद्धाचा मार्गहि अवलंबिला. काश्मिरी जनता पाकिस्तानच्या बाजूनें बंड करून उठली नाहीं. एवढेंच नव्हे तर तिनें पाकिस्तानला प्रतिकार केला. ह्यावरून कांहीं निष्कर्ष काढतां येतील का ? पण हे निष्कर्ष काश्मिरी जनतेची इच्छा प्रदर्शित करीत असले तरी शेख-साहेब पाकनें व्यापलेला ⅓ काश्मीर परत काश्मीरमध्यें आणण्याकरितां पाकिस्तानबरोबर लढत, झगडत आहेत का ? प्रथम सारा काश्मीर, काश्मीर-मध्यें आणण्याकरितां त्यांनीं प्रयत्न करावेत. जो काश्मीरसंबंधींचा मंत्रोच्चार ते हिंदी पुढाऱ्यांसमोर करीत आहेत, तोच त्यांनीं पाकपुढें करावा. आणि हिंदुस्थाननें साऱ्या काश्मीरवर काश्मीरची सत्ता स्थापन झाल्याशिवाय शेख-अबदुल्लाशीं सार्वमताबद्दल बोलणें करतां कामा नये. हिंदच्या दृष्टीनें काश्मीर प्रश्न कायमचा निकालांत निघाला आहे. त्याकरितां १९४७–४८ चें युद्ध–युनो व सुरक्षा समितीमधील टेबलावरील लढाया, १९६५ चें पाकिस्तान युद्ध होऊन गेलें आहे. हिंदुस्थाननें काश्मीरकरितां रक्त, पैसा, वगैरे किती खर्चीं घातला याचा हिशेबच नाहीं. हें सर्व हिंदुस्थाननें मुलूख बळकावण्याकरितां केलें नाहीं. हिंदुस्थान हें निधर्मी, लोकशाहीप्रधान राज्य आहे हें सिद्ध करण्याकरितां भारतानें ह्या आगींत प्रवेश केला. आतां तो इतिहास संपला आहे. पाकिस्ताननें मात्र गिलगिट, हुंसा, यासिन, नागर हा व अन्य ⅓ काश्मीर स्वतःकरितां बळकावला ! शेखसाहेबानीं तेथें सार्वमत कधीं मागितलें ?

* * *

आधारः–काश्मीर स्पीक्स–पी. एन्. कौल व के. एल्. धार.

१० : हैद्राबादची मुक्तता

भारताच्या स्वातंत्र्य-संपादन पर्वांत जे आणीबाणीचे प्रसंग आले, त्यांत हैद्राबादचा प्रसंग कठीण होता. ८५ टक्के प्रजा हिंदु, राजा मुसलमान व त्याला पाठिंबा नव्यानें निर्माण झालेल्या पाकिस्तानचा. कांहीं ब्रिटिशहि निजामच्या बाजूचे होते.

ब्रिटिश पार्लमेंटनें भारतीय स्वातंत्र्याचा कायदा १९४७ मध्यें केला. हिंदी संस्थानांना सार्वभौमत्व व स्वातंत्र्य दिलें. जून १९४७ मध्यें निजामनें घोषणा केली कीं, मी पाकिस्तान किंवा हिंदुस्थानांत सामील होणार नाहीं. १५ ऑगस्टपासून निजाम राज्य स्वतंत्र सार्वभौम होणार आहे. वऱ्हाड प्रांत हा निजामचाच होता. तोहि आपल्याला मिळावा अशी मागणी त्यांनीं केली. सरदार पटेल यांचें एकच उत्तर होतें. भारतांत सामील होणें न होणें हा प्रश्न १९४७ च्या कायद्याप्रमाणें निजामचा नसून प्रजेचा आहे. तेव्हां प्रजेचें मत घेऊन वऱ्हाड व हैद्राबादचें भवितव्य ठरवा.

पण निजामला हें कसें मानवणार ? हैद्राबादमध्यें कासीम रझवीच्या नेतृत्वाखालीं 'इत्तिहादुल मुसलमिन' ही संघटना स्थापन झाली. निजामनें ३० लाख पौंडांचीं शस्त्रास्त्रें झेकोस्लाव्हियाकडून मिळविण्याचा प्रयत्न केला. पाकला मोठें कर्जहि दिलें, पाकच्या झाफरुल्लाखानला माझ्याकडे पाठवा अशी जीनांना प्रार्थना केली. पण हें सर्व व्यर्थ होत चाललें होतें.

हैद्राबादचीं प्रतिनिधि-मंडळें दिल्लीला वाऱ्या करीत होतीं. २० ऑक्टोबर १९४७ रोजीं असेंच एक शिष्टमंडळ दिल्लीला गेलें. लॉर्ड मौंटबॅटन, नेहरू व

पटेल, यांनीं एक तडजोडीचा मसुदा तयार केला व तो हैद्राबादचे प्रतिनिधी वाल्टर मांकटन, छत्तारीचे नबाब व सर सुलतान अहंमद यांनीं मंजूर केला. त्यांनीं २६ ऑक्टोबरला निजामची संमति घेऊन परत येण्याचें कबूल केलें. निजामनें आपल्या कार्यकारिणीची सभा घेतली. ९ सभासदांपैकीं ६ जणांनीं तडजोड मान्य केली. निजामनें तो निर्णय मान्य केला, पण २७ तारखेपर्यंत सही केली नाहीं. काश्मीरमधील घडामोडीकडे ते लक्ष देऊन होते.

२७ ऑक्टोबरला सकाळीं २५–३० हजार रझाकारांनीं सर वाल्टर मांकटन, छत्तारीचे नबाब व सुलतान अहंमद यांच्या घरांना वेढा दिला. त्यांना दिल्लीस जाऊं दिलें नाहीं. निजामनेंहि त्यांना दिल्लीस जाऊं नका असा संदेश पाठविला. त्या तिघांनीं राजीनामे दिले, दरम्यान निजामसाहेब कासीम रझवी व पाकिस्तान यांच्याशीं लढयाच्या तयारीच्या दृष्टीनें बोलाचाली करूं लागले. निजामनें कार्यकारीचें अध्यक्षस्थान लायकअलींना दिलें व कासीम रझवी हा सर्व कारभार पाहूं लागला. तो युद्धाची भाषा बोलूं लागला.

२५ नोव्हेंबरला हैद्राबादला नवें प्रतिनिधि-मंडळ अधिकारावर आलें. त्या मंडळानें तडजोडीचा एक मसुदा तयार केला. त्यावर निजामनें २९ नोव्हेंबरला सही केली. त्यांत ५ कलमें होतीं. परराष्ट्र, राजकारण, संरक्षण हीं खातीं भारत सरकारकडे दिलीं. पण अंतर्गत अशांततेच्या वेळीं सैन्य पाठविण्याचा भारत सरकारला अधिकार नव्हता. भारत सरकार हें श्रेष्ठ सरकार मानण्यास निजामानें नकार दिला. या तडजोडीची मर्यादा एक वर्ष राहील असें त्यांत म्हटलें होतें.

२९ नोव्हेंबरला हा १ वर्षाच्या मुदतीचा तह सरदारांनीं घटना-परिषदेंत घोषित केला. त्या तहाप्रमाणें भारत सरकारनें श्री. कन्हय्यालाल मुनशी यांना एजंट जनरल नेमलें. निजामनें वरील तहांतील अटी मोडण्यास सुरुवात केली. त्याचबरोबर रझाकारांचे भयंकर अत्याचार सुरू झाले. स्त्रियांची बेअब्रू, लुटालूट, कत्तली, जाळपोळ वगैरेंनीं हैद्राबाद भयभीत झालें. हे रझाकार आपल्या संस्थानाबाहेरहि हल्ले करीत. सरदारांनीं कासीम रझवीचीं भाषणें, बंडें, अत्याचार थांबले नाहींत, तर घोर आपत्ति ओढवेल असा दमहि भरला. पण निजामसाहेब, कासीम रझवीमार्फत हैद्राबादला रणभूमीची तयारी करीत होते. त्या वेळीं काँग्रेसचे पुढारी रामानंद तीर्थ हे तुरुंगांत होते. त्यांना व इतर

पुढाऱ्यांना सोडून देण्याबद्दल सरदार दडपण आणीत होते. पण त्याचा उपयोग होत नव्हता. दिवसेंदिवस दहशत जास्त भयानक होऊं लागली. जूनमध्यें लॉर्ड मौंटबॅटन गेले व राजाजी गव्हर्नर जनरल झाले. त्या वेळीं सुमारें १०,००० काँग्रेसचे लोक तुरुंगांत होते.

रझाकार जे अत्याचार करीत त्याचे प्रकार भयानक होते. ते बायकांशीं व्यभिचार करीत, त्यांची बेअब्रू करीत. त्यांनीं कांहींचे डोळे काढले, घरेंचीं घरें पेटवलीं. कासीम रझवीचें पाशवी राज्य भारत सरकार कसें सहन करतें असा प्रश्न साऱ्या देशांत विचारला जाऊं लागला. निजामविरोधी मुसलमानांचेहि हात तोडले गेले ! हैद्राबादमध्यें उघड उघड शस्त्रास्त्रें आणण्याचें काम सिडने कॉटन हे गोरे गृहस्थ करीत होते. विमानांतून ते कराचीच्या मार्गानें शस्त्रसामुग्री आणीत. रझाकारांची एकूण संख्या २ लाख ४० हजार होती.

हैद्राबादवर स्वारी केली पाहिजे असें भारतीय मंत्रिमंडळाचें मत होतें. सरदार तर प्रक्षुब्ध झाले होते. नेहरूंना स्वारी नको होती. त्यांना सरदार जातीवादी वाटत. तें ऐकून सरदारांनीं राजीनामा दिला. पण राजाजींनीं त्यांना तो परत घ्यावयास लावला. पुढें नेहरूंकडे कानडाच्या वकिलानें रझाकार खिस्ती मिशनरी स्त्रियांवर बलात्कार करतात अशी तक्रार केली. तेव्हां नेहरूंचे डोळे उघडले व त्यांनीं हैद्राबादवर स्वारी करण्यास संमति दिली.

सरदारांनीं सैन्याला १३ सप्टेंबर रोजीं हैद्राबादवर स्वारी करण्याचा हुकूम सोडला. मेजर जनरल जे. एन्. चौधरी हे भारत-सेनाप्रमुख होते. मुख्य सैन्य सोलापूर हैद्राबाद या रस्त्यानें स्वारीवर निघालें. दुसरी तुकडी बेझवाड्याच्या रस्त्यानें हैद्राबादकडे निघाली. ह्या सैन्याला रझाकाराकडून प्रतिकार होईल, मोठें युद्ध होईल असें जें वाटत होतें तें खोटें ठरलें. म्हणण्यासारखा प्रतिकार, म्हणण्यासारखा लढा कोठेंच झाला नाहीं. रझाकार शरण आले, पळाले. ८०० रझाकार मारले गेले. हिंदी सैन्याचें कांहींच नुकसान झालें नाहीं. १७ सप्टेंबरला हैद्राबादचे सेनापति एड्रूस हे जनरल चौधरींना शरण गेले. १८ सप्टेंबरला ज. चौधरी विजयी सेनापति म्हणून हैद्राबादमध्यें प्रवेश करते झाले. हैद्राबादचा पूर्ण पराभव झाला.

लायकअली व त्यांचें मंत्रिमंडळ नजरकैदेंत ठेवलें गेलें. श्री. मुनशी यांना बंदिस्त केलें होतें, त्यांतून त्यांची सुटका केली. कासीम रझवीला कैद

करण्यांत आलें. पुढें लायकअली हिंदुस्थानांतून पाकिस्तानांत पळून गेला. तो कसा पळून केला हें एक रहस्य आहे. रझवीला शिक्षा झाली. हैद्राबादमध्यें प्रथम हंगामी, नंतर सनदशीर राज्य स्थापन झालें. कै. बी. रामकृष्ण राव पहिले मुख्य मंत्री झाले. पुढें राज्यपुनर्घटना होऊन हैद्राबादचे तीन तुकडे पाडले. मराठवाड्याचे ५ जिल्हे महाराष्ट्रांत, ३ जिल्हे म्हैसूरमध्यें व ८ आंध्रमध्यें गेले. हैद्राबाद संस्थान अशा प्रकारें भारताचा एक अविभाज्य भाग बनलें. या सर्वांचें श्रेय एकट्या सरदार पटेलांना आहे.

* * *

११ : गोमंतक भारतांत आणला

हिंदुस्थान स्वतंत्र झाला; पण ज्या वेळीं ब्रिटिश येथून गेले त्या वेळीं फ्रेंच व पोर्च्युगीज गेले नाहींत. १ नोव्हेंबर १९५४ रोजीं फ्रेंचांनीं आपल्या वसाहतींवरील ताबा सोडला. पांदेचरी, चंद्रनगर व मही भारताच्या ताब्यांत आलीं. कायदेशीर रीत्या त्या विभागांचें हस्तांतर झालें नसावें; पण त्यावर प्रत्यक्ष अंमल भारताचाच आहे. गोवा हा दुसरा परक्यांच्या ताब्यांतील मुलूख. गोव्यांत दादरा–नगरहवेली हा एक छोटासा तुकडा आहे आणि मोठा तुकडा म्हणजे दीव, दमण व गोवा. २२ जुलै १९५४ रोजीं 'गोवामुक्तिदला'नें दादरा व नगरहवेलीवर हल्ला केला. आठ दहा शिपाई तेथें होते. त्यांना कैद करून दादरा–नगरहवेलीवर तिरंगी झेंडा फडकविण्यांत आला. पोर्च्युगीजांनीं सशस्त्र प्रतिकार न करतां हेग कोर्टांत फिर्याद दाखल केली. पण त्या कोर्टाच्या निकालाचा विचार करण्याची जरुरी पडली नाहीं. पोर्च्युगीजांचें म्हणणें गोवा हा नाटोच्या (नॉर्थ अॅटलांटिक ट्रिटी ऑर्गनायझेशन) कक्षेंत येतो. हिंदुस्थानचा तो भाग नाहीं. पण असली बडबड भारताला कधींच मान्य नव्हती.

गोवामुक्तीचा प्रश्न एका दृष्टीनें सोपा, पण एका दृष्टीनें अवघड होता. हिंदुस्थानचें धोरण शांततेच्या मार्गानें असले प्रश्न सोडवावेत असें होतें. म्हणून भारत सरकार पोर्च्युगालचे डिक्टेटर डॉ. सालाझार यांना सद्विचार व शहाणपणा शिकवीत होते. पण पोर्च्युगालमध्यें या वस्तूंच्या आयातीवर बंदी आहे.

१९४६ पासून १९५५ पर्यंत गोवामुक्तीची निःशस्त्र चळवळ चालू होती. डॉ. राममनोहर लोहिया यांनीं १९४६ सालींच सत्याग्रहाचें रणशिंग फुंकलें. १९५५ सालीं १५ ऑगस्टला सत्याग्रहानें उग्र स्वरूप धारण केलें. पोर्च्युगीजांना माणुसकी ठाऊक नव्हती. त्यांनीं सत्याग्रहींचा अमानुष छळ केला. लाठ्या, बंदुका, वगैरे साधनें त्यांनीं क्रूरपणें वापरलीं. सुमारें २००० सत्याग्रही गोवा हद्दींत शिरले. त्यांना मारपीट करून फरफटत ओढत नेऊन व त्यांचा छळ करून पोर्च्युगालनें आपल्या विकृत खिस्ती धर्माचा व साम्राज्यशाहीचा एक भयानक प्रकार दाखविला. पकडलेल्यांना १०।१० वर्षांपेक्षां अधिक शिक्षा दिल्या व त्यांचे तुरुंगांत हालहाल केले. डॉ. गायतोंडे, सौ. सुधाताई जोशी, श्री. नानासाहेब गोरे, सेनापति बापट, शिरुभाऊ लिमये, कै. विष्णुपंत चितळे वगैरे सत्याग्रहींनीं अत्यंत हाल सोसले. त्या संग्रामांत चौधरी, हिरवे, थोरात, करनालसिंग, सहा, महांकाल हे सहा जण मरण पावले. सत्याग्रहांत बलिदान झालें; पण गोवा मुक्त झाला नाहीं. त्या लढ्याबरोबर जर भारत सरकारनें सशस्त्र चढाई केली असती तर गोवा १९५५ सालींच मुक्त झाला असता. पण आंतरराष्ट्रीय धोरणाच्या विवंचनेंत गुरफटलेल्या सरकारनें आक्रमण केलें नाहीं. त्याला आणखी सहा वर्षें लागलीं.

गोव्यांत दिवसेंदिवस पोर्च्युगीजांचा जुलूम असह्य होत गेला. चढाई करण्याला कारणें कमी होतीं असें नाहीं; पण परराष्ट्रीय धोरणाच्या ताजव्यांत सारे प्रश्न मोजले जात होते. अखेरीस १९६१ सालच्या डिसेंबरांत भारत सरकारचें तटस्थतेचें धोरण संपलें व त्यांनीं चढाई करण्याचें ठरविलें.

११ डिसेंबर १९६१ रोजीं जवाहरलाल नेहरूंनीं राज्यसभेंत भाषण केलें. पोर्च्युगीज शिपायांच्या क्रूरतेचें वर्णन केलें. ते म्हणाले, गोवा हद्दींत १॥ मैलावर तेरेखोल नांवाचें खेडें आहे. ७ डिसेंबर रोजीं कांहीं पोर्च्युगीज शिपाई त्या खेड्यांत गेले व त्यांनीं तेथील लोकांना घराबाहेर काढलें. ते जाणार कुठें ? हिंदी बांधव त्यांना आपल्यांत घ्यावयास तयार होते. हें कळतांच पोर्च्युगीज शिपाई हिंदी खेड्यांत शिरले. त्यांनीं हिंदी लोकांना दहशत घातली, बॉम्ब् उडविले. हें हिंदी शिपायांना कळतांच त्यांनीं पोर्च्युगीज शिपायांवर गोळ्या झाडल्या. पोर्च्युगीज शिपाई पळून गेले. पोर्च्युगीज शिपायांनीं तेरेखोलमधील १५० लोकांना पकडलें. ते शिपाई परत हिंदी हद्दींत घुसले. हे प्रकार

तीन दिवस चालू होते. त्याच अत्याचाराचें निमित्त करून हिंद सरकारनें गोव्यावर स्वारी करण्याचें ठरविलें.

गोव्याचा ग. जनरल डि. सिल्व्हा याला हिंदुस्थान स्वारी करणार हें ठाऊक नव्हतें असें नाहीं. ११ डिसेंबरलाच नेहरूंनीं सैन्य पाठविण्याची घोषणा केली. हिंदुस्थानांतील रेल्वे व रस्ते लष्करांची रवानगी करीत होते. दारूगोळा, तोफा यांची वहातूक होत होती. हिंदुस्थानांत युद्धाचें वातावरण निर्माण झालें होतें. ११ डिसेंबरपूर्वींच ह्या हालचाली सुरू झाल्या.

१८ डिसेंबर १९६१ रोजीं रात्रीं बारा वाजून जातांच हिंदी टेहेळ्यांनीं गोव्यांत प्रवेश केला. त्याच तारखेला अगदीं पहाटेस मेजर जनरल कॅनडेथच्या १७ व्या तुकडींतील एका विभागानें गोव्याची सरहद्द ओलांडली. उत्तरेकडून ब्रिगेडिअर सुगतसिंगाच्या तुकडीनें गोव्यांत प्रवेश केला व संध्याकाळच्या आंत गोव्याची राजधानी पंजीम गांठली. १९ तारखेला सकाळीं त्यांनीं पंजीममध्यें प्रवेश केला. दोन्हीहि फौजांना कुठेंच प्रतिकार झाला नाहीं.

पोर्च्युगीजांनीं पूल वगैरे उडवून दिले होते. पण ते अपेक्षित होते. भारतीय सेना नद्या-खाड्या पोहत गेली. लोकांनीं या सैन्याचें स्वागत केलें. त्यांना खाणें, चहा वगैरे दिला. मोटारी, होड्या वगैरे सर्व पुरविल्या. ६३ वी पायदळ तुकडी ब्रिगेडिअर कुलवंतसिंग धिलनच्या नेतृत्वाखालीं फोंड्याला पोहोंचली व तेथून मार्मा गोवाला गेली. त्यांना पोर्च्युगीज लष्करानें थोडासा प्रतिकार केला. पण प्रतिहल्ला होतांच ते पळून गेले. त्यांनीं पळून जातांना आपल्या चिलखती गाड्या, शस्त्रें व जीप्स तेथेंच टाकून दिल्या. ४ वाजतां ह्या तुकडीनें मार्मा गोवांत प्रवेश केला. आणखी दोन ठिकाणांहून हिंदी फौजांनीं आक्रमण केलें. पण त्यांना कोठेंहि प्रतिकार झाला नाहीं.

पोर्च्युगीजांची एका बाबतींत फसगत झाली. त्यांना वाटलें हिंदी फौजा आस्तेकदम येतील, युद्ध रेंगाळेल व आपण जगांत आक्रोश करून जगाची मदत मिळवूं. पण डोळ्यांचें पातें लवावें न लवावें इतक्या अल्पावधींत भारतानें गोव्याचा ताबा घेतला. गोव्यावरील पोर्च्युगीज राज्य संपलें ह्याहि गोष्टीवर तेथील लोकांचा विश्वास बसेना.

१९ तारखेला रात्रीं ९ वाजतां गोव्याचे ग. जनरल डि. सिल्व्हा यांनीं गोवा शरण आल्याचा लखोटा ब्रिगेडिअर धिलन यांच्या हातीं दिला.

१९ तारखेला सकाळीं ८-२० वाजतां दमण व ११ वाजतां दीव शरण आलें होतें.

या लढाईंत विमान व आरमार यांनींहि उत्कृष्ट कामगिरी बजावली. विमानांनीं १८ तारखेला पंजीमजवळील विमानतळ व बिनतारी संदेशवाहक यंत्रें उध्वस्त केलीं. त्यामुळें लिस्बनचा संबंधच तुटला. पण यापलीकडे भारतीय विमानदलांनीं कोठलीहि हानि केली नाहीं.

पण आरमाराला थोडीशी तसदी पडली. १८ डिसेंबरला आरमारानें अंजनदेव बेट सर केलें. पोर्च्युगीजांची फौज शरण आली, तिनें पांढरा बावटा दाखविला. पण जेव्हां हिंदी सैन्य जमिनीवर उतरूं लागलें, तेव्हां त्यांनीं त्या सैन्यावर गोळ्या झाडल्या. त्यांत सात हिंदी सैनिक ठार झाले. या आरमारानें अल्बुकर्क नांवाचें बिनतारी संदेशवाहक पोर्च्युगीज जहाज निरुपयोगी करून टाकलें.

या गोव्याच्या लढाईंत १५ हिंदी सैनिक व १६ पोर्च्युगीज ठार झाले. जखमी झालेल्यांची दोन्ही बाजूंची बेरीज ५० वर नव्हती. हिंदची स्वारी होत आहे असें समजतांच अनेक पोर्च्युगीज अधिकारी बंदरांत नांगरून पडलेल्या १९ परक्या राष्ट्रांच्या जहाजांत आश्रयार्थ दडून राहिले. नागरिक मालमत्तेचें बिलकूल नुकसान झालें नाहीं. अवघ्या ३६ तासांत गोव्याची लढाई संपली. हिंदुस्थानांत लढाई सुरू झाल्याची बातमी येते न येते तोंच ती लढाई संपली होती.

जे युद्धकैदी हिंदुस्थानच्या स्वाधीन झाले ते सांगत कीं, आम्हांला लढा असा हुकूमच नव्हता आणि पोर्च्युगीजांचें सैन्य तरी तेथें किती होतें ? फक्त ३६००. तें सैन्य आंतील बंडाळी मोडण्याकरितां होतें.

सैनिक तरी कसले होते ? त्यांना जिद्द नव्हती, खुमखुमी नव्हती. दारू पिऊन व बायकांच्या मागें लागून ते सुखासीन झाले होते. दारूगोळ्यांचा साठा जवळ असण्याऐवजीं दारूच्या बाटल्यांचा मोठा साठा त्यांच्या जवळ होता. एकेकाचीं पोटें दारू पिऊन नगाऱ्याएवढीं फुगलेलीं होतीं. चार पावलें टाकण्याची त्यांची तयारी नसे. आम्हांला घरीं जाऊं द्या, बदला असे अर्जावर अर्ज ते करीत. अशा व्यसनाधीन सैनिकांविरुद्ध कसली लढाई ! त्यांनीं लढायचें ठरविलें असतें तर २०,००० सैनिकांना पुरेल इतका

दारूगोळा व शस्त्रास्त्रें त्यांच्या जवळ होतीं. पण शस्त्रें लढत नाहींत; माणसें लढतात. पण एक गोष्ट या सैनिकांनीं केली. ग. जनरच्या हुकमानें त्यांनीं पूल उडविले, पण पुढें काय? लढणार कोण? त्यांनीं सुरुंगहि पेरले होते. ते सुरुंग गोव्यांतील लोकांनीं दाखवून दिले व काढले गेले.

डॉ. सालाझार यांनीं एक गुप्त संदेश ग. जनरलला पाठविला होता. तो संदेश एका हिंदी अधिकाऱ्यानें मध्येंच अडविला. संदेशांत म्हटलें होतें, 'ता. १४ डिसेंबरला भारताची स्वारी होणार आहे. २१ डिसेंबरपर्यंत प्रतिकार करीत राहा. मी त्या मुदतींत युनोला मध्यस्थी करण्यास सांगेन.' पण पोर्च्युगीज शिपायांनीं प्रतिकार केला नाहीं. त्यांचा ग. जनरलच १९ तारखेला शरण गेला.

साऱ्या गोव्यांत लोकांच्या आनंदाला भरती आली होती. मोठमोठ्या जाहीर सभांतून हिंदी सैन्याचें व सरकारचें अभिनंदन केलें जात होतें. त्यांत ख्रिश्चन्स होते, हिंदु होते, सर्व धर्मांचे लोक होते. रस्त्यांतून लोकांची रीघ लागली होती. घरोघर दीपोत्सव केले गेले. मेजवान्या झाल्या. राष्ट्रीय निशाणें फडकलीं. भारताच्या स्वातंत्र्यानंतर १४ वर्षांनीं गोवा स्वतंत्र झाला. पण ४५० वर्षांच्या गुलामगिरींतून तो प्रथमच मुक्त झाला. अजून गोव्याचीं सारीं शल्यें निघालीं नाहींत. श्री. रानडे पोर्च्युगालमध्यें अटकेंत आहेत!


गोव्याला श्री. बांदोडकरांनीं राज्य चांगलें चालविलें; पण त्यांना गोवा महाराष्ट्रांत आणतां आला नाहीं.

* * *

१२ : भारताची माणुसकी

१९५९ सालच्या फेब्रुवारी व मार्च महिन्यांत तिबेटच्या स्वातंत्र्यानें अखेरचा श्वास सोडला. इतिहासानें अनेक क्रूर, राक्षसी कत्तली पाहिल्या असतील, नोंदल्या असतील; पण ५०,००० तिबेटी माणसें एका दिवसांत ठार मारण्याचा विक्रम फारच थोड्या राष्ट्रांनीं केला असेल. हिटलरनें दुसऱ्या युद्धांत अग्नि-कुंडच पेटविलें होतें व त्यांत हजारों ज्यूंना व कम्युनिस्टांना ढकलून जाळून टाकलें होतें. हंगेरींत अगदीं अलीकडे रशियन कम्युनिस्टांनीं तेथील बंड मोडण्याकरितां आपल्या रणगाड्यांखालीं लोकांना चिरडून ठार मारलें होतें. आठ दहा वर्षांपूर्वीं फ्रेंचांनीं अल्जेरियांत भयंकर मनुष्यसंहार केला. दुसरें महायुद्ध तर हिरोशिमा व नागासाकीवर अमेरिकेनें अणुबाँब टाकून संपविलें. अमेरिका, फ्रान्स, रशिया, जर्मनी व चीनसारखीं राष्ट्रें किती क्रूर आहेत याची साक्ष इतिहास देतो. ही रक्तपिपासु वृत्ति ज्यांना आज जगांत बलाढ्य राष्ट्रें म्हणतात, त्यांची नष्ट झाली नाहीं. चीनमध्यें आज काय चाललें आहे ? व्हिटनाममध्यें कोणता इतिहास घडला ? मानवतेचा अद्याप थरकांप होत आहे. हें कसें, केव्हां, कोण थांबवणार ?

चीनला पाहिजे होता तिबेट. तो एक बुद्धधर्मीय लामांचा देश. मठांत राहावें, ईशचिंतन करावें, प्रार्थना, उपासतापास करावेत, धर्मग्रंथ वाचावेत एवढीच त्यांची जीवितसाधना. कालपरवांपर्यंत तेथें साथकल ही वस्तु माहीत नव्हती. पण निसर्ग त्यांच्यावर अनुरक्त आहे. कैलास पर्वत व ब्रह्मपुत्रा, सिंधुसारख्या नद्या येथेंच उगम पावल्या आहेत. चीनला समृद्ध करणाऱ्या



दलाई लामा

यांगसी सारख्या नद्याहि तेथूनच निघतात. हा प्रदेश दुर्लंघ्य असला तरी सोनें तेथें विपुल सांपडतें. तिबेटमध्यें साऱ्या बुद्धाच्या मूर्ति सोन्याच्या आहेत.

असा हा तिबेट चीनला हवा होता. त्यांच्या पराक्रमाला ऊत आला होता. न्याय-अन्याय त्यांनीं गुंडाळून ठेवला होता. तिबेट घेण्याचा त्यांनीं निश्चय केला. दलाई लामा हा तेथील राज्यप्रमुख. लोकांचें दलाई लामावर अत्यंत प्रेम. ह्या दलाई लामाला कैद करण्याचा किंवा ठार मारण्याचा बेत चिनी अधिकाऱ्यांनीं केला. खुद्द दलाई लामानें आपल्या अस्तित्वाचा अंत कसा झाला याचें हृदयद्रावक वर्णन केलें आहे.

× × ×

फेब्रुवारी १९५९ चा महिना. त्या महिन्यांत तिबेटमध्यें 'मोनलॅम' नांवाचा धार्मिक सण साजरा केला जातो. लोक मोठे उत्साही व आनंदी असतात. अनेक धार्मिक कृत्येंहि केलीं जातात. त्या वेळीं तिबेटमध्यें ल्हासाला चिनी लष्करी तुकडीची छावणी होती. ती ल्हासाच्या उत्तरेला होती. त्या छावणींतून दोन लष्करी अधिकारी लामा ज्या देवालयांत होते तेथें आले. ते म्हणाले कीं, आम्ही एक नाटक करणार आहोंत व त्या नाटकाला दलाई लामाला आमंत्रण देण्याकरितां आलों आहों. दलाई लामानें कळविलें मोन-लॅमचा सण दहा दिवसांत संपल्यावर मी केव्हां येईन तें कळवीन. हें उत्तर ऐकतांच चीनच्या मुख्य लष्करी अधिकाऱ्याचा राग अनावर झाला. त्यानें आपल्या छावणींत बसून आपल्या अधिकाऱ्यासमोर दलाई लामाला अत्यंत घाणेरड्या शिव्या दिल्या.

त्या नाटकाला आमंत्रण म्हणजे कैदेचें किंवा मृत्यूचें आमंत्रणच होतें. ल्हासामधील लोकांना ही आमंत्रणाची बातमी लागतांच आतां आपला लामा मरणार असें त्यांना वाटूं लागलें. हजारों लोक देवळाभोंवतीं जमा झाले.

५ मार्च १९५९ रोजीं दलाई लामा देवळांतून निघाले व आपल्या नोरबुलिंकच्या वासंतिक राजवाड्यांत येऊन राहिले. ७ मार्चला पुनः नाटकाला आमंत्रण आलें. दलाई लामांनीं १० मार्चचें आमंत्रण स्वीकारलें. चिनी अधिकाऱ्यांनीं दलाई लामाबरोबर कोणी सशस्त्र शिपाई असतां कामा नये; पण दोन निःशस्त्र शरीररक्षक चालतील अशी अट घातली.

मोनलॅमचा सण नुकताच संपला होता. बरेच लामा गांवोगांव परतले होते. पण ल्हासामध्यें एक लाख लोक तरी परत जावयाचे राहिले होते. साऱ्या ल्हासामध्यें ही नाटकाची बातमी फैलावली. कोणीच परत जाईनात. ९ मार्चची रात्र ल्हासांतील तिबेटी लोकांनीं जागून काढली. १० तारखेच्या सकाळपासून लोकांचे थवेच्या थवे राजवाड्यावर लोटूं लागले. त्यांनीं लामाला बाहेर पडूं द्यावयाचें नाहीं असा निश्चय केला. रात्रभर मंत्रिमंडळाची बैठक चालली होती. त्या बैठकींत असें ठरलें कीं, दलाई लामाबरोबर आपणहि नाटकाला जायचें व जें काय होणार असेल तें डोळ्यांनीं पाहायचें.

सकाळच्या प्रहरीं दलाई लामांनीं पूजा-अर्चा व इतर धार्मिक कृत्यें उरकलीं. आपण आतां परत येणार नाहीं हें त्यांना ठाऊक होतें. त्यांनीं देवाचा

अखेरचा निरोप घेतला. पण त्यांना बाहेर कोण जाऊं देणार ? बाहेर हजारों लोकांचा गराडा पडला होता. दलाई लामांना नेण्याकरितां चिनी अधिकाऱ्यांना राजवाड्यांत कोण येऊं देणार ? लोक अत्याचारहि करूं लागले. संशयित चीन-धार्जिण्याला ते मारूं लागले. एकाला दगडानें ठेंचून ठार मारलें. हा सर्व लोकक्षोभ पाहून मंत्रिमंडळाला वाटलें कीं, हा प्रक्षुब्ध जमाव चिनी लष्करी छावणीवर चाल करून जाईल व त्यांत हजारों जण मृत्युमुखीं पडतील. म्हणून त्यांनीं छावणींत निरोप पाठविला कीं, बाहेर लोकांचा वेढा पडला आहे, त्यांतून बाहेर पडणें व नाटकाला येणें शक्य नाहीं. दलाई लामा येऊं शकत नाहींत.

हा निरोप घेऊन जेव्हां तिबेटी मंत्री चिनी छावणींत गेले, तेव्हां तेथील मुख्य लष्करी अधिकारी रागानें लाल झाला. तिबेटचा नायनाट करण्याचा डाव असा उधळला जात होता, पण तो करतो काय ? जळफळाट करून भागणार नव्हतें. शेवटचा फांस आवळण्याची त्याची तयारी पुरी झाली नव्हती. त्यानें मोठ्या मानभावीपणानें दलाई लामाला पत्रें लिहिलीं. प्रेमाचा वर्षाव केला. तुमच्या जीवाच्या सुरक्षिततेकरितांच मी छावणींत बोलावलें वगैरे मुत्सद्देगिरीचे खलिते त्यांनीं लामाकडे रवाना केले. पण लामा हे धार्मिक वृत्तीचे असले, तरी कमी मुत्सद्दी नव्हते. त्यांनींहि तशीच प्रेमाचीं व लोभाचीं उत्तरें पाठविलीं. ४–५ दिवस ही तिबेटची मृत्युघटिका दूर झाल्यासारखी वाटली.

१६ व १७ मार्च १९५९ हे दोन दिवस तिबेटच्या इतिहासांत अत्यंत निर्णायक ठरले. १६ मार्चला चिनी सैनिक विमानांतून ल्हासाला उतरले. राजवाड्यावर तोफा डागण्याकरितां तोफखान्यांच्या हालचाली होऊं लागल्या. रॉकेल ओतलें होतें, काडी पेटविण्याचा अवकाश होता. मंत्रिमंडळाला व खुद्द लामांना एकच चिंता. शहर वांचावें व प्राणहानि होऊं नये, म्हणून दलाई लामा चीनच्या स्वाधीन होण्यासहि तयार झाले. लोकांचा गराडा राजवाड्यावरून उठला नव्हता. रात्रंदिवस लोक आपल्या राजाचें–दलाई लामाचें–प्राणपणानें रक्षण करीत होते. त्यांना चुकवून चिनी छावणींत जो निरोप पाठविण्यांत आला त्याचा उपयोग झाला नाहीं.

१७ मार्च उजाडली. दुपारचे ४ वाजले होते. त्या वेळीं दोन उखळी

तोफांतून सुटलेल्या गोळ्याचे आवाज ऐकू आले. गोळ्यांचा धडाकाहि झाला. राजवाड्यावर गोळीबार सुरू झाला. दलाई लामासह राजवाडा उध्वस्त करावयाचा, प्रतिकार केल्यास तिबेटी जनता कापावयाची, घरेंदारें जाळावयाचीं, मठांतील कोट्यवधि रुपयांचीं हिरे–माणकें, सोनें, चांदी लुटावयाचीं, धान्याचीं कोठारें लुटावयाचीं अशी ती राक्षसी योजना होती.

संध्याकाळीं मंत्रि-मंडळाची बैठक भरली. चर्चा झाली. संकटाला कसें तोंड द्यावयाचें याचा विचार झाला आणि शेवटीं असें ठरविण्यांत आलें कीं, दलाई लामांचा देह शत्रूच्या हातीं जिवंत लागूं द्यावयाचा नाहीं. राजवाड्यांतून बाहेर पडावयाचें, ल्हासा सोडावयाचें, म्हणजे तिबेटच्या स्वातंत्र्यावर पाणी सोडावयाचें. दलाई लामानें आत्मचिंतन केलें. त्यांना आंतून प्रेरणा झाली कीं, 'तूं जा,' पण जाणार कसें? लोकांना कसें चुकवणार? पण कर्णोपकर्णीं हा गुप्त बेत म्होरक्यांना कळविण्यांत आला.

रात्रीचे १० वाजले होते. १७ मार्चची ती तारीख होती. दलाई लामानें सैनिकाचा पोषाख केला व ओळख पटूं नये म्हणून त्यांनीं आपला चष्माहि काढून टाकला. जाणाऱ्यांचा काफला होता मोठा, त्याच्या ३ तुकड्या केल्या. एका तुकडींत लामांची आईबहीण होती. त्यांना लष्करी पोषाख घातला. दुसऱ्या तुकडींत होते लामा, तिसऱ्या तुकडींत मंत्रीगण व इतर. रात्रीं बरोबर १० वाजतां राजवाड्याची दक्षिणेकडील दारें उघडलीं गेलीं व घरचे मालक वनवासाला बाहेर पडले. लोकांनीं कांहीं गडबड केली नाहीं. चिनी लष्करांना ती बातमी २० तारखेपर्यंत कळली नाहीं.

पण हा लवाजमा कोठें जाणार? कांहींच नक्की नव्हतें. लामांच्या आगमनाची बातमी अगोदर गांवोगांव कळविली होती. गांवांगांवातून लोक अश्रुपूर्ण नयनांनीं त्यांचें स्वागत करीत होते. उत्तम बरदास्त ठेवीत होते.

दलाई लामांना वाटलें कीं, आपण याच भागांत तिबेटचें राज्य स्थापन करावें. पण सल्ला मिळाला तसें करूं नका. नव्या संकटांत सांपडाल. या यात्रेकरूंच्या मनांत एकच भीति संचरून राहिली होती. शत्रु आपल्या पाठीवर पाठलागाकरितां आला तर? पण तसें झालें नाहीं. एक व एकच विमान घिरट्या घालून गेलें.

हिंदुस्थानच्या सरहद्दीच्या रोखानें ही यात्रा चालली होती. त्यांच्या

प्रवासांत त्यांना कळलें कीं, २० मार्चला ल्हासावर चीननें क्रूरपणें हल्ला केला. सारें शहर लुटलें, जाळलें. लोक मारले, कापले, जाळले. देवळे, मठ, विद्यालयें सारीं जमीनदोस्त केलीं. तिबेटची सुवर्णभूमि, धर्मभूमि स्मशानभूमि केली. चिन्यांना एकाच गोष्टीबद्दल वाईट वाटलें. दलाई लामा निसटला. जेथें एका दिवसांत त्यांनीं ५०,००० लोक मारले तेथें एक व्यक्ति मारतां येऊं नये हा त्यांच्या क्रूरतेचा धिःकार होता. तिबेट परतंत्र झाला.

दलाई लामा व त्याचे सहयात्री भारतभूमीकडे आश्रयाकरितां मोठ्या आतुरतेनें पाहात होते. जवाहरलाल नेहरू आपल्याला आश्रय देतील का ? चीनबरोबरचे त्यांचे संबंध मित्रत्वाचे होते. ती मैत्री आड येईल का ? कर्मावर भरंवसा टाकून हे दलाई लामांचे पदयात्री डोंगर, दऱ्या, बर्फ, जंगलें, नद्या, ओढे, नाले, निर्झर ओलांडीत पुढें पुढें चालले होते.

२५–२६ मार्चला त्यांनीं आपले अग्रदूत भारताच्या सीमेवर पाठविले. सिक्किमला ती सरहद्द मिळत होती. हिंदी व तिबेटी अधिकाऱ्यांचीं बोलणीं झालीं. भारत सरकारकडे तारा पाठविल्या गेल्या. दलाई लामांची आश्रयार्थ विनंती निवेदन करण्यांत आली. तारेनें उत्तर आलें, ‘ दलाई लामा व इतरांना आम्ही आश्रय देतों. ’ भारतांत माणुसकी होती. ती जागीच होती. तिनें प्रतिसाद दिला. सरहद्दीवर दलाई लामा व त्यांचे साथी ३१ मार्च १९५९ रोजीं रात्रीं १० वाजतां हिंदच्या हद्दींत प्रविष्ट झाले. त्यांचें आदरानें स्वागत करण्यांत आलें. त्यानंतर लवकरच जवाहरलालजी दलाई लामाच्या भेटीला तेजपूरला गेले. तेव्हांपासून दलाई लामा येथेंच राहात आहेत.


त्यांनीं आपल्याबरोबर संपत्ति आणली नाहीं, पण मानवता आणली. तीच येथें त्यांना आश्रय व धीर देत आहे.

* * *

१३ : स्वतंत्र भारतावरील पहिलें मोठें आक्रमण

१९६० पासूनच जवाहरलाल नेहरूंची मनःस्थिति अस्वस्थ होत चालली होती. त्यांना एकटे एकटे वाटत होतें. भकासपणें ते हिंडत, फिरत, बसत, वावरत. वैफल्यानें त्यांना ग्रासलें होतें. त्यांना विशेष धक्का दिला चीननें. चीनच्या पुढाऱ्यावर त्यांचा पूर्ण विश्वास होता असें नाहीं; पण ते दगेबाजी करतील असें त्यांना वाटत नव्हतें.

१९६० ते १९६२ सालअखेर चीनच्या कारवायांना ऊत आला होता. नेफा, अक्साई चीन व लडाख या भागांत त्यांनीं हिंदी ठाणीं सर करण्याचा सपाटा लावला. चीन आपल्या सैन्याची जमवाजमव त्या भागांत करीत आहे, अशा बातम्या दिल्लींत येत होत्या. त्या वेळीं कृष्णा मेनन हे संरक्षणमंत्री होते. कृष्णा मेनन हे चीनपासून धोका नाहीं, पाकिस्तानकडून धोका आहे असें म्हणत असल्याच्या बातम्या प्रसिद्ध होत होत्या. वास्तविकपणें कृष्णा मेननर्नी काश्मीरमधील कांहीं फौज उठवावी व नेफाकडे पाठवावी असें सांगितलें होतें म्हणतात; पण त्यांचें तें म्हणणें पंतप्रधानासह सर्वांनीं फेटाळून लावल्याचें समजतें. ही हकीकत स्वतःच्या समर्थनार्थ कृष्णा मेननर्नी सांगावयास पाहिजे होती. पण ते अहंकारी, गर्विष्ठ व जिभेचे तिखट गृहस्थ. ही हकीकत प्रे. नासरचे सल्लागार महंमद हैकल हे ज्या अल् अहराम या पत्राचे संपादक होते, त्या पत्रांत सामी मन्सुर यांनीं प्रसिद्ध केली. सदर मन्सुर हे चिनी आक्रमणाचे वेळीं दिल्लीस होते. त्यांनीं दिल्ली मंत्रिमंडळांतील चर्चेचें तपशीलवार वृत्त नेहरूंच्या मृत्यूनंतर नऊ महिन्यांनीं प्रसिद्ध केलें.



१९६१ च्या जून–जुलैमध्यें पंचशीलचा शेवट झाला. नेहरू मानसिक दृष्ट्या खचत चाललें होतें. मेरी सेटन म्हणतात* कीं, त्यांच्या घरीं ऑगस्टमध्यें मी गेले. त्यांचा चेहरा, त्यांची हालचाल वगैरे पाहिली व मनांत चर्र झालें. वर्ष दोन वर्षांचे हे सोबती आहेत असें मला वाटलें. इंदिरेजवळ त्या ह्या गोष्टींबद्दल बोलल्या. इंदिरा म्हणाल्या, ‘आतां पंतजी गेले व कोणीहि त्यांच्याशीं बोलायला व विचारविनिमयाला उरलें नाहीं.’ एकटेपणा हा भीषण होता व तो झपाट्यानें जवाहरलालवर आक्रमण करीत होता. बाहेर लोक नेहरूंच्या जीविताविषयीं चर्चा करीत होते. पण त्यांना ग्रासलें होतें राजकीय काळजीनें.

सेटन म्हणतात, “नेहरूंच्या घरीं राजकारणाची चर्चा वर्ज असे हें कोणाला खरें वाटणार नाहीं.” पण तें खरें होतें. खालीं त्यांच्या कार्यालयांत कोणी

* Panditji—by Marie Seaton. पान ३२३.

पाहुणे आले तरच ती चर्चा होई. त्या वेळीं सर्वांना एकच चिंता वाटत होती ती चिनी आक्रमणाची. तें आक्रमण होत नाहीं असें नेहरूंना वाटत असावें, म्हणून त्याच्या वृत्तींत थोडासा चांगला बदल झाला होता. तसें त्यांनाच वाटत होतें असें नाहीं; पण देशांतल्या अनेकांना पण तो भ्रम होता.

७ सप्टेंबर १९६२ रोजीं जवाहरलाल राष्ट्रकुटुंब परिषदेकरितां लंडनला जायला निघणार होते. विमानतळावर खूपच गर्दी होती. त्यांत परराष्ट्रीय, स्वराष्ट्रीय, स्नेही, फोटोग्राफर्स, वगैरे किती तरी लोक जमलेले होते. पण त्यांत मनांत तडफडत असलेली एक व्यक्ती होती. ती कृष्णा मेननची. कृष्णा मेनन एका कोपऱ्यांत लोकांकडे पाठ करून काठीला टेकून बसले होते. नंतर ताडताड चालूं लागले. नेहरूंना भेटण्याचा प्रयत्न केला. चार शब्द बोलले.

डॉ. राधाकृष्णन् यांनींहि तुच्छतेनें त्यांना तेथें वागविलें. 'मला माहीत नाहीं' अशीं तीनदां मोठ्यानें कृष्णा मेननने गर्जना केली. संरक्षणमंत्री अशा तऱ्हेवाईकपणें कां वागत होते, हें समजणें फारसें कठीण नाहीं. विचित्रपणा, विक्षिप्तपणा, अहंमन्यता हा त्यांच्या स्वभावांतला मोठा दोष आहे. मनांतल्या मनांत कुढणें, टाकून बोलणें यामुळें त्यांनीं देशांत अनेक शत्रु निर्माण केले होते, एवढेंच नव्हे तर परदेशांतहि. अमेरिकेंत तर त्यांचें नांव काढलेलें खपत नसे. राजकारणांतच काय, पण साध्या व्यवहारांत तुमचें म्हणणें बरोबर आहे असें धरून चालतां येत नाहीं; तें पटवावें लागतें.

सप्टेंबर, ऑक्टोबर व नोव्हेंबर १९६२ हे तीन महिने हिंदुस्थानच्या इतिहासांत अत्यंत आणीबाणीचे गेले. हिंदुस्थानची पत, अब्रू सर्व कांहीं धुळीला मिळाली. उत्तरेकडील मुलूख गेला आणि शेवटीं जवाहरलाल नेहरूंचा अंतहि त्या पराभवानें जवळ ओढवून आणला.

सप्टेंबरच्या ८ तारखेला चिनी फौजांनीं नेफा विभागांत मॅकमोहन रेषा ओलांडली व जेथें तिबेट, भुतान व हिंदुस्थानच्या सरहद्दी मिळतात, त्या थागला-रिजवर त्यांनीं चढाई केली. धोला त्यांनीं घेतलें. हिंदी फौजांनीं २९ सप्टेंबरपर्यंत प्रतिकार केला. नेहरू लंडनला गेले होते, पण कृष्णा मेननर्नीं नेफा भागांत जी काय संरक्षणाची सोय करतां येईल ती केली होती.

लंडनला नेहरू पोहोंचले व त्यांनीं डॉक्टर्सकडून आपल्या बिघडलेल्या मूत्र-पिंडाची तपासणी करवली. बिघाड कमी होत आहे असें समजतांच नेहरूंची

वृत्ति प्रकृतीबरोबर सुधारली. नेहरूंना लॉर्ड मौंटबॅटननीं इशारा दिला कीं, हें साधें आक्रमण नाहीं. हिंदुस्थान व चीनचें प्रचंड युद्ध होणार आहे, पण नेहरूंनीं फ्रान्स, नायजेरिआ, घाना वगैरे देशांना भेटी देण्याचा आपला कार्यक्रम बदलला नाहीं. त्यांना चीन प्रचंड युद्ध करील असें वाटत नव्हतें.

त्या वेळीं अमेरिका व रशियामध्यें क्युबा येथील संघर्ष वर्दळीवर आला होता. जागतिक युद्धाची शक्यता वाटत होती. जवाहरलालजी लंडनमध्यें असतां त्यांनीं कृष्णा मेननला तेथें बोलावून घेतलें व युनोमध्यें पाठवून दिलें. हिंदुस्थानवर चीनचें आक्रमण होत असतां हिंदुस्थानचे पंतप्रधान व संरक्षणमंत्री हे दोघेहि कांहीं काळ देशाबाहेर होते! लोकांनीं त्यावर प्रखर टीका केली.

हे दोघेहि पुढारी लवकरच परत आले, हें खरें असलें तरी त्यांची गैर-हाजिरी समर्थनीय ठरत नाहीं.

परदेशाहून परत आल्यावर नेहरूंनीं शत्रु घरांत शिरला असतां, निदान बाहेर देशीं दुसरी यात्रा करावयास नको होती. पण १२ ऑक्टोबर रोजीं ते सीलोनला तीन दिवसांची भेट देण्याकरितां गेले. लष्करी आक्रमणाच्या दृष्टीनें सीलोनबरोबर कांहीं बोलणीं करण्याकरितां ते गेले होते असा कांहीं निष्कर्ष निघत नाहीं. कृष्णा मेनन सारखे चडफडत होते. नेहरूंनीं देश सोडूं नये म्हणून ते प्रत्यक्ष अप्रत्यक्ष धडपड करीत होते. नेहरू त्यांच्या विनवणीकडे लक्षच देत नव्हते. जाण्यापूर्वीं त्यांनीं दोन डिव्हिजन्स नेफाकडे रवाना कराव्यात असें अनिच्छेनें सांगितलें. ‘ शत्रूला हाकून द्या ’ एवढें ते मात्र बोलत होते. विमानतळावर जमलेल्या लोकांच्या चेहऱ्यावर चिंतेची छटाहि नव्हती. नेहरूंच्या मृत्यूनंतर कृष्णा मेननीं सांगितलें कीं, विमान सुटेपर्यंत मला नेहरू आपला दौरा रद्द करतील अशी आशा वाटत होती. कडकडीत उन्हांत मेनन नेहरूंच्या विमानाकडे आशाळभूतपणें पाहात राहिले.

नेहरू मद्रासला उतरले. तेथून सीलोनला गेले. इकडे परिस्थिति गंभीर होत होती. अमेरिकेबरोबर विमानाकरितां मेननीं करार केला होता. पैसे दिले होते; पण तीं विमानेंच आलीं नाहींत. २० ऑक्टोबरला चीनचा प्रचंड हल्ला झाला. तें एखाद्या पर्वताप्रमाणें हिंदुस्थानवर कोसळलें. नेहरू त्या वेळीं सीलोनहून परतले होते. लडाख–नेफावर चीननें प्रचंड हल्ले केले. त्याचा प्रतिकार

नेफा आघाडीवर फक्त ६०० हिंदी सैनिक करीत होते. ते किती वेळ टिकाव धरणार? पण हिंदी सैनिक प्राणपणानें लढले. त्या लढण्यांत त्यांनीं किती चिनी खलास केले याचा पत्ता नाहीं; पण असंख्य हिंदी सैनिकहि रणांगणावर पडले.

कृष्णा मेनन ब्रिटिश, अमेरिकन वकिलायतींत येरझाऱ्या घालीत होते. शस्त्रें द्या, लवकर द्या व चांगलीं द्या हीच एक त्यांची मागणी. पण दोन्ही देश हिंदुस्थानचा पराभव गंमतीनें पाहात राहिले.

भारत त्या वेळीं संपूर्णपणें एक झाला होता. पैशाचा पाऊस पडत होता. सैन्यांत भरती होत होती. नेहरूंच्या बंगल्याभोंवतीं देणगीदारांच्या रांका लागल्या होत्या. जगाचें लक्ष त्या वेळीं हिंदुस्थानकडे नव्हतें. क्युबामध्यें ठिणगी पडते कीं काय व सर्व मानवांचा संहार करणारें तिसरें विश्वयुद्ध सुरू होतें कीं काय याकडे श्वास कोंडून जग पाहात होतें.

हिंदुस्थानांतील चिनी आक्रमणाला कृष्णा मेनन हा खलपुरुष जबाबदार आहे, अशी ओरड सर्वत्र सुरू झाली. मेनननीं राजीनामा दिला पाहिजे, त्याला हाकलून दिलें पाहिजे, अशी मागणी कॉंग्रेससह सर्वजण करीत होते. मेननवर एक असा दुष्ट आरोप करण्यांत येत होता कीं, ते कम्युनिस्ट आहेत, चीनधार्जिणे आहेत. पण ते धडधडीत असत्य होतें. त्यांनीं चिनी आक्रमणाला आपल्या सर्व शक्तीनिशीं कडवा प्रतिकार केला. आपल्या विरुद्ध ओरड होतांच त्यांनीं जवाहरलालजवळ राजीनामासुद्धां पाठवून दिला होता. पण जवाहरलालजींना हें पूर्णपणें ठाऊक होतें कीं, चिनी आक्रमणाला, तटस्थतेच्या धोरणाला कृष्णा मेनन जबाबदार नाहींत. सर्व जबाबदारी माझी आहे. पण जवाहरलालजींचें लोकक्षोभापुढें कांहीं चालेना. शेवटीं ३१ ऑक्टोबरला त्यांनीं आपल्याकडे संरक्षण-खातें घेतलें, पण त्यांनीं संरक्षण उत्पादन खातें मेननकडे ठेवलें. तेंहि लोकांना सहन होईना. नेहरू व मेननच्या धोरणाचा बचाव इंग्लंडचे पंतप्रधान मॅकमिलन यांनीं केला. ते म्हणाले, सुरुवातीला पिछेहाटीचे असे प्रसंग येतात; पण शेवटीं यश मिळतें. पण हिंदुस्थानांत जवाहरलालजींच्या धोरणाचें खापर मेननवर फुटत होतें. ६ नोव्हेंबरला हिंदी मंत्रिमंडळाची बैठक झाली. सर्वांनीं मेननला काढून टाका असा आग्रह धरला; आणि नेहरूंना आपल्या इच्छेविरुद्ध मेननला काढून टाकावें लागलें. त्यांना यातना झाल्या. आपण अन्याय करतों असें वाटलें.

मित्रप्रेम का पक्षप्रेम असा सवाल त्यांच्यापुढें होता. पक्षप्रेमानें जय मिळवला व मित्राचा त्याग करावा लागला. कृष्णा मेनन यांनीं त्या वेळीं जवाहरलालजींवर टीकाहल्ला केला नाहीं. तोंड मिटून घेतलें.

मेनन गेल्याचा आनंद अमेरिकेंत फार झाला. ज्या दिवशीं मेनन गेलें, त्या दिवसापासून अमेरिकन मदतीचा ओघ भारताकडे लोटूं लागला. विमानांचे तांडेचे तांडे दिल्लीभोंवतीं घिरट्या घालीत मदत ओतूं लागले. ब्रिटिशांनींहि तेंच धोरण स्वीकारलें. रशियाकडेहि मिग विमानांची मागणी हिंदुस्थाननें केली होती. त्यामुळेंहि हीं राष्ट्रें नाराज झालीं होतीं.

१४ नोव्हेंबरला जवाहरलालजींचा वाढदिवस होता. वातावरणांत थोडासा उत्साह निर्माण झाला होता. चिनी आक्रमण चालूच होतें. नेहरूंना पार्लमेंटांत चिनी विश्वासघाताच्या चर्चेला त्या दिवशीं उत्तर द्यावयाचें होतें.

जवाहरलालजींच्या भाषणांत त्यांनीं आपल्यावरील आरोपांना उत्तर दिलें. ते म्हणाले, ' लडाखच्या चुगुल विभागांत उष्णतामान शून्याच्या खालीं ३० अंश असतें. हवा इतकी रक्त गोठवणारी आहे. १४,००० फूट उंचीवर तुम्ही अंगांत कितीहि कपडे घातलेत तरी सवयीशिवाय हवेला तोंड देतां येत नाहीं. आम्ही आतां उबदार कपडे पाठवूं लागलों आहोंत. दुसरा आरोप शस्त्रांचा. आपल्या जवानाजवळ नेहमींचीं शस्त्रें आहेत. पण अर्धस्वयंचलित रायफल्स आमचेजवळ नाहींत. युरोपमधील पुष्कळ लष्करीदृष्ट्या सुसज्ज राष्ट्राजवळ तीं नाहींत. खुद्द इंग्लंडमध्यें आतां कोठें तीं शस्त्रें नुकतींच सुरू झालीं आहेत. पण त्यालाहि पांच वर्षें पुरी सज्जता होण्याला लागलीं.

" आम्ही शस्त्रास्त्रांच्या बाबतींत चीनच्या बरोबर यावयास दोन वर्षें लागतील असें एक ब्रिटिश तज्ज्ञ म्हणतात. शस्त्रें विकत घेण्याला किती किंमत द्यावी लागते याला सुमारच नसतो. ते नाक घासायला लावतात व भरमसाठ पैसे मागतात. शिवाय हीं शस्त्रें शांततेच्या काळांत कोणी देत नाहीं. आतां युद्ध सुरू झाल्यामुळें अमेरिका, ब्रिटन वगैरे देश आमच्यावरील संकट पाहून तीं शस्त्रें देत आहेत. नुसत्या बंदुका असून भागत नाहीं. त्याला दारूगोळा लागतो, तोहि मिळत नाहीं. पण ह्या सर्वांवर एकच उपाय आहे व तो म्हणजे स्वतः शस्त्रें बनविणें. चीननें २० वर्षांपासूनच शस्त्रास्त्रें तयार करण्याचें काय सुरू केलें. रशियानें त्यांना साधनें पुरविलीं. आम्ही फक्त शस्त्रास्त्र-

निर्मितीवर लक्ष केंद्रित केलें नाहीं. सर्वांगीण औद्योगिक विकासावर आमचा भर होता; त्यांत शस्त्रास्त्रें हा एक भाग होता. चिनी शिपायाला डोंगरावर लढण्याची संवय आहे. आमचे शिपाई त्या लढाईला अपरिचित आहेत. सोव्हिएट रशिया आपल्याला मदत करीत आहे, ती मित्रराष्ट्र म्हणून नसून दोस्त राष्ट्र म्हणून. ''

जवाहरलालजींच्या भाषणामुळें पुष्कळसे समज, गैरसमज दूर झाले. शिपाई लढत नाहींत, शस्त्रांनीं ते लढतात. डोंगराळ लढाईची संवय नाहीं; युद्धाची पूर्वयोजना नाहीं, आपलीं म्हणावयास मित्र राष्ट्रें नाहींत अशा स्थितींत परिस्थितीला दोष देणें भाग पडतें. कृष्णा मेनन किंवा नेहरू काय करणार ? चिनी आक्रमकयुद्धाला यशस्वी तोंड देतां आलें नाहीं म्हणून कोणाहि व्यक्तीला दोष देणें वाजवी नाहीं. संकटें येतात व जातात; पण कटुता कायम राहते. हिंदुस्थान स्वतंत्र होतांच तो युद्धाच्या तयारीला लागला नाहीं. तसें करणें शक्यहि नव्हतें. औद्योगिक व आर्थिक विकासाच्या दृष्टीनें इष्टहि नव्हतें. चिनी आक्रमणाची लाट जितक्या जोरानें आली तितक्याच जोरानें ती ओसरली. २१ नोव्हेंबरला त्यांनीं आपला तुफानी हल्ला मागें घेतला. पण हल्ला थांबविला म्हणून ते ८ सप्टेंबर १९६२ च्या पूर्वी जेथें होते तेथें गेले नाहींत. नेफापासून तों लडाखपर्यंत त्यांनीं जो मुलूख व्यापला तो त्यांनीं आपल्याच हातीं ठेवला. याचा अर्थ चीननें हिंदुस्थानच्या उत्तरेकडील बराच मोठा विभाग—सुमारें ३०,००० चौ. मैलांचा—जिंकला. त्यांनीं तडजोडीला बसण्याचें टाळलें.

पुष्कळांना चीन परत कां गेला हें एक कोडेंच वाटतें. पण त्यांत समजण्याला कठीण कांहीं नाहीं. एक तर त्यांना हिंदुस्थान जिंकावयाचा नव्हता. तो त्यांनीं जिंकला असता; पण रशियानें क्युबाच्या बाबतींत माघार घेतली. रशिया व चीनचे संबंध शत्रुत्वाचे झाले. शिवाय त्यांना हिंदुस्थानचा जेवढा भाग हवा होता तेवढा जिंकल्यानंतर त्यांनीं आणखी हाव कशाकरितां धरावी ? तेव्हां ३२ दिवसांचें हें भीषण युद्ध संपलें व हिंदुस्थान पराभूत झाला हें सत्य आहे.

जवाहरलालजींना चिनी आक्रमण लवकर संपेल असें रशियाकडून कळलें होतें, असें त्यांनीं कांहीं जणांना सांगितलें होतें. पण तेवढ्याकरितां ते गाफील राहिले असा आरोप त्यांच्यावर करतां येणार नाहीं. जवाहरलालजींना आपल्या

धोरणाबद्दल कधींहि पश्चात्ताप झाला नाहीं. शांतता, सहजीवन, पंचशील, वगैरेंवर त्यांचा मरेपर्यंत पूर्ण विश्वास होता. चिनी पराभवामुळें त्यांचा मृत्यु जवळ आला हें खरें आहे. त्यांना आपण एकाकी आहोंत असें जास्त जास्त वाटूं लागलें. आपल्याला अनेक मित्रांनीं दगा दिला, हेंहि त्यांना कळून येत होतें. आणि ज्याला आपण विश्वासू मित्र म्हटलें त्याचा (कृष्णा मेननचा) आपण बळी दिला, हीहि गोष्ट त्यांच्या मनाला लागून राहिली. कृष्णा मेननचें कसें काय चाललें आहे हेंहि ते कधीं कधीं विचारीत. *

हिंदुस्थानवर आलेल्या या संकटांतून हिंदुस्थान अद्याप मुक्त झाला नाहीं याबद्दल आपण कोणाला दोष देणार ?

* * *

* Panditji - Marie Seaton, Page 443.

१४ : विपत्कालीं धैर्य. इंदिरा गांधी आघाडीवर

चिनी आक्रमण वायुवेगानें चाललें होतें. १७ नोव्हेंबर १९६२ रोजीं चिनी फौजांनीं वॉलांग सर केलें. रविवारीं सेला, सोमवारीं बोमडिला पडलें. ह्या पराभवांची प्रतिक्रिया भारतावर झाली होती. अपमान, दुःख, चिंता यांनीं सारा हिंदुस्थान दग्ध झाला होता. चिनी फौजा आसामच्या सीमेवरून तेलाच्या खाणीवर उतरल्या तर हाहाःकार होणार होता. असा कठीण प्रसंग भारतावर पूर्वी क्वचितच आला असेल.

आसाममध्यें तेजपूर हें महत्त्वाचें मोठें गांव होतें. चिनी फौजा पुढें सरकत सरकत तेजपूर घेणार ह्यांत शंकाच नव्हती. तेथें आदिवासींची वस्ती होती. दुसऱ्या महायुद्धांत ब्रिटिशांनीं हें गांव कठीण परिस्थिति आल्यास रिकामें करावें अशी योजना केली होती. तेजपूरचा दुय्यम कमिशनर हा एक भेकड व बेजबाबदार अधिकारी होता. त्याच्या हातीं जुनी ब्रिटिश योजना होती. त्या योजनेचा आधार घेऊन त्यानें लोकांना तेजपूर सोडून निघून जा असा हुकूम सोडला व तो स्वतः बायकामुलांसह तेथून पळून गेला. तेजपूरचे आदिवासी शूर व अशा संकटाला भिणारे नव्हते. त्यांनीं गांव सोडला नाहीं.

लोक जर तेजपूर सोडून पळाले तर त्याचा आसामवर व साऱ्या देशावर भयंकर परिणाम होईल असे विचार इंदिरा गांधींच्या मनांत घोळूं लागले. त्या अस्वस्थ झाल्या, बेचैन झाल्या. नुसतीं ब्लँकेटें, स्वेटर्स, औषधें, बिस्किटें पाठवून काय होणार? लोकांना धीर दिला पाहिजे, तो धीर देण्यास आपण गेलें पाहिजे असा निग्रह त्यांनीं मनाशीं केला. त्या गंभीर झाल्या. जवाहर-



इंदिरा गांधी

लालना हें कसें सांगावें ? ते परवानगी देतील का ? पुरुष कोणीच का जायला तयार नाहींत ? वडिलांनीं नकार दिला तर काय करावयाचें ? वगैरे विचारांनीं त्यांना अस्वस्थ केलें, पण कांहीं होवो, आपण जायचेच व लोकांना धीर द्यायचा असा निश्चय त्यांनीं केला.

पंतप्रधानाच्या निवासस्थानीं गरम कपड्यांचे ढीगचे ढीग पडत होते. औषधें, खाद्यवस्तु वगैरेंचा पूर लोटला होता. इंदिरा गांधींनीं दिवसभर खटपट करून तेजपूरला जाण्याकरितां एक विमान मिळविलें. त्यांत हे सर्व कपडे व पदार्थ घातले आणि १९ नोव्हेंबर १९६२ च्या मध्यरात्रीं त्या दिल्लीहून निघाल्या. ज्या वेळीं त्यांचें विमान तेजपूरला लागलें, त्याच वेळीं चिनी फौजा तेजपूरपासून ३० मैलांवर येऊन थडकल्या होत्या. लोक गडबडले होते; पण आदिवासी भक्कमपणें तेथें पाय रोवून बसले होते.

इंदिरा गांधी आल्याचें समजतांच लोकांत धीर आला. त्या तेजपूरमध्यें हिंडल्या; एवढेंच नव्हे तर आसपासच्या गांवीं गेल्या. लोकांना, सैनिकांना, अधिकाऱ्यांना धीर देऊं लागल्या. त्यांनीं सामानसुमानहि वाटलें. तो दिवस व तो क्षण मोठ्या आणीबाणीचा होता. ३ दिवस त्यांनीं तेथें हें पराक्रमी धाडसी कृत्य केलें, पण....

२१ तारीख उजाडली आणि चीननें रात्रीं ९॥ वाजतां युद्धबंदी जाहीर केली. चिनी सैन्य तेजपूरवर चालून आलें नाहीं. तेजपूरवर चिनी फौजा चालून आल्या असत्या, तर इंदिरा गांधी तेथेंच लोकांना धीर देत राहिल्या असत्या. कदाचित् त्यांना प्राणहि गमवावे लागले असते.

चिनी फौजा गेल्या कां व आल्या कां याचें सामान्य माणसाला कोडेंच होतें. पण ते आले व गेले तरी हिंदुस्थानचा अपमान धुवून निघाला नाहीं. इंदिरा गांधींनीं त्या विपत्कालीं धैर्य दाखविलें याबद्दल इतिहास त्यांना धन्यता देईल.

* * *

आधार—पंडितजी—मेरी सेटॉन–पानें ३५०–५२

१५ : कच्छवर पाकचें आक्रमण

पाकनें हिंदी सरहद्दीवर स्वातंत्र्यानंतर हजारों आक्रमणें केलीं. १९६३ सालीं ४४८, १९६४ सालीं १५२२ व १९६५ सालीं १८०० (सात महिने). त्याबद्दल तितकेच निषेधखलितेहि पाठविले गेले. पाक व भारत हे दोघेहि युनोचे सभासद असल्यामुळें पाकच्या विरुद्ध भारतानें तक्रारीहि गुदरल्या. पण भारत किंवा युनो आपलें पारिपत्य करूं शकत नाहीं अशी त्यांची खात्री होती व अद्यापहि ती कायम आहे.

९ एप्रिल १९६५ रोजीं पाकनें मोठ्या पहाटेस भारतावर प्रचंड आक्रमण केलें. तें आक्रमण कच्छवर होतें. पाकच्या तोफा, रणगाडे, भू-सैनिक कच्छच्या सीमेवर चालून आले. सरदार नांवाच्या हिंदच्या ठाण्यावर त्यांनीं उखळी तोफा डागल्या. त्याच्या मागून त्यांनीं तोफांचा प्रचंड भडीमार केला. भारताची सेना सरहद्दीवर होती. तिनें १० एप्रिलला हा हल्ला परतवला. पकडलेल्या पाक सैनिकांजवळ जे कागदपत्र सांपडले त्यांवरून हें आक्रमण पूर्व नियोजित होतें असें आढळून आलें. हें आक्रमण मामुली नव्हतें, प्रचंड होतें. जानेवारी, फेब्रुवारी, मार्च महिन्यापासूनच पाकनें जाणून सवरून ह्या विभागांत लहान-मोठे हल्ले सुरू केले होते, त्यामुळे हिंदी फौजा अगदींच गाफील नव्हत्या.

त्या वेळचे पाकचे परराष्ट्रमंत्री मि. भुट्टो यांनीं १५ एप्रिलला एक पत्रक प्रसिद्ध केलें. त्यांत त्यांनीं म्हटलें कीं, आमचें जें भांडण आहे ते २४ पॅरललच्या उत्तरेकडे असलेल्या मुलखाबद्दल आहे. हिंदुस्थाननें आमचा उत्तरेचा मुलूख बळकावला आहे व तो सोडवून घेण्याकरितां आम्ही लढत आहों.' पाकनें

हिंदुस्थाननें मुलूख बळकावला आहे हें सिद्ध करावयास पाहिजे होतें. आक्रमण हा मार्ग नाहीं. पण त्यांना काय सिद्ध करतां येणार? ३०००।३५०० चौ. मैलांचा टापू हिंदनें बळकावला असा पाकचा दावा होता. कच्छच्या रणांतील हा सारा भाग आहे. कच्छ आतां गुजरातचा जिल्हा व पूर्वी एक संस्थान होतें. कच्छच्या पलीकडे सिंध आहे व तो पाकचा आहे. फाळणीचे वेळीं सीमा ठरल्या. त्या सीमेवर दगडी खांब वगैरे बांधले. पाक ते खांब उखडीत असे.

पाकचे महान् गुरु चौ-एन्-लाय होते. त्यांनीं पाकला दांडगाईनें सर्व कांहीं साधतें असा गुरुमंत्र दिला. चीननें अक्साई चीन, नेफा, काराकोरमचा भाग असाच दांडगाईनें बळकावला.

कच्छच्या सरहद्दीवर पोहोंचण्यास हिंदुस्थानला ८० मैलांचा रेताड भाग तुडवावा लागतो. त्या भागांत रस्ते नाहींत, पिण्याचें पाणी नाहीं, म्हणून तेथें वहानें व सैन्य नेणें कठीणच होतें. त्याच्या उलट पाकची स्थिति, सिंधच्या हद्दीपासून कच्छची सरहद्द अगदीं लगत आहे. कच्छ सरहद्दीपर्यंतच्या १० मैलांत व कच्छच्या कांहीं भागांत पाकनें चांगले रस्ते बांधले आहेत, त्यामुळें त्यांना आक्रमण करणें सोपें होतें. पाकची सेना रेताड भागांत येऊंच शकत नाहीं. ती जर आली असती, तर तिचा सहज निकाल लागला असता.

एप्रिलपूर्वींच पाक सैन्य कच्छमध्यें घुसलें होतें. त्यांनीं हिंदी हद्दींत डिंग येथें एक ठाणें स्थापलें, दुसरें ठाणें सुरई येथें स्थापले. तीं दोन ठाणीं १० मैल रस्ता बांधून जोडलीं. हीं ठाणीं हिंदच्या हद्दींत मैल, दीड मैल आंत होतीं. ह्या दोन ठाण्यांवर व रस्त्यांवर पाकचा पहारा सुरू झाला. तेथील पहारेकरी हिंदी पहारेकऱ्यांना दाद देईनात.

पुढें भारतानें सरदार व विगोकोट येथें आपलीं ठाणीं स्थापलीं. एप्रिलच्या ९ तारखेला पाकनें सरदार ठाणें सर केलें. पण नंतर तें हिंदनें घेतलें. सरदार, विगोकोट येथें चांगल्या लढाया झाल्या. पाकचे २००–२५० सैनिक ठार केले. पण मुख्य प्रश्न होता, पाक सैन्याला कंजारकोट या सरहद्दीवरील ठाण्यावरून सिंधमध्यें हाकलून लावण्याचा. त्यांत भारताला यश आलें नाहीं. कंजारकोट जिंकण्याकरितां ८० मैलांवरून सैन्याला चाल करावी लागली असती. तेथें रस्ते नव्हते व अजूनहि रस्ते बांधले असतील असें ऐकिवांत

नाहीं. हिंदनें या संग्रामांत बहादुरी केली. हिंदचे कित्येक सैनिक मृत्युमुखीं पडले. पण त्यांनीं पाकच्या प्रचंड सैन्याला कच्छच्या आंत मैल दीड मैलापेक्षां अधिक दूर येऊं दिलें नाहीं. लढाई रेंगाळत चालली. रणांत पाणी शिरूं लागलें व युद्ध थांबविल्याशिवाय गत्यंतरच उरलें नाहीं.

त्या वेळीं ब्रिटिश पंतप्रधानांनीं मध्यस्थी केली. ३० जूनला उभयपक्षीं करार झाला. त्यांत पुढील अटींवर युद्धबंदी झाली. (१) १ जुलै १९६५ पासून युद्धबंदी, (२) १ जानेवारी १९६५ पूर्वी जी परिस्थिति होती ती कायम राखणें व (३) कच्छ सिंधचा प्रश्न संमत तडजोडीनें सोडविणें. हा प्रश्न सोडविण्याकरितां तिघांचे लवाद नेमण्यांत आले. (१) स्वेडनचे न्यायाधीश लेगरग्रेन हे अध्यक्ष, (२) युगोस्लाव्हियाचे आलिस बेब्लर हे भारतातर्फे व (३) इराणचे एंतेझाम नसरुल्ला हे पाकिस्तानतर्फे. ह्या लवादाचा निर्णय अखेरचा व बंधनकारक मानला पाहिजे असें ठरलें. त्या लवादानें आपलें काम १४ जुलै १९६७ रोजीं संपविलें. १५ फेब्रुवारी १९६६ पासून त्यांनीं सुनावणीला जिनेव्हाला सुरुवात केली. ह्या निवाड्याला हिंदुस्थान तर्फेचे न्यायाधीश मि. बेब्लर हे अनुकूल नव्हते. पण त्यांनीं असें म्हटले कीं, निर्णय बहुमतानें झाला आहे. It is therefore the boundry determined by the Tribunal.* बहुमताच्या निर्णयाला लवादाचा निवाडा म्हणून बेब्लरनीं मान्यता दिली. इराणच्या मध्यस्थांना निम्मा कच्छ हवा होता; पण त्यांनींहि अध्यक्षांचा निर्णय मानला.

हा निवाडा वाचतांना त्यांत पक्षपात केला आहे असें वाटत नाहीं. अध्यक्षांना जे योग्य व सयुक्तिक वाटलें तें त्यांनीं केलें. मुख्य प्रश्न त्यांच्यापुढें जो होता तो भविष्यकालीन संघर्ष टाळण्याचा. म्हणून त्या निवाड्यांत जसा शुद्ध न्याय नाहीं, तसा शुद्ध अन्यायहि नाहीं. जेथें अन्याय वाटतो तेथें त्यांनीं शंभर वर्षें गुरें चरत होतीं, कोणी प्रतिकार केला नाहीं वगैरे वहिवाटींच्या हक्काचा आधार घेतला आहे.

विवाद्य विभागांतील ९० टक्के विभाग भारताला मिळाला व १० टक्के पाकिस्तानला मिळाला. एकूण कच्छच्या रणाचा ८४०० चौ. मैलांचा वाद होता. सुमारें ८००।८५० चौ. मैल भाग पाकला मिळाला.

---

* Award—19th February 1968, पान १५५.

रहीम कि बाजारच्या दक्षिणेला जो लगतचा भाग आहे तो भाग, पिरोल व्हॅलो कुन, धाराबन्नी व छाड बेट हा भाग पाककडे गेला.

हा निवाडा मानावा कां मानूं नये याबद्दल भारतांत सरकारी व बिन-सरकारी अशी मतभिन्नता झाली. सरकारनें लवादाला मान्यता देतांनाच लवाद-निवाडा आमचेवर बंधनकारक आहे अशी कबुली दिली होती. तेव्हां सरकारचा प्रश्नच नव्हता. पण इतर पक्षांनीं व व्यक्तींनीं तो निवाडा मानूं नये असें मत दिलें. त्यांनीं त्याकरितां कच्छमध्यें सत्याग्रहाला सुरुवातहि केली. शेंकडों लोक पकडले गेले; कांहींना शिक्षाहि झाल्या. संयुक्त समाजवादी, प्रजासमाजवादी, जनसंघ वगैरे पक्षांनीं हा लढा केला. ती लढत पावसाळ्यामुळें समाप्त झाली. आतां भांडणाचा मोर्चा वरिष्ठ न्यायालयाकडे वळला आहे. तेथेंहि पावसाळा संपेपर्यंत निकाल लागणार नाहीं. पण प्रश्न असा आहे कीं, निकाल जरी भारताच्या बाजूनें लागला, तरी त्याची अंमलबजावणी करण्या-करितां लढाई पुकारावी लागेल. ती लढाई पुकारली तर हिंदुस्थान सरकारला नैतिक व कायदेशीर प्रतिष्ठा राहणार नाहीं. आंतरराष्ट्रीय जगांत हिंदुस्थानची पत जाईल. याकरितां हा निवाडा मान्य करण्यावांचून गत्यंतर नाहीं.

जो भाग लवाद निवाड्यानें हिंदुस्थानकडे आला आहे त्याचें रक्षण करणें महत्त्वाचें व जरूरीचें आहे. तेवढी दक्षता भारत सरकारनें घेतलीच पाहिजे.

कच्छची स्वारी हा एक पाकिस्तानच्या आक्रमणाचा किरकोळ भाग होता. १ जुलै १९६५ ला कच्छमध्यें युद्धबंदी झाली व ५ ऑगस्ट १९६५ रोजीं पाकनें भारतावर प्रचंड सैन्य लोटलें.

* * *

१६ : पाकिस्तानचें दुसरें युद्ध

५ ऑगस्ट १९६५ रोजीं पाकनें हिंदुस्थानवर आक्रमण केलें व २३ सप्टेंबर १९६६ रोजीं पहाटे ३–३० वाजतां गोळीबारबंदी जाहीर झाली. ५० दिवस हें युद्ध चाललें. हें युद्ध भयानक, तीव्र व आणीबाणीचें होतें. पाकिस्ताननें आपल्या स्वातंत्र्यप्राप्तीनंतर युद्धतयारीशिवाय दुसरा कोणताच महत्त्वाचा उद्योग केला नाहीं. पहिले युद्ध त्यांनीं स्वातंत्र्यप्राप्ति होतांच सुरू केलें. त्यांत त्यांना $\frac{1}{3}$ काश्मीर बळकावतां आला. दुसऱ्या युद्धांत त्यांना साराचा सारा काश्मीर घ्यावयाचा होता. दिल्ली सर करण्याचेहि त्यांचे बेत होते. पण १९६५ च्या युद्धांत पाकचा पूर्ण पराभव झाला व म्हणूनच आयुबखान ताशकंद कराराला तयार झाले.

हिंदुस्थानवर स्वातंत्र्योत्तरकाळांत जीं जीं संकटें आलीं, आणीबाणीचे प्रसंग आले, त्या सर्वांना पाकिस्तान कारणीभूत झालें. चीन व गोवा हे जर दोन परदेशीय प्रसंग सोडले, तर पाकिस्ताननें हिंदुस्थानला अस्वस्थ व अशांत ठेवले होते. आजहि पाकच्या कारवाया चालूच आहेत. पाकचें संकट हें असेंच सतत चालू राहणार आहे. पाकला अमेरिका व ब्रिटिशांची मदत आहे. त्याचें कारण या दोन देशांना हिंदुस्थानची फाळणी धर्मभेदावर झाली आणि हिंदुस्थाननें काश्मीर पाकिस्तानला दिला नाहीं हें नाहीं. अमेरिकेला गिलगिटच्या विभागांत विमानतळ पाहिजे होतें. ते तळ पाकनें दिले. हिंदुस्थाननें लडाखमध्यें हे तळ दिले असते, तर अमेरिका भारताला मदत करूं शकली असती. त्या वेळीं चीन व रशियाची युती होती. सिंकिआंगमध्यें



आयुबखान

चीन आपली शक्ति एकवटत होता. त्याला प्रतिकार करतां यावा म्हणून त्यांना गिलगिटजवळचे तळ पाकनें दिले. अमेरिकेच्या पाकधार्जिणेपणाला हें एक कारण आहे. रशिया पाकला मदत नाकारीत आहे, त्यालाहि तेंच कारण आहे. पण आतां परिस्थिति बदलत आहे. रशिया व चीन यांच्यांत वितुष्ट आलें आहे. गिलगिटचें महत्त्व पूर्वीइतकें राहिलें नाहीं. पाक गिलगिटचे तळ यापुढें अमेरिकेला देणार नाहीं. त्यामुळें रशिया पाकला शस्त्रास्त्रांची मदत करीत आहे.

पाकला अमेरिकेकडून १०० सेबरजेट विमानें, ५० स्टार फायटर्स, ३० ॲटॅक बॉंबर्स, २०० पॅटन रणगाडे मिळाले. ब्रिटनकडून ५० कॅनबेरा बॉंबर्स मिळाले. हिंदुस्थानलाहि अमेरिका, ब्रिटन, रशिया व फ्रान्सकडून विमानें, रणगाडे वगैरे मिळाले; पण संख्या कमी. शिवाय अमेरिकेचीं विमानें व रणगाडे फार प्रभावी होते. पाकला या विमानांचा व रणगाड्यांचा शिक्षणाभावीं उपयोग करतां आला नाहीं; हें जसें त्यांचें दुर्दैव, तसेच नादुरुस्त भागांच्या जागीं सुटे भागहि (Spare parts) त्यांना उपलब्ध झाले नाहींत. त्यांचे कांहीं अधिकारी हे जिद्दीनें लढले नाहींत. कांहींनीं पळहि काढला. हिंदी सैन्याचा विजय जो झाला तो नुसत्या शस्त्रांचा विजय नव्हता, तो जवान, अधिकाऱ्यांच्या शौर्याचा, पराक्रमाचा विजय होता, रणनीतीचा, कल्पकतेचा विजय होता.



यशवंतराव चव्हाण
(संरक्षण मंत्री)

युद्धक्षेत्र खालीं द्वारकेपासून तों वर टिटवालपर्यंत होतें. रणक्षेत्रें ७ होतीं. (१) केरन ते टिटवाल, (२) उरी ते पुंच, (३) छांब–जोरियन अखनूर, (४) सियालकोट, फिलोरा, पसरूर, (५) लाहोर–डोगराई बर्की, असल उत्तर, खेमकरण, (६) फाझिल्का व (७) गाद्रा बारमेर. ह्या ७ विभागांतील ६ विभागांत हिंदुस्थानचा जय झाला. फक्त जम्मूमधील छांब विभागांत पाकनें १९० चौ. मैलांचा व पंजाबमध्यें २० चौ. मैल असा २१० चौ. मैल टापू त्यांनीं व्यापला. याच्या उलट हिंदुस्थाननें पाकचा ६९० चौ. मैल टापू जिंकला. युद्धबंदी झाली नसती तर हिंदुस्थाननें अधिक पाक प्रदेश व्यापला असता, पण मनुष्यहानि प्रचंड झाली असती.

× × ×

या युद्धांतील कांहीं अभिमानास्पद स्फूर्तीचे प्रसंग सांगण्यालायक आहेत. पाकनें एप्रिल १९६५ मध्येंच हिंदुस्थानवर स्वारी करण्याचें ठरविलें. त्यांनीं एप्रिलमध्यें कच्छवर आक्रमण केलें. मेमध्यें श्रीनगर ते लेह मार्ग तोडला. उद्देश हिंदी सैन्य अन्यत्र गुंतवावें असा होता. एप्रिल–मे पासून त्यांनीं सुमारें १०,००० घुसखोरांची सेना तयार केली. मरी येथें त्यांना शिक्षण दिलें. हे घुसखोर जुलै-ऑगस्टमध्यें काश्मीरच्या जंगलांत, डोंगरांत, दऱ्याखोऱ्यांत

शिरले. हिंदी सैनिकांनीं बऱ्याच जणांना ठार केलें. काश्मिरी जनता पाकच्या विरुद्ध होती. एका काश्मिरी मुसलमान शेतकऱ्याला मार्ग दाखविण्याकरितां व धान्यकोठार दाखविण्याकरितां लांच देऊ केली असतां, त्यानें त्यांची वर्दी हिंदी पोलिस-ठाण्यावर दिली व त्यांना गिरफदार करविलें.

८ ऑगस्टला श्रीनगरला पीर दस्तगीर याचा मोठा उरूस होता. हजारों लोक तेथें त्याकरितां जमतात. ९ ऑगस्टला शेख अब्दुल्लाच्या अटकेचा निषेधदिन होता. या दोन दिवसांचा फायदा घेऊन घुसखोर श्रीनगरला आले. धमाल उडवावी, श्रीनगर काबीज केलें असा रेडिओद्वारा पुकारा करावा, असा त्यांचा बेत होता. काश्मीर पाकिस्तानांत सामील झाल्याचीं हस्तपत्रकेंहि त्यांनीं बरोबर नेलीं होतीं. पाकिस्तानी फौजा सरहद्दीवर सज्ज होत्या. पण श्रीनगरमधील जनता बंड करून उठली नाहीं. हिंदी फौजा जागृत होत्या, त्यामुळें पाकिस्तानचा हा डाव पूर्णपणें फसला. घुसखोर पकडले गेले. अशा प्रकारें नाटकाचा पहिला प्रवेश समाप्त झाला.

१४ ऑगस्टला युद्धाला खरी सुरवात झाली. पाक फौजा सिआलकोटहून जम्मूच्या छांब विभागांत शिरल्या. तो पाकच्या स्वातंत्र्याचा दिवस. १५—१६ तारखेला त्यांचे रणगाडे, प्रचंड तोफा जम्मूमध्यें दणदणूं लागल्या. तो अत्यंत भयंकर हल्ला होता. तोफांचा सारखा भडीमार होत होता. हिंदुस्थानच काय, पण जगहि त्या भडीमारानें हादरलें. एक मैल तें सैन्य हिंदमध्यें आंत घुसलें.


२१ ऑगस्टला पाकनें आपलीं सेबरजेट विमानें प्रथम रणांगणावर उभीं केलीं. हिंदुस्थानवर अत्यंत कठीण प्रसंग आला. छांब मार्गानें पाक सैन्य खालीं दिल्लीवर किंवा वर श्रीनगरवर जाऊं शकलें असतें. त्या सैन्याला शह द्यावा म्हणून हिंदी फौजेनें उत्तरेकडून स्वारीला २४ तारखेला सुरुवात केली. त्यांनीं टिटवाल येथें पूर्वीची युद्धबंदी रेषा ओलांडली. त्यांनीं पाकचीं दोन ठाणीं सर केलीं. पण त्याहिपेक्षां हिंदुस्थानच्या इतिहासांत चिरस्मरणीय होऊन राहील तो हाजीपीरचा पराक्रम. हाजीपीर व हाजीपीर खिंड जिंकणें म्हणजे मृत्यूबरोबर झुंज होती, पाऊस पडत होता, चिखल झाला होता, रात्र अंधारी होती, विषारी जनावरें आसपास घोटाळत होतीं, रस्ते नव्हतेच. रात्रीच्या काळोखांत हाजीपीरला हिंदी सैन्यानें घेरा घातला. गनिमी लढा सुरू झाला. २८ ऑगस्टला सकाळीं १०॥ वाजतां हिंदी बहादरांनीं हाजीपीरवर तिरंगी झेंडा

फडकावला. मेजर रणजितसिंग दयाल याचें तें प्रभावी नेतृत्व होतें. हाजीपीर-जिंकून सारे मार्ग बंद होत नव्हते. उरी पुंजचा मार्ग जिंकावयाचा होता. ती कामगिरी १० सप्टेंबरला हिंदी फौजांनीं पार पाडली. त्या वेळीं पाकचा पराभव होत होता व धैर्य खचत होतें.

हे उत्तरेकडचे केलेले व केले जाणारे पराक्रम जम्मू छांब विभागांत पुढें उपयोगी पडणारे होते. पण छांबचें काय ? सप्टेंबरच्या १ तारखेला पाकनें छांब विभागांत प्रचंड आक्रमण केलें. पण त्याची कल्पना हिंदच्या सेनापतींना होती. सकाळीं ११॥ वाजतां पाकच्या दोन पॅटन रणगाड्यांच्या रेजिमेंट्सनीं व एका पायदळ ब्रिगेडनें आंतरराष्ट्रीय हद्दीवर प्रचंड हल्ला केला. पॅटन रणगाडे यशस्वी होण्यास हीच जागा अनुकूल होती. त्या वेळीं कांहीं हिंदी वैमानिक या आघाडीवर आपल्या तुकडीचा वाढदिवस साजरा करीत होते. त्यांना ताबडतोब प्रतिकाराकरितां विमानें सोडा असा हुकूम आला. संध्याकाळचे ५॥ वाजले होते. विमानांच्या ७ तुकड्यांनीं २८ फेऱ्या केल्या. त्यांनीं विमानांतून बॉम्ब टाकून १३ पॅटन्स उध्वस्त केले. जमिनीवरून केलेल्या हल्ल्यांत ५ असें १८ पॅटन्स नष्ट झाले. पाकिस्ताननें भारताचीं दोन व्हॅंपायर विमानें पाडलीं. पण त्यानंतर दोनच दिवसांत आमच्या छोटुकल्या नॅट विमानांनीं पाकचीं दोन सेबरजेट्स पाडलीं.

पण एवढ्यानें छांबवरील गळचेपी थांबत नव्हती. छांब हा ह्या पाक-युद्धाचा मोक्याचा भाग होता. तोच केंद्रबिंदु होता. छांब, अखनूर, जम्मू हां विभाग पाकनें जिंकला असता तर त्यांचीं सैन्यें खालीं अमृतसरहून दिल्लीकडे जाऊं शकलीं असतीं आणि वर काश्मीरकडील हिंदी फौजांचा मार्गच बंद झाला असता. कांहींहि करून छांबवरील पाकची पक्कड सुटावयास पाहिजे होती. अखनूरवर दडपण वाढत होतें. ५ सप्टेंबरचा तो दिवस.

जनरल चौधरी पंतप्रधानाकडे गेले. त्यांनीं पंतप्रधानांना सांगितलें, प्रसंग मोठा आणीबाणीचा आहे. लाहोरवर स्वारी केल्याशिवाय छांबवरील दडपण कमी होणार नाहीं. पंतप्रधानांनीं स्वारीला ताबडतोब मान्यता दिली. संरक्षण-मंत्री श्री. चव्हाणहि तेथें होते. ६ सप्टेंबर रोजीं पहाटे भारतीय सेना पाक सरहद्द ओलांडून लाहोरकडे कूच करूं लागल्या. छांबचें रक्षण हिंदी फौजा प्राणपणानें करीत राहिल्याच होत्या.




कोसिजिन-रशिया

हिंदी फौजांवर विमानांचें छत्र होतें. तीं विमानें पाकच्या लष्करी ठाण्यांचा विध्वंस करूं लागलीं. पाकला लाहोरवर स्वारी होईल अशी कल्पना नसावी. लाहोरला वेढा घातला म्हणजे पाक सैन्य अमृतसरमार्गें दिल्लीवर जाणार नाहीं, असाहि युद्धपेंच निर्माण केला होता. हिंदी सैन्यानें लाहोर विभागांत तीन ठिकाणीं हल्ले चढविले. (१) वागा ते डोगराई, (२) खलटा ते बर्की व (३) खेमकरण ते कसूर.

पहिल्याच दिवशीं म्हणजे ६ सप्टेंबरला हिंदी फौजा इचोगिल कालवा व रावी ओलांडून लाहोरच्या परिसरांत पोहोंचल्या. जगांत गडबड उडाली. हिंदनें पाकवर स्वारी केली असा गहजब झाला. हिंदला लाहोर जिंकावयाचें नव्हतें. अखनूरवरील दडपण कमी करावयाचें होतें. तो हेतु साध्य झाला. अखनूरच्या चिलखती तुकड्या लाहोर रक्षणाकरितां निघाल्या. इचोगिल कालव्याजवळ हिंदी फौजा भक्कमपणें पाय रोवून बसल्या. लाहोरला जणू वेढाच पडला.

लाहोरला अखनूरहून निघालेल्या पाकच्या चिलखती गाड्यांना व अन्य



लाल बहादूर शास्त्री
(भारताचे पंतप्रधान)

शस्त्रशस्त्रीकांना प्रतिबंध करावा म्हणून सुचेतगड व इखनाल येथें हिंदनें लढाईची सज्जता ठेवली. त्याचप्रमाणें कराची, हैद्राबादमधून कुमक पोहोचूं नये याकरितां सिंध राजस्थान हद्दीवरील गाद्रा या ठिकाणीं हिंदनें हल्ला केला.


इचोगिल कालवा हा लाहोरच्या परिसरांतून खालीं दक्षिणेला कसूरपर्यंत जातो. याच टापूंत भयानक युद्ध झालें. रावी व सतलज या दोन नद्यांच्या-मध्यें रायीविंड म्हणून एक पाकिस्तानचें जोरदार लष्करी ठाणें होतें. तेथील चिलखती तुकडी अत्यंत प्रभावी समजली जात होती. ती तुकडी रायीविंडहून निघाली व इचोगिल कालव्याच्या दक्षिण टोकाला–कसूरला–आली. तेथें पाक फौजा होत्या. त्यांचा जोर इतका वाढला कीं, हिंदी फौजांनीं व्यापलेला मुलूख सोडून माघार घ्यावी लागली. हिंदी फौजा असलउत्तर व खेमकरण या आपल्या विभागांत जोरदारपणें ठाण मांडून बसल्या. पाकला वाटलें हिंदी फौजा पळत सुटल्या. म्हणून त्यांनीं हिंदी विभागांत आगेकूच केलें. सप्टेंबरच्या ९ व १० तारखांना या हिंदी विभागांत घनघोर युद्ध झालें. उभयपक्षीं मोठी प्राणहानि झाली. याच लढाईंत अमरकीर्तीचा हवालदार अब्दुल हमीदनें पाकचे ३ पॅटन रणगाडे नष्ट केले. ४ था रणगाडा नष्ट करणार तोंच

त्याच्या शरीराच्या शत्रूनें चिंधड्या केल्या. हवालदार अब्दुल हमीद याला सर्वांत श्रेष्ठ परमवीर चक्र देण्यांत आलें. पण मृत्यूनंतर.

याच लढाईत पाकचा जी. ओ. सी. व ब्रिगेडिअर असे दोघे ठार झाले. खेमकरण असल उत्तरच्या लढाईत भारताचा संपूर्ण विजय झाला व आमची कीर्ति जगांत गाजली. या लढाईत जर हिंदुस्थान जिंकला नसता तर भवितव्य भीषण होतें. पाकची पॅटन रणगाड्यांची प्रौढी व श्रेष्ठत्व पार धुळीला मिळविलें तें हिंदी जवानांनीं. पाकचे ९७ रणगाडे आ वासून तेथें पडले. ९ पॅटन्स सर केले. दोन ले. कर्नल, सहा मेजर, ६ इतर अधिकारी व अनेक सैनिक कैद केले.

८ सप्टेंबरला सिआलकोटची लढाई झाली. भारतसेना सिआलकोटवर चालून येईल असें पाकला वाटत होतें. पण हिंदनें हुलकावणी दिली. जी सेना फिलोराला गेली' तेथें दोन्ही सैन्यांची तुमुल लढाई झाली. प्रथम हिंदी सैन्य हटलें; पण नंतर सावरलें. ११ सप्टेंबरला ही लढाई संपली. पाकचे ६६ रणगाडे नष्ट व एक अधिकारी ठार झाला. येथें १५ दिवस रणगाड्यांची अपूर्व लढाई झाली. हिंदी फौजा तेथून चाविंदा या रेल्वे–रस्त्यावरील गांवीं गेल्या. तो पाकिस्तानचा बालेकिल्ला. तेथें १४ ते १७ सप्टेंबर लढाई झाली. भारतानें शत्रूचे ७६ रणगाडे उध्वस्त केले. सिआलकोट ते पसरुर हा रेल्वे-रस्ता पूर्णपणें उध्वस्त केला.

त्यानंतर बर्कीची लढाई. बर्की हें भारतानें १० सप्टेंबरला जिंकलें. तें झोपड्यांचें खेडें. इचोगिल कालवा ओलांडून जातां न आल्यानें भारत सैन्य बर्कीजवळ एका खेड्यावर चालून गेलें. ७ सप्टेंबरला तें खेडें–बर्कीकलान–जिंकलें. शत्रूच्या तोफांचा भडीमार होत होता. ४५ मिनिटें घनघोर युद्ध होऊन १० सप्टेंबरला रात्रीं ८॥ वाजतां बर्की पडलें. येथेंच या आक्रमणांत हातघाईची लढाई झाली. भारतसेना कालव्यावर पोहोंचली. पण पलीकडे जाऊं शकली नाहीं. कारण पाक सैन्यानें पूल उडविला होता. डोगराई हें अमृतसर–लाहोर रस्त्यावर आहे. तेथें पाकनें पिल बॉक्सिस उभारून कडेकोट बंदोबस्त केला होता. पण भारतीय जवानांनीं प्राण अर्पण करून शत्रूच्या संरक्षणाला खिंडार पाडलें. २१ सप्टेंबरला ६ तास ही लढाई झाली. शत्रूला



पाकिस्तान
युद्धबंदी रेषा
कारगिल
तिथवाल
बारामुल्ला
उरी
गुलमर्ग
श्रीनगर
झेलम नदी
हाजीपीर खिंड
पूंच
कोटली
मेंढार
मिरपूर
नौशेरा
अखनूर
उधमपूर
जम्मू
झेलम नदी
पा
चिनाब नदी.
सियालकोट
वझीराबाद
चाविंदा
पसरुर
कि
गुजरांणवाला
डेराबाबानानक
स्ता
इचोगिल कालवा
लाहोर
अमृतसर
बुर्की
खेरा
रावी नदी
बियास नदी
खेमकरण
कासूर
सतलज नदी
न
फेरोजपूर

कालव्यापार पिटाळलें. ३०५ सैनिक ठार व १०५ कैद केले. शत्रूची सारी सामुग्री हातीं आली.

अशा प्रकारें हिंदचा या दुसऱ्या युद्धांत जय झाला. त्या जयाला अनेक कारणें होतीं. एकतर हिंदी जवान प्राणप्रणानें लढले. ते तज्ज्ञ वाकबगार होते. हिंदी वैमानिक दलांनींहि अभूतपूर्व पराक्रम केला. त्यांचें सहाय्य नसतें तर युद्ध कठीण झालें असतें. अब्दुल हमीद व फिलोरा लढाईचे प्रमुख ले. कर्नल तारापोर यांनीं पराक्रमाची शर्थ केली व दोघांनीं मरणोत्तर परमवीर चक्रे मिळविलीं. ले. क. मेहता; ले. क. खन्ना; मेजर भुपिंदरसिंग; मे. त्यागी; कॅ. चंदरनारायणसिंग; सुभेदार अजितसिंग; मे. शर्मा; नाईक गुरुंग, हवालदार उमरावसिंग; हे वीर धारातीर्थी पडले. पण जे पराक्रम करून जगले त्यांचीहि यादी मोठी आहे.

ह्या युद्धांत सारा भारत एकवटला होता. जेथें लढाया झाल्या, तेथें स्त्री-पुरुषांनीं व मुलांनीं आपल्या जवानांची घरच्यापेक्षांहि जास्त बरदास्त ठेवली. खाण्यासवरण्याची कमतरता भासूं दिली नाहीं.

युद्ध संपलें. ताशकंदकरार रशियाच्या मध्यस्थीनें झाला. करारावर सह्या झाल्या आणि पंतप्रधान लालबहादूर शास्त्री हृदयविकारानें मरण पावले. आमचा नेता गेला. श्री. यशवंतराव चव्हाण, श्री. स्वरणसिंग, जनरल चौधरी, अर्जुनसिंग यांना या विजयाबद्दल धन्यवाद. ताशकंद कराराप्रमाणें ५ ऑगस्ट १९६५ पूर्वीं ज्याचा जो मुलूख होता, तेथें त्यानें जावें असें ठरलें. भारतीय सेनेनें दाखविलेल्या पराक्रमानें पाक मि. आयुबखान कांहीं शिकतील काय ? तशी आशा दिसत नाहीं, कारण त्यांनीं युद्धतयारी सुरूच ठेवली आहे.

या युद्धांतील एक विदूषकी किस्सा सांगण्यासारखा आहे. चीननें पाकिस्तानला ‘ लढा, मरेपर्यंत लढा ’ असा आदेश दिला होता. तेहि मदत करणार होते. १६ सप्टेंबर १९६५ ला त्यांनीं हिंदुस्थानला निर्वाणीचा खलिता पाठविला. तीन दिवसांत तुम्ही आमच्या हद्दींत जीं लष्करी बांधकामें केलीं आहेत, तीं पाडून टाका; आमचे ५९ याक व ८०० मेंढे पळवले आहेत ते परत करा, नाहींतर युद्धाला तयार व्हा. लालबहादूर म्हणाले तुमच्या हद्दींतलीं आमचीं बांधकामें असलीं तर तीं तुम्ही कां पाडत नाहीं ? चीननें आणखी ३ दिवसांची मुदत दिली आणि नंतर जाहीर केलें कीं, हिंदूनें हीं

बांधकामें पाडून टाकलीं आणि याक व मेंढेहि परत दिले. साऱ्या जगाला ही करमणूक वाटली. ६ दिवस संपले तेव्हां युद्धबंदीहि झाली. युद्धबंदीनंतरहि पाकनें अंबाला येथील इस्पितळ व चर्चवर बॉम्ब टाकून आपली हीनवृत्ति प्रकट केली.

या युद्धाचा जमाखर्च (?) लष्करांतील सैन्याची किती हानि झाली याचे आंकडेच अधिकृतरीत्या उपलब्ध नाहींत. पाकचे सैनिक अधिक नष्ट झाले एवढेंच खरें. पाकचा भर मुख्यतः रणगाड्यांवर होता. ८०० ते १००० रणगाडे त्यांच्याजवळ होते. त्यांतील $\frac{1}{3}$ नष्ट झाले. ३६० पॅटन्सपैकीं २१६ निकालांत निघालीं. त्यांचीं ७० विमानें नष्ट झालीं. त्यांचें निम्में विमानदल खर्चीं पडलें. हिंदुस्थानचीं ३५–४० विमानें पाडलीं गेलीं. आमचे जुने रणगाडे नष्ट झाले. पण ती हानि फारशी नव्हती. पाकिस्तानच्या मानानें हिंदुस्थानचें शस्त्रबळ कमीच होतें व हलक्या प्रतीचें होतें यांत तर वादच नाहीं. हिंदुस्थान आतां हीहि उणीव भरून काढीत आहे.

* * *

१७ : नागांचें बंड

वर्तमानपत्रांत नागांच्या बरोबर तडजोडीचीं बोलणीं चालू आहेत; बंड मोडण्याकरतां प्रत्यक्ष लढाईच्या तारखा पुढें पुढें टाकल्या जात आहेत वगैरे बातम्या येतात. दूरवर राहणाऱ्यांना या प्रश्नाची माहिती नसते, व असली तर त्यांचें गांभीर्य वाटत नाहीं. नागांनीं पाकिस्तानकडून किंवा चीनकडून शस्त्रें मिळविलीं व ते बंड करीत आहेत अशा बातम्या आल्या म्हणजे क्षणभर आपण चिंतातुर होतों व लवकरच ते विसरून जातों. आम्ही राष्ट्रीय ऐक्य करण्याकरितां हातांत कंकण बांधलें आहे व त्या ऐक्याला पडत असलेले तडे आपल्याला महत्त्वाचे वाटत नाहींत.

हें नागांचें प्रकरण आहे तरी काय? हिंदुस्थानच्या नैर्ऋत्येला ही नागभूमि आहे. आर्यांच्या पूर्वीं आमचें अस्तित्व होतें असें ते म्हणतात. शंकर हा किरात होता व गौतमबुद्धहि किरात होता असा त्यांचा दावा. जगांत क्रांत्या झाल्या, जेते आले व गेले. पण हे नाग लोक तसेच आहेत. त्यांच्यावर कशाचाच परिणाम झाला नाहीं. तसें पाहिलें तर हा नागांचा मुलूख ६–६॥ हजार चौ. मैलांचा व लोकसंख्या सुमारें ४ लाखांची. पण तो मुलूख सारा डोंगरी आहे. पहाडांतून हे नागालोक राहतात. नगांत राहतात म्हणून त्यांना नागा म्हणतात.

ब्रिटिशांनीं त्यांना जिंकलें हें खरें. त्यापूर्वीं कोणताहि राज्यकर्ता त्यांच्या-पर्यंत पोहोंचला नव्हता. इंग्रज राज्यकर्ते तेथें गेले, मिशनरी गेले. कांहीं लोकांना त्यांनीं खिश्चन केलें. खिश्चन धर्माचीं देवळें अनेक गांवीं आहेत. पण

हिंदु-मुसलमानांची देवळें किंवा मशीद एकहि आढळणार नाहीं. अपवाद असलाच तर असेल. नागांतील कांहीं लोक चांगले शिकलेले आहेत. इंग्रजी सफाईदार बोलतात. त्यांच्या स्त्रियाहि मडमासारखे पोषाख करतात.

जेव्हां ब्रिटिशांनीं हिंदुस्थान सोडला, तेव्हां हे नागा लोक म्हणूं लागले, आम्ही आतां स्वतंत्र झालों. आमचें स्वातंत्र्य ब्रिटिशांनीं हिरावून घेतलें होतें. ते गेल्यावर आम्ही कोणाचेहि अंकित राहिलों नाहीं. हिंदुस्थाननें आम्हांला कुठें जिंकलें ?

हिंदुस्थानचे पुढारी सांगतात, ब्रिटिशांच्या जागीं आम्ही आलों आहोंत. तुम्हीहि आमच्याबरोबर स्वतंत्र झालांत. हिंदुस्थानच्या प्रजासत्ताक राज्याचे घटक झालात. पण हा युक्तिवाद त्यांना मान्य नाहीं. ते म्हणतात आमचा व हिंदुस्थानचा कांहीं संबंध नाहीं. आम्ही हिंदी नाहीं. नागभूमि ही हिंदुस्थानचा भाग नाहीं व कधींहि नव्हती. ब्रिटिश गेल्यावर आमची भूमि स्वतंत्र झाली. आपल्या या निवेदनाच्या प्रचाराकरितां नागांनीं जें तंत्र अवलंबिलें आहे तें अत्यंत प्रभावी आहे. त्या तंत्राची बरोबरी हिंदुस्थान करूं शकत नाहीं.

त्यांचें म्हणणें असेः—आम्ही चमत्कारिक लोक आहोंत. आम्ही सर्व समान दर्जाचे आहोंत. आमच्यांत जातिभेद नाहींत. स्त्री–पुरुष सारखे मानतों. आमच्यांत हरिजन गिरिजन नाहींत. आम्ही स्वतःच राज्य करतों. आम्ही सर्व समाज म्हणजे एक कुटुंब मानतों. आम्ही वाटेल तेथें घरें बांधतों; वाटेल तेवढी जमीन कसतों. जें उत्पन्न येईल तें सर्वजण मिळून खातों. कोणाची मालकी कशावर नसते. रानें, जंगलें, नद्या सर्वांच्या मालकीच्या. कोठलाहि कर आम्ही देत नाहीं. आमच्यांत भिकारी नाहींत व श्रीमंतहि नाहींत. आमच्यांत पोलिस नाहींत, तुरुंग नाहींत, न्यायालयें नाहींत. आम्ही निरोगी आहोंत. आम्ही घरांना कुलपें लावीत नाहीं. गांवच्या धान्यकोठारांचें रक्षण करण्याकरितां पहारेकरी ठेवीत नाहीं. आम्ही अत्यंत सुखी, समाधानी आहोंत. तुमची सुधारणा, शासनपद्धति, तुमची समाजरचना, तुमचें अर्थशास्त्र तुमचें कल्याण करोत. आमच्यावर त्या कां लादतां व आमचें जीवन कां दुःखी करतां ?

नागांचा युक्तिवाद बिनतोड आहे, पण तोच आम्हांला नडत आहे.



आम्हांला वाटतें नागांचें हें स्वातंत्र्य चीन-पाकिस्तान हिरावून घेईल व आमच्या स्वातंत्र्याला त्यामुळें धोका पोहोंचेल. म्हणून भारतानें त्यांना चुचकारण्याचा प्रयत्न चालविला आहे. त्यांच्यांत एकदां विलक्षण ऐक्य होतें. पण आतां भारताच्या प्रयत्नानें त्या ऐक्यांत खिंडार पडलें आहे.

१९५२ सालीं आसामच्या कायदेमंडळांत व पार्लमेंटमध्यें नागांना कांहीं जागा दिल्या होत्या. आमच्या सरकारनें निवडणुकीची यंत्रणा उभी केली. याद्या छापल्या, मतदारकेंद्रें, ठरवलीं वगैरे सर्व प्रकार केले. पण एकाहि नागानें उमेदवारीचा अर्ज भरला नाहीं. असें असतांहि कायद्याप्रमाणें मतदार-

केंद्रें, पोलिंग अधिकारी वगैरे सर्व काहीं प्रकार मतदानाच्या दिवशीं झाले. एकहि मतदारकेंद्रावर फिरकला नाहीं. म. गांधींच्या असहकारितेला लाजवील इतका असहकार नागांनीं केला.

ह्या १९५२ च्या सार्वत्रिक निवडणुकीपूर्वी नागांनीं आपल्या स्वातंत्र्याच्या मागणीकरितां फार प्रचंड चळवळ केली. प्रत्येक खेड्यांतील शिक्षित अशिक्षिताकडून स्वातंत्र्याकरितां प्राण अर्पण करून लढूं अशा शपथा घेतल्या. त्याचबरोबर नव्या सरकारनें बसविलेला कोणताच कर देण्याचें त्यांनीं नाकारलें. ही करबंदी चळवळ त्यांनीं शंभर टक्के यशस्वी केली. एवढ्यावर त्यांचें समाधान झालें नाहीं. त्यांनीं विकासकार्यें बंद पाडलीं, विद्यार्थ्यांना व शिक्षकांना शाळेंत जाऊं दिलें नाहीं, सर्व नागा सरकारी नोकरांनीं राजीनामे दिले. साऱ्या सरकारी संमारंभावर कडकडीत बहिष्कार घातले. जे हिंदुस्थानला ब्रिटिशांच्या बाबतींत करतां आलें नाहीं, तें ह्या नागांनीं करून दाखविलें. त्यांत कार्यक्रम होता गांधींचा, पण गांधींची अहिंसा नव्हती. नाहींतर नागांचें हें अनत्याचारी बंड यशस्वी झालें असतें.

१९५३ पासून नागांत फूट पडली. १९५७ सालांत झालेल्या निवडणुकीकरितां ३ नागा फितूर होऊन उभे राहिले. पण त्यांना प्रतिस्पर्धी नव्हता. मतदान-केंद्रें निर्मनुष्य; पण निवडणूक बिनविरोध झाली. सरकारी नोकऱ्यांत शिरलेल्या नागांचें जीवित अशक्य झालें. चळवळीनें हिंसेचें वळण घेतलें. सरकारी इमारतींना आगी लावणें, पूल पाडणें, रस्ते उध्वस्त करणें, घातपाती कृत्यें करणें वगैरेंना सुमार राहिला नाहीं. भारत सरकारनें हे सर्व प्रकार शांतपणें सहन केले. ह्या मार्गानें आपण स्वतंत्र होत नाहीं असें पाहून ज्वलज्जहाल नागांनीं सशस्त्र बंड करण्याकरितां १९५३ सालीं एक मंडळ स्थापलें. त्या बंडाला स्वरूप आलें आपसांतील वैराचें. नागांनीं आपआपसांतच मुंडक्ीं उडविण्याची मोहीम सुरू केली. १९५६ च्या मार्चमध्यें या बंडवाल्यांनीं ' नागा फेडरल गव्हर्मेंटची ' स्थापना केली. तथापि तें बंड लोकांचा पाठिंबा न मिळाल्यामुळें फसलें. पण त्यांचें प्रजासत्ताक त्यांनीं स्थापन केलें. त्यांत १०० एम्. पी.ज (तातार्स) व १५ किलोनसर्स (मंत्री) होते. ह्या सरकारची कार्यवाही सुरू झाली. सरकारी विरोधामुळें भूमिगत राज्य चालू राहिलें. त्या राज्यांत गव्हर्नर्स, सैन्य, परदेशी वकील वगैरे सर्व कांहीं होते व आहे.

त्या सरकारनें हिंदुस्थानविरुद्ध बंड पुकारलें. १९५६ सालची ही घटना. बंडाकरितां त्यांच्याजवळ दुसऱ्या महायुद्धांतला दारूगोळा होता. नवें शस्त्रास्त्रांचें उत्पादन ते करूं लागले. या बंडांत हिंदुस्थान सरकारचा त्यांनीं ठिकठिकाणीं पराभव केला. सुमारें १५००० नागांची बंडवाली पलटण त्यांनीं उभी केली. हें नागांचें बंड पहाडापहाडांतून फैलावलें. त्यांचा पाडाव करणें हिंदी सैन्याला अशक्य झालें. हिंदी सैन्य त्यांच्यापुढें टिकाव धरीना.

हिंदुस्थाननें हें बंड मोडण्याकरितां सैन्य पाठविलें. पण त्या सैन्याला असे हुकूम देण्यांत आले कीं, त्यांनीं युद्ध न करतां मतपरिवर्तन करून हें बंड मोडावें. म्हणून लष्करी अधिकारी नागांची सेवाशुश्रूषा करूं लागले, त्यांना शिकवूं लागले, आपल्या घासांतला घास त्यांना देऊं लागले, ग्रामसफाई करूं लागले. लष्करी अधिकाऱ्यांच्या स्त्रिया नागांच्या मुलांना आंघोळी घालीत, त्यांच्याकरितां कपडे शिवत, गाणीं शिकवत. हृदयपरिवर्तनाचा तो एक महान् प्रयोग होता. त्याचा परिणाम सर्वसामान्य नागावर चांगलाच झाला. पण जहाल नागांना वाटलें, भारत सरकार दुर्बळ बनलें आहे. त्यांच्यांत आम्हांला मारण्याची शक्ति नाहीं.

नागांनीं बंड पुढें चालू ठेवलें; पण दिवसेंदिवस यशाची शक्यताच दिसेनाशी झाली. त्यांच्यांतला एक विचारी वर्ग म्हणूं लागला, जीवनाला स्थैर्य, शाश्वती, शांतता हवी आहे. झाले तेवढे अत्याचार पुरे झाले. तुम्ही जगा, आम्हांला जगूं द्या. पण या मूठभर शहाण्या लोकांना कोण विचारतो ? आपसांतले अत्याचार चालूच राहिले व वाढले.

१९५६ च्या ऑक्टोबर महिन्यांत जवाहरलाल नेहरूंनीं नागांच्या शिष्टमंडळाची शिलांगला भेट घेतली. नेहरूंनीं नागांना जास्तींत जास्त स्वायत्तता देण्याचें कबूल केलें. पण आधीं अत्याचार थांबवा असें सांगितलें. या वेळीं ख्रिश्चन धर्माचे उपदेशक व प्रचारक प्रकटपणें शांततेचा उपदेश करूं लागले. वास्तविकपणें एवढ्या अभिवचनानंतर नागांचें बंड संपावयास पाहिजे होतें. तें अद्याप संपलें नाहीं. त्याचें कारण फिजोसारखे, मायकेल स्कॉटसारखे उपद्व्यापी लोक नागांना सुधारणा मान्य करूं नका असें सांगत आहेत.

नेहरूंच्या भेटीनंतर नागांच्या तीन प्रचंड परिषदा भरल्या. पहिली १९५७ च्या २२ ते २६ ऑगस्टला भरली. दुसरी मे १९५८ मध्यें

उमांगला भरली व तिसरी १९५९ च्या ऑक्टोबरांत मोकाकचुंगला भरली. या परिषदांतून बंडाची आग शमत चालल्याचीं प्रत्यंतरें येत होतीं. सरकारनें ऑगस्ट १९५७ च्या परिषदेनंतर ४००० नागांना कैदेंतून मुक्त केलें. ३००० शरण आले व ३००० प्रकट झाले. सरकारच्या या सदिच्छेचा चांगला परिणाम बहुसंख्याकांवर झाला.

नेहरूंनीं १९६० सालीं नागा शिष्टमंडळाला भेट दिली. त्या भेटींत ठरल्याप्रमाणें १६ वें नागाराज्य स्थापन झाल्याचा ठराव पार्लमेंटांत १९६२ सालीं पास केला. त्या राज्याला १९६३ च्या १ डिसेंबरला राष्ट्रपतींनीं मान्यता दिली. १९६४ च्या २६ जानेवारीला निवडणुका होऊन नागभूमीचे मंत्रि-मंडळ अधिकारावर आलें. शिलू आवो हे मुख्य मंत्री झाले. त्यांच्या नंतर नवे मुख्य मंत्रीहि आले आहेत. हें सर्व झालें असलें तरी नागभूमींतले बंड समाप्त झालें नाहीं. विकासाचीं कार्यें चालू आहेत. हिंदुस्थान सरकारला तेथून ५ लाख रुपये वसुलीचे मिळतात व ४ कोट रुपये शासनाकरितां व विकासाकरितां खर्च करावा लागतो. आतां तो वाढलाहि आहे.

भारताचें सैन्य हें नागभूमींत हात जोडून बसलें आहे. बंडाला प्रतिकार करण्याकरितां ते सैनिक तेथें ठेवले आहेत; पण हा स्वातंत्र्याचा प्रश्न एकट्या नागांचा नाहीं. त्या सरहद्दीवर लुशाई, मिझो, खासी, जंटिया, गारो, उत्तर काचार, मिकिर वगैरेंचाहि प्रश्न आहे. नागांच्या प्रश्नावर त्यांचें भवितव्य अवलंबून आहे. तो प्रश्न सोडविण्याचा प्रयत्न चालला आहे. पण यश दृष्टीच्या टप्प्यांत दिसत नाहीं. त्याचें कारण क्रौर्य, अमानुषता, संहार वगैरे न करतां भारताला नागभूमीला वश करावयाचें आहे.

* * *

हिंदुस्थानांतील मनुष्यमात्रांत भ्रातृभाव निर्माण करणें एवढेंच माझें जीवितकार्य नांहीं. जरी माझा सर्व वेळ व माझें सर्व जीवन हें भारतीय स्वातंत्र्यप्राप्तीकरितां खर्चीं पडत असलें तरी हिंदी स्वातंत्र्य हें माझें जीवनकार्य नाहीं. पण हिंदी स्वातंत्र्यप्राप्तीच्या द्वारां मला मानवी भ्रातृभावनेचें कार्य करावयाचें व सिद्धीस न्यावयाचें आहे. माझी देशभक्ति ही अशी सर्वांपासून अलग असणारी गोष्ट नाहीं. ती सर्वसंग्राहक आहे. इतर राष्ट्रांच्या शोषणावर किंवा हालअपेष्टांवर आरूढ होणाऱ्या देशभक्तीला मी जुमानीत नाहीं. माझी देशभक्तीची कल्पना ही अखिल मानवाचें कल्याण व्यापणारी आहे.

– महात्मा गांधी

(दि माइंड ऑफ गांधी)

किंमत ५ रु.